सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर शुक्रवार, २८ फेब्रुवारी २०२५ वर्ष दुसरे अंक ३३४ पाने : ८ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# दक्षिण कोरियाच्या एचएस ह्युसंग कंपनीची नागपूरमध्ये १७४० कोटींची गुंतणवणूक

## एचएस ह्युसंग अँडव्हान्स मटेरियल्स कॉर्पोरेशन कंपनी



मुंबई : महाराष्ट्र शासनाचा उद्योग विभाग आणि दक्षिण कोरियाच्या एचएस ह्युसंग अँडव्हान्स मटेरियल्स कॉर्पोरेशन कंपनी यांच्या दरम्यान आज येथे १ हजार ७४० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा सामंजस्य करार करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत या सामंजस्य करारावर उद्योग विभागाचे सचिव डॉ. पी.अन्बलगन आणि एचएस ह्युसंग अँडव्हान्स मटेरियल्स कॉर्पोरेशनचे अध्यक्ष सीआँग यांनी स्वाक्षरी केली.

कंपनीने ही गुंतवणूक नागपूरच्या बुटीबोरी येथे डव्हान्स्ड मटेरियल्स उत्पादन क्षेत्रात केली असून यामुळे ४०० स्थानिक रोजगारांच्या संधी उपलब्ध होणार आहेत. 'ह्युसंग कंपनी नागपूरच्या बुटीबोरी येथे नवीन अध्याय सुरू करत असून, कंपनी पुणे आणि छत्रपती संभाजीनगर सोबतच आता नागपुरात आपल्या कार्याचा विस्तार करत असल्याचे पाहून आनंद होत आहे. महाराष्ट्रात यापुढेही अनेक प्रकल्प गुंतवणूकीसाठी पुढे येत राहतील, असा विश्वासही यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

सह्याद्री राज्य अतिथीगृह येथे झालेल्या या सामंजस्य करार प्रसंगी मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी.वेलारासू, उद्योग विभागाचे सहसचिव श्रीकांत पुलकुंडवार, ह्युसंग कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक सी इयान ली, वरिष्ठ सल्लागार कॅप्टन शिवाजी महाडकर, संचालक मनोजित साह, उपव्यवस्थापक नीरज हांडा उपस्थित होते.

ह्युसंग कंपनीविषयी

ह्युसंग समूह ही दक्षिण कोरियन कंपनी असून टेक्सटाईल्स, केमिकल्स, अवजड उद्योग, माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान आणि लॉजिस्टिक्स यासारख्या विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत आहे. ही कंपनी कार्बन फायबर, अरामिड फायबर, टायर कॉर्ड, ऑटोमोटिव्ह सीट बेल्ट यार्न, हाय-स्ट्रेंथ इंडस्ट्रियल यार्न आणि फॅब्रिक्स यांच्या उत्पादनात आघाडीवर आहे. ह्युसंग कॉर्पोरेशन इंडिया प्रा.लि.ची हरियाणा, मुंबई, पुणे आणि चेन्नई येथे कार्यालये आहेत.

पुणे येथील प्रकल्प २०१५ पासून कार्यरत असून येथे ३५० कर्मचारी आहेत. या कंपनीची ८४५ कोटींची वार्षिक उलाढाल आहे. छत्रपती संभाजीनगर येथील औरिक -शेंद्रा येथे ही कंपनी २०१८ पासून कार्यरत असून येथे ५०० कर्मचारी काम करत आहेत. याठिकाणीही कंपनीची वार्षिक उलाढाल १ हजार ६५० कोटी रुपयांची आहे.

## 'एकतेचा महायज्ञ'चे प्रतीक ठरलेल्या महाकुंभची सांगता - पंतप्रधान

### १४० कोटी देशवासियांच्या आस्थेचे दर्शन खरोखरच मंत्रमुग्ध करणारे

नवी दिल्ली, २७ फेब्रुवारी : महाकुंभ हा एकतेचा महायज्ञ होता असे सांगत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे की भारताला आपल्या वारशाचा अभिमान असून, आता भारत एका नव्या ऊर्जेने पुढे वाटचाल करत आहे. ही देशाचे नवे भवितव्य लिहिणाऱ्या परिवर्तनाच्या युगाची पहाट आहे, असेही त्यांनी म्हटले आहे. यंदाच्या महाकुंभ मेळ्यात प्रचंड मोठ्या संख्येने सहभागी झालेल्या भाविकांची संख्या म्हणजे केवळ एक विक्रम नसून, या संख्येने आपली संस्कृती आणि वारसा यापुढची अनेक शतके अधिक मजबूत आणि समृद्ध राहावा यासाठी भक्कम पाया रचला आहे असे पंतप्रधानांनी नमूद केले आहे. हा एकतेचा महाकुंभ यशस्वीरित्या पार पडल्याबद्दलही त्यांनी समाधान व्यक्त केले आहे. याबद्दल त्यांनी नागरिकांची मेहनत, त्यांचे प्रयत्न आणि निर्धाराबद्दल त्यांचे आभार मानले आहे. याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपले विचार एका ब्लॉगच्या माध्यमातून लिहून ते एक्स या समाज माध्यमावर सामायिक केले आहेत.

महाकुंभ संपन्न झाला... एकतेचा महायज्ञ संपन्न झाला. प्रयागराज इथे एकतेच्या महाकुंभात तब्बल ४५ दिवसांपर्यंत ज्या प्रकारे १४० कोटी देशवासियांची आस्था एकत्र, एकाच वेळी या एका पर्वाशी जोडली गेली, ते मंत्रमुग्ध करणारे आहे! महाकुंभाची सांगता झाल्यानंतर जे विचार मनात आले, त्यांना मी शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे

महाकुंभात ज्या मोठ्या संख्येने भाविकांनी सहभाग घेतला, तो केवळ एक विक्रम नाही, तर आपल्या संस्कृती आणि वारशाला सुदृढ आणि समृद्ध ठेवण्यासाठी अनेक शतकांकरता एक भक्कम पाया देखील रचला गेला आहे. प्रयागराजमधील महाकुंभ आज संपूर्ण जगभरातील व्यवस्थापन तज्ज्ञांच्या बरोबरीनेच नियोजन आणि धोरण तज्ज्ञांसाठीही संशोधनाचा विषय बनला आहे.

आज आपल्या वारशाचा अभिमान बाळगणारा भारत आता एका नव्या ऊर्जेसह पुढे वाटचाल करत आहे. ही युग परिवर्तनाची चाहूल आहे, जी देशाचे नवे भविष्य लिहिणार आहे.

## दोन वाहनांची समोरासमोर धडक !

कन्नड :- राष्ट्रीय महामार्गावर पाणपोई चौफुलीवर दोन वाहनांची समोरासमोर धडक झाल्याची घटना दि.२७ रोजी सकाळी १० वाजेच्या सुमारास घडली आहे. मालवाहतूक पिकअप वाहन क्र. जी.जे.०५ सी.डब्लू.७१९६ चाळीसगाव वरून छत्रपती संभाजीनगरच्या दिशेने जात होती तर एम.पी.४६ झे.ई.९९९२ चाळीसगावच्या दिशेने जात होती दोन्ही वाहने समोरा समोर आल्याने अपघात झाला. या अपघातात दोन्ही वाहनांच्या चालकांना किरकोळ मार लागला आहे.

## शेअर मार्केट गुंतवणुकीच्या आमिषाने १.१० कोटींची फसवणूक; आंतरराष्ट्रीय टोळीतील आरोपींना सायबर पोलिसांची बेड्या

अहिल्यानगर : शेअर मार्केटमध्ये मोठ्या परताव्याच्या आमिषाने गुंतवणूकदारांची फसवणूक करणाऱ्या आंतरराष्ट्रीय टोळीतील आरोपींना सायबर पोलिसांनी अटक केली आहे. या प्रकरणात १ कोटी १० लाख ८० हजार रुपयांची फसवणूक झाल्याचे उघडकीस आले असून, भारतातील स्थानिक आरोपी परदेशातील गुन्हेगारांच्या मदतीने नागरिकांची फसवणूक करत असल्याचे समोर आले आहे. फसवणुकीची व्याप्ती आणि पोलिसांचा तपास २७ जानेवारी २०२५ रोजी फिर्यादीने सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती की, ऑक्टोबर २०२४ ते नोव्हेंबर २०२४ या कालावधीत डचउ ऋश्चेलरश्र डशलींळींळशी नावाने व्हॉट्सॲपवरून शेअर ट्रेडिंगमध्ये गुंतवणुकीचे आमिष दाखवून २०-३० टक्के अधिक नफा मिळवून देण्याचे आश्वासन देण्यात आले. या भूलथापांना बळी पडून फिर्यादीने १ कोटी १० लाख ८० हजार रुपये गुंतवले, मात्र फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी पोलिसांकडे धाव घेतली. या प्रकरणाचा तपास करताना सायबर पोलिसांनी आर्थिक व्यवहारांचे तांत्रिक विश्लेषण केले. यातून मिळालेल्या बँक खात्यांच्या माहितीच्या आधारे पोलिसांनी महावीर कांबळे (रा. गोटेवाडी, मोहोळ, सोलापूर) याला अटक केली. त्याच्या चौकशीतून आणखी तीन साथीदार - प्रविण लॉहे, शिवाजी साळुंके आणि सागर कुलकर्णी यांचा सहभाग उघड झाला.












सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## दररोज ताक पिण्याची चळवळ लोकचळवळ व्हावी : पाटील-नागराळकर

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२७ फेब्रुवारी -**
राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात सामूहिक ताक पिण्याचा कार्यक्रम संपन्न झाला. या वेळी बसवराज पाटील नागराळकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आर के. मस्के आणि वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ.आर.बी. अलापुरे यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमात बोलताना बसवराज पाटील नागराळकर यांनी ताक पिण्याचे महत्त्व सांगितले. ते म्हणाले, ताक पिल्याने शरीरातील चांगल्या सूक्ष्मजीव जंतूंची वाढ होते आणि शरीर निरोगी राहते.

त्यामुळे दररोज ताक पिण्याची चळवळ लोकचळवळ म्हणून पुढे यायला हवी. प्राचार्य डॉ.आर.के. मस्के यांनी विद्यार्थ्यांना ताक प्राशन करण्याचा सल्ला दिला आणि निरोगी जीवनासाठी नियमित ताक पिण्याची सवय लावण्याचे आवाहन केले. या वेळी उपस्थित विद्यार्थी व शिक्षकांनी सामूहिक ताक प्राशनन करून या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवला.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी वनस्पतीशास्त्र विभाग आणि सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या प्रा. भाताडे, प्रा. लांडगे यांनी विशेष मेहनत घेतली.

### ▶▶ संक्षिप्त वृत्त...



#### राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात २५ जणांचे रक्तदान

**शिरूर अनंतपाळ, दि.२७ फेब्रुवारी -**
तालुक्यातील भिंगोली येथे दि.२५ फेब्रुवारी रोजी आयोजीत केलेल्या शिवनेरीच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष वार्षीक शिबीरात डॉ. भालचंद्र ब्लॅड बॅक लातूर व रासेयोच्या वतीने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात २५ रक्तदात्याने स्वयंस्पुर्तपणे महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, स्वयंसेवक, गावातील तरुणांनी रक्तदान केले. लातूर येथील डॉ. भालचंद्र ब्लड बँक लातूरचे दिगंबर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली महेंद्र कुमार गांधले, फरहान शेख, शेख अन्सार, सुरेखा हजारे, सरपंच सुशिला चेवले, उपसरपंच ज्ञानेश्वर चेवले, बाळासाहेब पाटील यांच्या सहकार्यातुन हे रक्तदान शिबीर घेण्यात आले. शिबिर यशस्वीतेसाठी प्रा.डॉ. अमोल इंगळे, प्रा.डॉ. पांडूरंग मुठ्ठे, सुरेंद्र कुंभार, ओमकार लिंबापूरे, तातेराव कांबळे, अमित गुम्मे, बावलगावे मयुरी, प्रणाली सुडे यांनी परिश्रम घेतले.



#### स्त्रीरोग संघटनेचा सर्वोत्कृष्ट संघटना म्हणून गौरव

**उदगीर, दि.२७ फेब्रुवारी -**
चंद्रपूर येथे नुकत्याच पार पडलेल्या अखिल महाराष्ट्र स्त्रीरोग संघटनेच्या वार्षिक सर्वसाधारण परिषदेत उदगीर स्त्री रोग संघटनेला राज्यातील सर्वोत्कृष्ट स्त्री रोग संघटना म्हणून डॉ. प्राजक्ता नितीन गुरुडे उत्कृष्ट स्त्री रोग संघटना प्रथम पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. भाजपाचे ज्येष्ठ नेते, म ाजी मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. चंद्रपूर येथे नुकत्याच पार पडलेल्या अखिल महाराष्ट्र स्त्रीरोग संघटनेच्या वार्षिक सर्वसाधारण परिषदेत अखिल भारतीय स्त्री रोग संघटनेच्या अध्यक्षा डॉ. सुनिता तांदूळवाडकर, महाराष्ट्र स्त्री रोग संघटनेचे अध्यक्ष डॉ.किरण कुर्तकोटी, सचिव डॉ. बिपिन पंडित, परिषदेच्या अध्यक्षा डॉ. मनीषा घाटे, परिषदेच्या सचिव डॉ. कल्पना गुलवाडे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. उदगीर स्त्री रोग संघटनेच्या अध्यक्षा डॉ. सविता पदातुरे, डॉ. सुप्रिया जगताप, सचिव डॉ. प्राजक्ता नितीन गुरुडे व कोषाध्यक्षा, सह सर्व महिला डॉक्टर, उपाध्यक्षा, सहसचिव, वरिष्ठ पदाधिकारी, पदाधिकारी सदस्या यांच्या कुशल नेतृत्वात उदगीर स्त्री रोग संघटनेस हा पुरस्कार मिळाला आहे. याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## ▶▶ अखेर किल्लारीकरांचे तालुका निर्मितीचे स्वप्न पुर्ण...

# अपर तहसिल कार्यालय, निवासस्थानाच्या बांधकामासाठी २८ कोटींचा निधी मंजूर

### ▶▶ आ. अभिमन्यू पवारांच्या प्रयत्नाला यश

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.२७ फेब्रुवारी -**
औसा विधानसभा म तदारसंघांतील कासारसिरसी अपर तहसील कार्यालयाचा विषय मार्गी लागून त्याठिकाणी अपर तहसील कार्यालयाचे बांधकाम सुरू आहे. तर याच मतदारसंघांतील किल्लारी अपर तहसिल कार्यालयाच्या इम ारत व कर्मचारी निवासस्थानाच्या बांधकामासाठी २८ कोटींचा निधी मंजूर झाला आहे. स्वतंत्र किल्लारी अपर तहसीलदार कार्यालयामुळे औसा तहसील कार्यालयावरील भार कमी होणार असून नागरिकांना वेळेवर नागरी सुविधा मिळणार आहेत.

केवळ भूलथापा न मारता राजकीय इच्छाशक्ती व वजन वापरून लोक प्रतिनिधी नागरिकांच्या समस्या सोडवून मतदारसंघाला विकासाच्या एक दिशेने घेऊन जावू शकतात. हे आमदार अभिमन्यू पवार यांनी आपल्या कामातून मतदार संघांतील नागरिकांना वारंवार दाखवून दिले आहे. यामध्ये विधानसभा निवडणुकीत नागरिकांना किल्लारी येथे अपर तहसीलदार कार्यालयाचा दिलेला शब्द आमदार पवारांनी पुर्ण केला आहे.



गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या किल्लारी अपर तहसीलदार कार्यालयाच्या मंजुरीचा प्रश्न काही दिवसांपूर्वी मार्गी लागला असून या कार्यालयाच्या बांधकामासाठी तब्बल २८ कोटींचा निधी त्यांनी मंजूर करून घेतला आहे.

या कार्यालयामुळे किल्लारीचा विकास होण्यास सुरुवात झाली असून अपर तहसीलदार कार्यालय इमारत बांधकाम करण्यासाठी १३ कोटी ५० लक्ष रु. तर अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी निवासस्थान बांधकाम करण्यासाठी १४ कोटी ४८ लक्ष रु. निधी मंजूर करण्यात आला आहे. यामध्ये एकूण २७ निवासस्थानांचे बांधकाम करण्यात येणार आहे.

तालुक्यातील दळणवळण, सोयी सुविधा विचारात घेता किल्लारी परिसरातील नागरिकांना दैनंदिन म हसूल विषयक प्रशासकीय काम काजासाठी किल्लारी अपर तहसील सोयीचे ठरणार आहे.

तसेच महसुली दाखले याच तहसील कार्यालयामध्ये उपलब्ध होऊन परिसरातील ग्रामस्थांची गैरसोय दूर होणार आहे. काही राजकीय नेत्यांनी १९९३ च्या भूकंपानंतर किल्लारी तालुका करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र गेल्या तीन दशकांपासून हा विषय प्रलंबित असताना आ. अभिमन्यू पवार यांना आमदार म्हणून काम करण्याची संधी मिळाल्यानंतर त्यांनी आपले राजकीय वजन वापरून किल्लारी येथे अपर तहसीलदार कार्यालयाच्या माध्यमातून किल्लारी तालुका निर्मितीच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे.

#### मतदारसंघात दोन अपर कार्यालयामुळे जनतेची सोय

किल्लारी व कासारसिरसी येथे अपर तहसील कार्यालयाच्या निर्मितीमुळे या भागातील नागरिकांना तहसील संबंधित भागातील महसूली कामांसाठी नागरिकांना मदत होणार आहे. जनभावनेचा आदर करून मतदारसंघांतील नागरिकांच्या सोयीसाठी निवडणुकीपूर्वी किल्लारी येथे पदनिर्मितीसह स्वतंत्र अपर तहसीलदार कार्यालय स्थापित करण्यास मंजुरी मिळवून आणली होती.किल्लारी कारखाना, स्वतंत्र किल्लारी अपर तहसीलदार कार्यालय व स्वतंत्र किल्लारी तालुका च्या माध्यमातून किल्लारीला नववैभव मिळणार असल्याचा विश्वास आ. पवार यांनी यावेळी व्यक्त केला आहे.

## शिरूर अनंतपाळमध्ये घरफोडी; चार लाख ६० हजाराचे सोने व चांदीचे दागिने लपांस



**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.२७ फेबुवारी**
शहरातील समता नगर येथे अज्ञात चोरट्याने घर फोडी करून जवळपास ४ लाख ६० हजार रुपयेचे सोन्या चांदीचे दागिणे व रोख रक्कम दि.२३ दरम्यान दाराचे कुलूप तोडून पळविल्याची घटना घडल्या संदर्भात शिरूर अनंतपाळ पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत माहिती अशी की, शहरातील समता नगर येथे राहणाऱ्या अमीनाबी जैनोददीन शेख हे दि.२३ ते २४ फेबुवारी दरम्यान फिर्यादी घरात नसल्याचा फायदा घेवुन त्यांच्या बंद घराचे दाराचे कुलूप तोडुन घरात प्रवेश करून कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादी, फिर्यादीचा मुलगा यांच्या रुममधील कपाटात ठेवलेले अंदाजे ३ लाख ८७ हजार रूपयांचे १० तोळे ८ ग्रॉम सोने तसेच १५ तोळे चांदी ३ हजार रूपये किमंतचे असे ३ लाख ९० हजार रूपचे सोन्या-चांदीचे दागीने व ७० हजार रोख रक्कम असा एकुण ४ लाख ६० हजार रुपेचा माल चोरी करुन घेवुन गेला आहे.

या संदर्भात फिर्यादी अमीनाबी जैनोददीन शेख यांच्या फिर्यादीवरून अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक विठ्ठल दराडे यांच्या म ार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गजानन अन्सापूरे करीत आहेत. या घटनेने परिसरात नागरीकांत घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे.

▶▶ या संदर्भात शिरूर अनंतपाळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विठ्ठल दराडे यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले की, उपविभागीय पोलीस अधिकारी मनिष कल्याणकर यांच्यासोबत आम्ही घटनास्थळी भेट देऊन डॉग स्कॉडला पाचारण केले होते. चोरांचा कोणताच पुरावा नसल्यामुळे पोलीस अधिक्षक कार्यालयाचे फिंगर प्रिंटच्या पथकाचे प्रमुख पुणेकर व त्यांचे पथक येवून तपासणी करून गेले. पुढील तपास सुरू असल्याचे पोलीस निरीक्षक दराडे यांनी सांगितले.

### कवठाळ येथील ३८ कुटुंबांचे घरकुल स्वप्न साकार

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.२७ फेब्रुवारी -**
महाराष्ट्र राज्यात पंतप्रधान आवास योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीअंतर्गत आज राज्यभरातील २० लाख लाभार्थ्यांना मंजुरी पत्र वाटपाचा महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आला. तसेच, १० लाख घरकुल लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर पहिला हप्ता थेट जमा करण्यात आला. ही योजना केवळ घरकुल उपलब्ध करून देण्यासाठी नसून, गरजू कुटुंबांना सन्मानाने जगण्याचा आत्मविश्वास देणारी आहे.

या योजनेच्या अंमलबजावणी अंतर्गत कवठाळ ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने गावातील ३८ लाभार्थ्यांना घरकुल मंजुरी आदेश वाटप करण्यात आले. तसेच, प्रत्येक लाभार्थ्याच्या बँक खात्यावर १५,००० रुपये जमा करण्यात आले.

## स्वातंत्र्यवीर विनायक सावरकरांना अहमदपूरमध्ये अभिवादन



**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.२७ फेब्रुवारी -**
स्वातंत्र्यवीर विनायक दाम ोदर सावरकर यांच्या ५९ व्या पुण्यतिथीनिमित्त २६ फेब्रुवारी रोजी सकाळी अहमदपूरमधील सावरकर चौकात भगव्या ध्वजाचे ध्वजारोहण व सावरकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन स्वातंत्र्वीरांना अभिवादन करण्यात आले. भारत माता की जय व वंदेमातरमचा जयघोष करत वंदेमातरम गीत घेण्यात आले.

याप्रसंगी ज्येष्ठ विचारवंत प्रा.डॉ. भूषणकुमार जोरगुलवार, भाजपचे डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी, ॲड. अमित रेड्डी, ॲड. भारत चामे, तसेच कलावती व शिवमूर्ती भातांब्रे, प्रेमा वतनी, धनंजय जोशी, राजू कल्याणे, कपिल बिरादार, प्रमोद कुलकर्णी, बापू शिरुरकर, अभय निलंगेकर, अशोक गायकवाड, कृष्णा हेरकर, गौरव चवंडा, डॉ. सुहास जोशी, अवधूत जोशी, लक्ष्मण अलगुले, ॲड. दिलीप कुलकर्णी, मधुसूदन चेरेकर उपस्थित होते.

यावेळी सावरकरांच्या पुण्यतिथीनिमित्त महात्मा गांधी म हाविद्यालयात चाळीस विद्यार्थ्यांनी रक्तदान केले.

## शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी अत्यावश्यक

**तभा वृत्तसेवा**
**देवणी, दि.२७ फेब्रुवारी -**
कृषी क्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करुन शेतकऱ्यांना जलदगतीने सेवा देण्यासाठी युनिक आयडीचा उपयोग होणार आहे.

यात शेतकऱ्यांच्या नावावर शेतजम ीन असेल तर त्यांना फार्मर आयडी अर्थात शेतकरी ओळख क्रमांक दिला जाणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना कृषीविषयक सेवा, सुविधा तसेच शासकीय योजनांचे लाभ पारदर्शकपणे मिळू शकतील.

यासाठी 'ग्री स्टॅक' नावाने डिजिटल प्लॅटफॉर्म तयार करण्यात आला आहे. याची नोंदणी प्रत्येक महा-ई-सेवा केंद्रावर सुरू असून सर्व शेतकऱ्यांचा फार्मर आयडी तयार होण्यासाठी हा उपक्रम प्रशासनाकडून प्राधान्याने हाती घेण्यात आला.

तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढून घ्यावे, असे आवाहन तालुका कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

ग्रिस्टॅकमुळे पीएम किसान सन्मान योजनेंतर्गत अनुदान प्राप्त करण्यासाठी आवश्यकतेच्या अटी पूर्ण करून लाभ प्राप्त करण्यामध्ये सुलभता येईल. शेतकऱ्यांना पिकासाठी कर्ज मिळवण्यासाठी किसान क्रेडिट कार्ड आणि नैसर्गिक आपत्ती नुकसान भरपाई, कृषी इन्फ्रास्ट्रक्चर फंड व शेतीच्या विकासासाठी इतर कर्जे उपलब्ध करून घेण्यात सुलभता राहील.

बोरोळ येथे महा-ई-सेवा केंद्रावर शेतकऱ्यांचे फार्मर आयडी काढून शेतकऱ्यांना वाटप करताना कृषी सहाय्यक रितेश टोकले, शेतकरी प्रताप कोयले, गणेश इदलकंठे, ज्ञानोबा येणकुरे, नारायण येणकुरे, संभाजी म्हेत्रे, सावित्रा बिरादार, सविता सुर्यवंशी इत्यादी शेतकरी उपस्थित होते.

## श्रध्दा जरुर ठेवा पण अंधश्रध्दा बाळगू नका : माधव बावगे

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.२७ फेब्रुवारी -**
श्रद्धा जरूर ठेवा पण अंधश्रद्धा बाळगू नका, अंधश्रद्धा ही विकासाला बाधक असून विज्ञानाच्या व तंत्रज्ञानाच्या योगात ही आजचे नागरिक अंधश्रद्धा बाळगत आहेत. अंधभक्त नागरिक अंधश्रद्धे पोटी देव देवतांना कोंबड्या बकऱ्याचे बळी देत आहेत. त्यामुळे समाजाची प्रगती होण्या ऐवजी अधोगती होत असल्याचे मत अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्याध्यक्ष माधव बावगे यांनी व्यक्त केले.

तालुक्यातील भिंगोली येथे शिवनेरी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे वार्षिक विशेष शिबिर सुरू आहे. यानिमित्त दि.२५ फेब्रुवारी रोजी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गावच्या सरपंच सुशीला चेवले या होत्या. यावेळी मंचावर सेवानिवृत्त मुख्याध्यापक नरहरे, प्रा.डॉ. मारोती गायकवाड, प्रा.डॉ. सतिष कुंडलवार, बाळासाहेब पाटील, डॉ.पांडूरंग मुठ्ठे यांची उपस्थिती होती. यावेळी माधव बावगे सरांनी ग्रामस्थ व स्वयंसेवक विद्यार्थ्यांना विविध जादूचे प्रयोग करून दाखवून लोकांच्या मनातील अंधश्रद्धा व भीती दूर करण्याचा प्रयत्न केला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. अमोल इंगळे यांनी केले. यशस्वीतेसाठी स्वयंसेवक विद्यार्थी प्रतिनिधी ओमकार लिंबापुरे, विद्यार्थीनी प्रतिनिधी प्रणाली सुडे, तातेराव कांबळे, जयेश होळकर व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

## महाशिवरात्रीनिमित्त रामलिंगेश्वराच्या दर्शनासाठी भक्तांची अलोट गर्दी

▶▶ पहाटेपासून मांजरा नदीत स्नान... ▶▶ पूजा-अर्चा आणि जयघोषाने परिसर दुमदुमला...



**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.२७ फेब्रुवारी -**
महाशिवरात्रीनिमित्त देवणी तालुक्यातील जवळगा येथील प्रसिद्ध श्री रामलिंगेश्वर मंदिरात भक्तांची प्रचंड गर्दी झाली होती. पहाटेपासूनच हजारो शिवभक्तांनी मांजरा नदी पात्रात स्नान करून श्री रामलिंगेश्वराच्या दर्शनासाठी मंदिरात हजेरी लावली. रामलिंग म हाराज की जय, हर हर महादेव या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता.

जवळगा, हिसामनगर, धनगरवाडी, वाघनाळवाडी, साकोळ, वलांडी आणि पंचक्रोशीतील भाविकांनी पहाटेपासून पायी चालत येऊन दर्शन घेतले. मंदिरात महाशिवरात्रीच्या महापूजेला विशेष महत्त्व असून, हालगीच्या गजरात भक्त सहकुटुंब दर्शनासाठी आले होते.

दरम्यान, प्रयागराज येथे आज शेवटचे शाहीस्नान असल्याने मांजरा नदीच्या काठावर स्नानासाठी भाविकांची विशेष गर्दी होती. सकाळी महापूजा, मंत्रजप आणि आरती करण्यात आली. संध्याकाळपर्यंत भक्तांची गर्दी वाढत होती. महाशिवरात्रीनिमित्त आकर्षक विद्युत रोषणाई व फ ुलांच्या सजावटीने मंदिर परिसर उजळून निघाला होता. प्रतीकात्म क महादेवाची मूर्ती आणि पिंडीचा देखावा उभारण्यात आला होता. संपूर्ण मंदिर परिसरात भगवे ध्वज लावण्यात आले होते.

श्री रामलिंगेश्वर देवस्थान कमिटीच्या वतीने केळी आणि पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आली होती.

महाशिवरात्रीच्या धार्मिक विधींचे पौराहित्य राजकुमार स्वामी यांनी केले. भाविकांच्या भक्तिभावाने संपूर्ण मंदिर परिसर भक्तिरसात न्हाल्याचे दृश्य पाहायला मिळाले.

## छत्रपती शिवराय हे शेतकरी व सर्वसामान्यांचे स्वराज्य निर्माते : प्रा. जाधव

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.२७ फेब्रुवारी -**
आदिलशाही, निजामशाही, मोगलशाही या सर्व शासनकर्त्यांच्या काळात शेतकऱ्यांवर अनन्वित अत्याचार झाले. शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. त्यामुळे त्याच्यावरती अन्याय होता कामा नये, अशी छत्रपती शिवरायांची भूमिका होती. शेतकऱ्यावर अस्मानी आणि सुलतानी संकट कायम स्वरूपी राहिले आहे. त्यातून शेतकऱ्यांना बाहेर काढण्यासाठीच छत्रपती शिवरायांनी शेतकरी व सर्व सामान्यांचे स्वराज्य निर्माण केले होते, असे मत शिवश्री प्रा. अजितकुम ार जाधव यांनी व्यक्त केले.



ते स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व महाराष्ट्र उदयगिरी म हाविद्यालय, उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बहि:शाल व्याख्यानमालेतील गुडसूर येथे पहिले पुष्प गुंफतांना 'शेतकऱ्यांचा राजा : छत्रपती शिवराय' या विषयावर बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे जेष्ठ सदस्य तथा माजी आमदार प्रा. मनोहरराव पटवारी हे होते. यावेळी व्यासपीठावर प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के, सरपंच उत्तम सूर्यवंशी, भारत पारसेवार, नागेश नवाडे, डॉ. दत्ताहरी होनराव यांची विशेष उपस्थिती होती. पुढे बोलताना प्रा. जाधव म्हणाले, छत्रपती शिवरायांच्या कार्यामागे संतांच्या विचारांची प्रेरणा होती. 'जे का रंजले गांजलेश्र त्यासी म्हणे जो आपुलेश्रश्र तोचि साधू ओळखावाश्र देव तेथेची जाणावाश्रश्र' अशा प्रकारचे अभंग संत तुकाराम महाराजांनी रचले होते, त्याचा परिणाम छत्रपती शिवरायांवरती झाला. छत्रपती शिवरायांनी जात आणि धर्माचा विचार न करता गुणवत्तेवर आधारित स्वराज्य निर्माण केले. इतिहासाची स्व-लाभाकरिता मोडतोड न करता महापुरुषांचा खरा इतिहास तरुणांनी समजून घेतला पाहिजे, असे आवाहन उपस्थितांना केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय बहि:शाल केंद्राचे समन्वयक डॉ. गौरव जेवळीकर यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रा. प्रवीण जाहुरे यांनी मानले. यावेळी नागरिक उपस्थित होते.

## शिरूर अनंतपाळ बस फेऱ्या वाढविण्याची मागणी

### आ. संभाजी पाटील निलंगेकर यांचे पत्र...

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.२७ फेब्रुवारी**
निलंगा विधानसभा म तदारसंघातील शिरूर अनंतपाळ शहरातून नागरिकांच्या प्रवास सोयीसाठी बसच्या फेऱ्या वाढविण्याची मागणी आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी लातूर परिवहन विभागाचे विभागीय नियंत्रक यांना पत्राद्वारे केली आहे.

शिरूर अनंतपाळ हा तालुक्याचे ठिकाण आणि जिल्ह्याचे मध्यवर्ती स्थान आहे, जिथे बाजारपेठ आणि शाळकरी विद्यार्थ्यांची वर्दळ कायम असते. मात्र, अपुऱ्या बस फेऱ्यांम ुळे नागरिकांना आणि विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी पत्रात पुढील बस फ



ेऱ्यांच्या वाढीची मागणी केली आहे. शिरूर अनंतपाळ ते लातूर, शिरूर अनंतपाळ ते निलंगा, शिरूर अनंतपाळ ते उदगीर, शिरूर अनंतपाळ ते अहमदपूर शटल सेवा, लातूर-शिरूर अनंतपाळ, नळेगाव मार्गे किमान ४ फेऱ्या, उदगीर ते पुणे जाणारी शिरूर अनंतपाळ मार्गे जाणारी १ बस, राणी अंकुलगा ते निलंगा व उदगीर, साकोळ निलंगा चालू असलेली बस शिरूर अनंतपाळ मार्गे पुर्ववत करावी. निलंगा - नांदेड जाणारी बस शिरूर अनंतपाळ मार्गे पूर्वी चालू असलेल्या निलंगा-म ुखेड, निलंगा-परभणी, निलंगा-वसमत या बसगाड्या पुर्ववत सुरु कराव्यात.

निवेदनावर नगराध्यक्ष गणेश धुमाळे, उमाकांत देवंगरे, सुमीत दुरुगकर, शंकर बेंबळगे, विशाल गायकवाड, शिवराज शेरसांडे, दत्ता शिंदे, सचिन सांगवे यांच्या सह्या आहेत.

## इलेक्रामा २०२५ मध्ये २० स्टार्टअप्स करत आहेत स्पर्धा

छत्रपती संभाजीनगर – काल श्री पीयूष गोयल यांच्या प्रभावी आणि ऊर्जादायी भाषणानंतर, इलेक्रामा २०२५ च्या चौथ्या दिवशीही तोच उत्साह कायम राहिला. आज बहुप्रतीक्षित इलेक्ट्राव्हर्स स्पार्क्सच्या तिसऱ्या आवृत्तीचे उद्घाटन करण्यात आले, जे आयईईएमए चे स्टार्टअप्ससाठी प्रमुख व्यासपीठ आहे. या मंचाने सुरुवातीच्या आणि प्रगत टप्प्यातील स्टार्टअप्सना एकत्र आणले, जिथे त्यांनी ऊर्जा, इलेक्ट्रॉनिक्स, एआय, ऑटोमेशन आणि शाश्वततेसाठी नव्याने विकसित केलेले तंत्रज्ञान सादर केले. या स्पर्धात्मक कार्यक्रमात २० अग्रगण्य स्टार्टअप्सनी भाग घेतला, ज्यांनी उद्योगात आमूलाग्र बदल घडवण्याची क्षमता असलेल्या अत्याधुनिक उपायांची प्रस्तुती केली.

## महिलांना आत्मनिर्भर इन्व्हेस्टर बनण्याचे दिले शिक्षण

छत्रपती संभाजीनगर – सीडीएसएल इन्व्हेस्टर प्रोटेक्शन फंड यांनी महाराष्ट्रातील लोणी येथे महिलांसाठी गुंतवणूक जागरूकता कार्यक्रम आयोजित केला.हा उपक्रम प्रवरा रुरल एज्युकेशन सोसायटीच्या इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी, चंद्रपूर हसनापूर रोड, लोणी येथे राबविण्यात आला.या कार्यक्रमाचा उद्देश वित्तीय साक्षरता वाढविणे आणि गुंतवणूकदारांना भांडवली बाजारातील गुंतवणुकीबाबत सूज्ञ निर्णय घेण्यासाठी सक्षम करणे हा होता, तसेच गुंतवणुकीच्या मूलभूत तत्त्वांवरही चर्चा करण्यात आली.या उपक्रमाचा अधिकाधिक लोकांना लाभ मिळावा, म्हणून कार्यक्रम मराठी भाषेत घेण्यात आला. व्याख्यात्यांनी विद्यार्थ्यांसाठी गुंतवणुकीशी संबंधित संकल्पना सोप्या करून सांगितल्या, ज्यामध्ये भांडवली बाजाराची ओळख आणि डिपॉझिटरी सेवा यांसारख्या महत्त्वाच्या विषयांचा समावेश होता.

## एसी आणि एयर कूलरची त्याच दिवशी डिलिव्हरीची सुविधा

छत्रपती संभाजीनगर : क्रोमाने आपल्या ग्राहकांना वाढत्या उष्म्यापासून दिलासा मिळवून देण्यासाठी एयर कंडिशनर व एयर कूलरची डिलिव्हरी त्याच दिवशी देण्याची सुविधा सुरु केली आहे. क्रोमाच्या गॅजेट्स आणि छोट्या उपकरणांची त्वरित डिलिव्हरी सेवा अतिशय यशस्वीपणे सुरु आहे. त्यापासून प्रेरणा घेऊन या ब्रँडने आपल्या ग्राहकांसाठी उन्हाळ्यातही गारवा मिळवणे सोपे केले आहे. क्रोमाचे ग्राहक आता जराही विलंब न लावता लगेचच गारव्याचा आनंद घेऊ शकतील.

## आईकू नियो 10आर गेमिंग अनुभवासह

नवी दिल्ली,: उच्च-कार्यक्षमता स्मार्टफोन ब्रँड आईकू ११ मार्च रोजी आईकू नियो १० आर लाँच करण्यासाठी सज्ज आहे. तरुण वापरकर्ते, मोबाईल गेमर्स आणि तंत्रज्ञानाची जाण असलेल्या वापरकर्त्यांसाठी डिझाइन केलेला हा स्मार्टफोन शक्तिशाली कामगिरी, अल्ट्रा-स्मूथ गेमिंग, दीर्घ बॅटरी लाइफ आणि इमर्सिव्ह डिस्प्ले अनुभव देतो, जो त्यांच्या वेगवान जीवनशैलीसाठी परिपूर्ण आहे. आईकू नियो १० आर मध्ये स्नॅपड्रॅगन ८ड झेन ३ प्रोसेसर आहे जो प्रगत ४एनएम तंत्रज्ञानावर बनवलेला आहे. हे जलद आणि शक्तिशाली कामगिरी देते. गेमिंगसाठी विशेषतः डिझाइन केलेला, हा फोन ९० फ्रेम प्रति सेकंद वेगाने सहज गेमिंग प्रदान करतो जो कोणत्याही व्यत्ययाशिवाय ५ तासांपर्यंत चालतो. हे ६०४३ मिमीऑ व्हेपर कूलिंग चेंबरसह येते, जे फोनला जास्त गरम होण्यापासून रोखते. २००० हर्ट्झ टच सॅम्पलिंग रेटमुळे टच कंट्रोल्स जलद काम करतात. तसेच, ई-स्पोर्ट्स मोड गेमिंग कामगिरी वाढवतो, ज्यामुळे वापरकर्त्यांना एक सुरळीत आणि शक्तिशाली गेमिंग अनुभव मिळतो.

## सादर आहे एमजी कॉमेट ब्लॅकस्टॉर्म

छत्रपती संभाजीनगर – जेएसडब्ल्यू एमजी मोटर इंडिया, देशातील आघाडीची इलेक्ट्रिक कार निर्माता कंपनी, यांनी कॉमेट ईव्ही पोर्टफोलिओमध्ये ब्लॅकस्टॉर्म एडिशन सादर केली आहे, ज्यामुळे भारताच्या स्ट्रीट-स्मार्ट ईव्ही ला अधिक स्टाईल आणि आकर्षण मिळाले आहे. कॉमेट ब्लॅकस्टॉर्म टॉप व्हेरियंट म्हणून एक्स-शोरूम किंमत ७.८०ङ रुपए + बैटरी रेंटल २.५ रुपए/किमी. रूपयांमध्ये लॉन्च करण्यात आली आहे. स्टायलिश आणि तंत्रज्ञानाने परिपूर्ण शहरातील प्रवासासाठी उत्कृष्ट पर्याय शोधणारे ग्राहक आता आपल्या जवळच्या एमजी डिलरशिपला भेट देऊन नवीन एमजी कॉमेट ब्लॅकस्टॉर्म बुक करू शकतात. बुकिंगसाठी ११,००० रूपये भरावे लागतील.

## हेक्टर खरेदीदारांसाठी 'पॉवर पॅक' ऑफर

नाशिक : जेएसडब्ल्यू एमजी मोटर इंडिया ने आज हेक्टरच्या संभाव्य खरेदीदारांसाठी पॉवर पॅक योजना जाहीर केली. ही खास ऑफर पाच आकर्षक फायदे एकत्र देते, केवळ ४.९९% व्याजदराने फायनान्सिंग (आरओआय), अतिरिक्त सुरक्षिततेसाठी एक्सटेंडेड वॉरंटी, वाहनाला पर्सनल टच देण्यासाठी फ्री ॲक्सेसरीज, अखंड प्रवासासाठी रोडसाइड असिस्टंस आणि रोड टॅक्स (आरटीओ) मध्ये ५०% सूट.*ही एकत्रित बचत २.४० लाख रुपयांपर्यंत जाऊ शकते, ज्यामुळे हेक्टर एसयूव्ही प्रेमींसाठी अधिक परवडणारी आणि आकर्षक निवड ठरते. ३१ मार्च २०२५ पर्यंत लागू असलेली ही मर्यादित कालावधीसाठीची ऑफर हेक्टरला एसयूव्ही सेगमेंटमध्ये सर्वोत्तम मूल्य पर्याय म्हणून अधिक मजबूत करते. तसेच, ही ऑफर ग्राहकांना सेडान किंवा छोट्या एसयूव्ही वरून अपग्रेड करून भारतातील पहिली इंटरनेट कार – एमजी हेक्टर या लोकप्रिय मिड-साइज एसयूव्ही ची निवड करण्यास देखील सक्षम करते.ही पुढाकार हेक्टरच्या एसयूव्ही सेगमेंटमधील सर्वोत्तम मूल्य आणि रिसेल क्षमतेतील आघाडीला अधोरेखित करते.

## नथिंग ने (३ए) सीरिजचे संपूर्ण डिझाइन सादर केले

मुंबई – नथिंगच्या स्मार्टफोनचे अनावरण फारच अनोख्या रितीने म्हणजेच नॉर्वेजिअन फर्म १च्या नीओ गामा या ह्युमनाइड रोबोच्या साह्याने करण्यात आले. जगभरात पहिल्यांदाच अशाप्रकारे एखाद्या स्मार्टफोनचे अनावरण झाले आहे. तर दुसरीकडे, डिझाइन डायरेक्टर ॲडम बेट्स नथिंगच्या यूट्यूब टीमसोबत डिझायनिंगची प्रक्रिया, प्रेरणा याबद्दल चर्चा करत होते. फोन (३ ए) सीरिजमधील पेरिस्कोप कॅमेरा लेआऊटच्या संकल्पनेबद्दलही त्यांनी चर्चा केली. फोन (३ए) सीरिजचे संपूर्ण स्पेसिफिकेशन ४ मार्च रोजी दुपारी ३.३० वाजता (भारतीय वेळेनुसार) सादर करण्यात येईल.

## कामाच्या ठिकाणी आणि क्लासरुममध्ये संवादाचे भविष्य सादर

नवी दिल्ली – शार्प बिझनेस सिस्टम्स (इंडिया) ने आज पिक्सेल एज लॉन्च करण्याची घोषणा केली – एक इंटरॅक्टिव्ह स्मार्ट बोर्ड जो अभिमानाने भारतात बनवला गेला आहे आणि विशेषतः बी२बी ग्राहकांसाठी डिझाइन केला आहे. या अत्याधुनिक स्मार्टबोर्डचा उद्देश आधुनिक कार्यस्थळे आणि शैक्षणिक संस्थांमध्ये संवाद आणि सहकार्यात क्रांती घडवणे आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि वापरकर्ता-केंद्रित वैशिष्ट्यांचे संयोजन करून, पिक्सेल एज संघ कसे कनेक्ट होतात, विचारमंथन करतात आणि नवोन्मेष कसा करतात हे पुन्हा स्पष्ट करते. हैदराबादमधील प्रतिष्ठित शार्प कनेक्ट झोन ग्राहक रोड शोमध्ये सादर झालेल्या या कार्यक्रमात एसएमई, मोठे कॉर्पोरेट्स आणि शार्प भागीदारांसह ३०० हून अधिक उपस्थित होते.

## विवो इग्नाइट २०२५ ला मोठे यश मिळाले

नवी दिल्ली – भारतातील एकूण ८५% जिल्ह्यांपैकी ६६०+ जिल्ह्यांमधील ९,००० शाळांमधून ३७,००० हून अधिक नोंदणींसह, 'व्हिवो इग्नाइट'च्या तिसऱ्या आवृत्तीच्या जबरदस्त यशाची घोषणा करताना विवोला आनंद होत आहे. नीती आयोगाच्या निवडक ११२ जिल्ह्यांपैकी ८० जिल्ह्यांनी यात भाग घेतला. हा उपक्रम तरुण नवोन्मेषकांना सक्षम करतो आणि त्यांना देशभरातील व्यासपीठांवर सहभागी होण्याची संधी देतो, ज्यामुळे त्याची सखोल पोहोच आणि प्रभाव दिसून येतो. 'टेक फॉर गुड' या थीम अंतर्गत इयत्ता ८ वी ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी ५,६०० हून अधिक नाविन्यपूर्ण प्रकल्प कल्पना सादर केल्या. या नोंदींमध्ये, विद्यार्थ्यांनी सामाजिक समस्या सोडवण्याची त्यांची क्षमता आणि संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास ध्येयांप्रती (णछ डऊग्री) त्यांची वचनबद्धता दाखवली. या प्रचंड सहभागातून भारतातील तरुणांची तंत्रज्ञानाप्रती असलेली सर्जनशीलता आणि आवड दिसून येते. उल्लेखनीय म्हणजे, या वर्षीचा सहभाग गेल्या वर्षीच्या तुलनेत दुप्पट होता, ज्यामुळे उपक्रमाची व्याप्ती आणि प्रभाव आणखी वाढला.

# मातृभाषा दिनाचा 'कॅन्सलेशन'चा समारंभ हेड पोस्टात उत्साहात



छत्रपती संभाजी नगर मधील जुन्या बाजार मधील मुख्य पोस्ट ऑफिस मध्ये आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिनाचा कॅन्सलेशनचा समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जुन्या पोस्ट ऑफिसचे प्रवर डाकपाल सुरेश बनसोडे हे होते. तर कार्यक्रमाचे उद्घाटन टपाल तिकीट संग्रह सुधीर कोर्टीकर यांच्या हस्ते मातृ भाषा दिनाचा कॅन्सलेशनचा विशेष शिक्का पाकीटावर व पोस्ट कार्डावर उमटवून करण्यात आले.

अध्यक्षीय भाषणातून जुन्या पोस्ट ऑफिसचे प्रवर डाकपाल सुरेश बनसोडे म्हणाले. १९९९ पासून २१ फेब्रुवारी हा दिवस आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन म्हणून साजरा केला जातो. मराठी मातृभाषा दिन हा कुसुमाग्रजांचा जन्मदिवस आहे तो दिवस म्हणून पाळला जातो. आज जगात ८३०० भाषा बोलल्या जातात. पण युनेस्कोने मान्यता दिलेल्या १४०० भाषाच कायदेशीर रित्या मान्यताप्राप्त आहेत असेही प्रवर डाकपाल सुरेश बनसोडे यांनी सांगितले. तर उद्घाटन पर भाषणांमधून टपाल तिकीट संग्रह सुधीर कोर्टीकर म्हणाले आज भारतामध्ये देखील मातृभाषा दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. भारतामध्ये साधारणता १६५२ भाषा ह्या बोलल्या जातात. मात्र त्यापैकी १३६५ भाषा या केवळ मातृभाषा म्हणून त्यास मान्यता मिळालेली आहे. जुन्या बाजार पोस्ट ऑफिस मध्ये मातृदिनाचा हा कॅन्सलेशन चा समारंभ यशस्वी करण्यासाठी उपडाकपाल प्रकाश अहिरे, एपीएममेलचे विनय चामनीकर, वाय. जे .पेठाने, राज बेरवाल, प्रवीण शिंदे, शिवशंकर पटेल, हरीश नागरगोजे, लखन वैष्णव, संदीप पडस्वान, रोहिणी कोरडे, यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाच्या प्रसंगी टपाल तिकीट संग्रहक आणि त्याची आवड असणारी मुले यांना विशेष कॅन्सल केलेली पाकिटे आणि पोस्टकार्ड भेट देण्यात आली.

# नाथ, आश्रम वेरूळ येथे संगीतमय भागवत कथेचे आयोजन



खुलताबाद प्रतिनिधी : वेरूळ येथील सद्गुरु साध्वी आक्काताई महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली नाथ आश्रम वेरूळ येथे संगीतमय भागवत कथा प्रवक्ते अशोक महाराज, घुंगरे सावंगी नाशिक यांच्या मधुर वाणीतून दि १ ते ८ मार्च दरम्यान आयोजन करण्यात आले असून कथेची वेळ सायंकाळी ६ ते ९ या वेळात होणार आहे

तसेच सकाळी ८ ते १२ या वेळेत ज्ञानेश्वरी, ग्रंथ पारायण.

दि. ४ ते ६, दत्त, अनघा लक्ष्मी महा याग यज्ञ व, रोज ३ ते ४ या वेळात, सुभाष बाबा यांचे भक्तासाठी प्रवचन होणार आहे या भागवत कथा दरम्यान, विविध धार्मिक कार्यक्रम, होणार असून या दरम्यान संत महानतांच्या प्रमुख उपस्थितीत हा धार्मिक सोहळा संपन्न होणार आहे यासाठी भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने या भागवत कथेसाठी उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आवाहन नाथ आश्रम प्रमुख सद्गुरु साध्वी आक्काताई जी महाराज यांनी केले आहे. या भागवत कथा दरम्यान, विविध धार्मिक कार्यक्रम चे आयोजन करण्यात आलेले असून या दरम्यान संत महानतांच्या प्रमुख उपस्थितीत हा धार्मिक सोहळा संपन्न होणार असून दि ८ मार्च रोजी सकाळी ११त १ पर्यंत काल्याच्या किर्तन सेवा स्वामी अरुणात गिरीजी महाराज अडबंगनाथ संस्थान भामाठाण तालुका श्रीरामपूर यांची होईल

त्यानंतर, भारतीय जनता पार्टीचे गंगापूर खुलताबाद विधानसभेचे आमदार प्रशांत बन्सीलाल बंब यांच्यावतीने काल्याच्या कीर्तनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी महाप्रसादा चे आयोजन करण्यात आले आहे.

# दिपक गिरी यांचा हरहर महादेव भक्तीगितांचा कार्यक्रम रंगला



छत्रपती संभाजीनगर – छत्रपती संभाजीनगरच्या माय वर्ल्ड सोसायटी मंजित प्राईड मधे हर हर महादेव भक्तीगितांच्या कार्यक्रमाचे महाशिवरात्री निमित्यानी आयोजन करण्यात आलेले होते.

मंजित प्राईड व स्वरदायिनी प्रतिष्ठान

यांच्या संयुक्त विद्यमाने सुप्रसिद्ध गायक दिपक गिरी यांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.मनापा आयुक्त नी प्रशासक श्रीकांत, विकास मीना जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, डॉ. अर्चना राठोड -पवार प्राध्यापक आणि प्रमुख स्त्रीरोग तज्ज्ञ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि कर्करोग रुग्णालय, नितीन बगाडीया मंजित प्राईडचे संचालक, नवीन बगाडीया संचालक मंजित प्राईडचे, चक्रधर दळवी माय वर्ल्ड सोसायटीचे अध्यक्ष, अशा अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

प्रसिद्ध गायक दिपक गिरी यांच्या हरहर महादेव या महाशिवरात्रीच्या कार्यक्रमाचीसुरुवात गणेश वंदनेनी केली.नंतर नाम तुझे बरवे शंकरा, जय सियाराम, ऐसी लागी लगन, कानडा विठ्ठला, दत्ता दिगंबरा याहो मला भेटण्याला या हो.. घेवूनी निघालो दत्ताची पालखी अशा भक्तिमय भावपूर्ण गितांनी सर्वच श्रोत्यांना त्यांनी मंत्रमुग्ध करुन टाकले. खास पुण्याहून आलेली सुप्रसिद्ध गायीका कल्याणी देशपांडे हिच्या सुमधुर आवाजांनी श्रोते मंत्रमुग्ध होऊन गेले.तिने शंभो शंकरा, मोगरा फुलला, सत्यम शिवम सुंदरम अशी भावपूर्ण गाणी गायली.

एक हजाराहून अधिक श्रोत्यांनी माय वर्ल्ड सोसायटीचा परिसर फुलून गेला होता. आलेल्या सर्वच रसिक श्रोत्यांना साबुदाण्याची स्वादिष्टखिचडी ,वेफर्स, शेंगांदाण्याची चिक्की, केळी असा अनलिमिटेड फराळ माय वर्ल्ड सोसायटीच्या संयोजकानी दिल्याने श्रोत्यांनी समाधान व्यक्त केले.

# आता घरबसल्या करा ई केवायसी, पुरवठा विभागाकडून मोबाईल ॲप ग्राहकांच्या सेवेत दाखल

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.२७: अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून अंत्योदय आणि प्राधान्य कुटुंब लाभार्थी घरबसल्या काही मिनिटांतच आपली ई-केवायसी पूर्ण करू शकतात.राज्य सरकारने छखउ च्या सहकार्याने लाभार्थ्यांच्या सोयीसाठी Mera E-KYC हे ॲप सुरू केले आहे. यामुळे लाभार्थ्यांना प्रत्यक्ष रास्त भाव दुकानावर न जाता घरबसल्या ई-केवायसी पूर्ण करता येईल.

मुख्य वैशिष्ट्ये : घरबसल्या सोप्या पद्धतीने ई-केवायसी करा. फेस ऑथेंटिकेशन तंत्रज्ञानाद्वारे झटपट पडताळणी. रास्त भाव दुकानदार किंवा इतर कोणताही सदस्य ई-केवायसी करू शकतो. आधार क्रमांक मोबाईलशी लिंक असणे आवश्यक.

ई-केवायसी कशी करावी? (Step-by-Step मार्गदर्शन) आवश्यक ॲप डाउनलोड करा प्ले स्टोअरला मेरा ई केवायसी मोबाईल ॲप व आधार फेस आरडी सर्विसेस ॲप डाऊनलोड करावा ॲप इन्स्टॉल करून सेटअप करा

दोन्ही ॲप इन्स्टॉल करा आणि आवश्यक परवानग्या द्या.

मेरा एक केवायसी ॲप उघडा आणि पुढील स्टेप्स फॉलो करा यात राज्य: महाराष्ट्र निवडा. आधार क्रमांक: टाका आणि आधारशी संलग्न मोबाईलवर आलेला ओटीपी OTP प्रविष्ट करा. कॅप्चर: दिलेल्या कोडची नोंद करा.

व चेहर्याद्वारे पडताळणी करा (Face Authentication)

स्वतःसाठी समोरचा कॅमेरा सुरू करून चेहरा स्कॅन करा.

दुसऱ्या व्यक्तीची केवायसी करत असल्यास बॅक कॅमेरा वापरा. स्क्रीनवर दिलेल्या सूचनांनुसार डोळ्यांची उघडझाप करा. सत्यापन पूर्ण होते यशस्वी पडताळणी झाल्यास, लाभार्थ्याची माहिती रास्त भाव दुकानाच्या ई-पॉस मशीनवर दिसेल. याची खात्री करण्यासाठी पमध्ये E-KYC Status तपासा. जर E-KYC Status = Y दिसत असेल, तर प्रक्रिया पूर्ण झाली आहे. ही सेवा फक्त महाराष्ट्रातील लाभार्थ्यांसाठी उपलब्ध आहे. महाराष्ट्राबाहेर स्थलांतरित लाभार्थ्यांसाठी IMPDS KYC पर्यायाचा उपयोग करावा. शेवटची तारीख: ३१ मार्च २०२५ आहे (परंतु २८ फेब्रुवारी २०२५) पर्यंत जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी ई-केवायसी पूर्ण करावी.रास्त भाव दुकानदारांनी देखील शिधापत्रिकाधारकांना सहकार्य करून सर्व लाभार्थ्यांची ई-केवायसी लवकरात लवकर पूर्ण करावी, जेणेकरून कोणत्याही लाभार्थ्यांना अन्नधान्यापासून वंचित राहावे लागू नये.असे आवाहन तहसीलदार नवनाथ वगवाड पुरवठा अधिकारी कांचन कांबळे यांनी केले आहे.

# आखाती देशात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी



तभा वृत्तसेवा

अबू धाबी – आखाती देशात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती दरवर्षी उत्साहात साजरी केली जाते. यंदा शिव जयंती – फेस्टिवल ऑफ महाराष्ट्र या महोत्सवाचे ७ वे वर्ष असून, हा भव्य सोहळा २३ फेब्रुवारी २०२५,रविवार,रोजी बी ए पी एस हिंदू मंदिर,अबू धाबी येथे आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा.श्री प्रतापराव जाधव साहेब (मंत्री, आयुष स्वतंत्र प्रभार, आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री, भारत सरकार) यांनी भूषविले.कार्यक्रमाला मा.श्री युवराज मालोजीराजे शाहू छत्रपती (छत्रपती शिवाजी महाराजांचे १३ वे वंशज, कोल्हापूर) आणि मा.श्री बजरंग सोनावणे (खासदार, संसद सदस्य, भारत सरकार),श्री.रवी काळे,श्री किरण राठोड,श्री.उमेश नलगे पाटील,श्री.प्रदीप आघाव,श्री.अमोल दुबे पाटील,श्री पराग चावडा,श्री प्रदीप जेठवा यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

या वेळी श्री प्रतापराव जी साहेब,श्री मालोजीराजे छत्रपती व श्री बजरंग सोनावणे यांनी सर्व शिवभक्तांना मार्गदर्शन पर संवाद साधला व आयोजक व सर्व सहकारी यांचे कौतुक केले.

तसेच, रायगड भूषण ह.भ.प. मा.श्री रामदासजी महाराज पाटील (शिवव्याख्याते रायगड) हे प्रमुख मार्गदर्शक पाहुणे म्हणून उपस्थित राहून सर्वांना भक्तिमार्ग आणि शिवराय यांचा भक्ती शक्ती संगम समजावून सांगितला.

या वेळी सर्व मान्यवरांनी इ-झड हिंदू मंदिर येथे दर्शन घेतले व मंदिराचे प्रमुख परम पूज्य स्वामी ब्रह्मविहारीदास जी यांच्या तर्फे सर्व मान्यवरांचा सत्कार व कौतुक करण्यात आले.

अबू धाबी येथील हिंदू मंदिरात भव्य शिवजयंती उत्सव साजरा झाला हि जगभरातील शिवप्रेमी बांधवांसाठी अभिमानाची गोष्ट आहे.

या कार्यक्रमात श्रीमंत ढोल ताशा पथक, दुबई यांचे विशेष सादरीकरण झाले.श्रीमंत ढोल ताशा पथक दुबईचे वादन हा एक अभूतपूर्व अनुभव सगळ्या जगाने बीएपीएस मंदिर अबुधाबी येथे अनुभवला.


आखातात स्थायिक झालेल्या नवीन मराठी पिढीला आपल्या महाराष्ट्राच्या दैदिपयमान ईतिहासाची ओळख करून देण्यासाठी आतापर्यंत अनेक सामाजिक कार्यक्रम पार पाडणाऱ्या ईन्स्पायर इव्हेंट्स युएई यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले.

या कार्यक्रमा अंतर्गत महाराष्ट्राची लोककला पोवाडा,भारुड,लेझीम यासारखे सांस्कृतिक कार्यक्रम आंतरराष्ट्रीय पातळीवर सादर करण्यात आले.या कार्यक्रमास विविध उद्योजक व समाजसेवी संघटनांनी सहकार्य केले व सागर जाधव (एस. जे.लाईव ) यांनी हा कार्यक्रम टीम च्या सहकार्याने जगातील सर्व शिवप्रेमीं पर्यंत ऑनलाईन लाईव माध्यमातून पोहोचवला.

युएईतील २००० हुन अधिक मराठी व आंतरराष्ट्रीय प्रक्षकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेतला व कार्यक्रमात मोठ्या उत्साहात सहभागी होऊन कार्यक्रमाची शोभा वाढविली. वरील कार्यक्रमाच्या आयोजनासाठी आयोजक चंद्रशेखर जाधव,चैताली जाधव,सहकारी पल्लवी बारटके,साक्षी मोरे, ऋतुजा विचारे,वीरभद्र कोरेगावे,प्रशांत शिंपी,पुष्पेंद्र सरोदे,संतोष भस्मे,शिवाजी नारूने,मंदार कुलकर्णी, आनंद पवार, घनश्याम पाटील, अजित सावंत,किशोर मुंडे व इतर सर्व सहकार्यांनी अथक मेहनत घेऊन भव्य शिवजयंती साजरी केली व अटकेपार झेंडा आंतरराष्ट्रीय पातळीवर फडकवला.

सर्व शिवप्रेमी, मराठी बांधव आणि महाराष्ट्रप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून छत्रपती शिवरायांना वंदन केले.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (५३) प्राणमंत्र

परमपूजनीय डॉ. हेडगेवारांनी जगायचे कसे आणि कशासाठी या विषयाचा प्राणमंत्र दिला. त्यांनी आधी कृती मग विचार मांडला; म्हणून त्यांना क्रांतदर्शी म्हणतात.

आज झुंड, द काश्मीर फाइल्स, पावनखिंड, इत्यादी चित्रपट प्रदर्शित होऊ शकले. कारण आज पंतप्रधान संघ विचारांचा आहे. यातील एक चित्रपट काश्मीरमधील हिंदूंचे क्रूर हत्याकांड दर्शवितो. तेव्हा १९९० साली संघ स्वयंसेवकांनी आहार-विहार- उपचार आदि कामात खूप मदत केली. असे का घडले हे डॉक्टरांच्या विचारातून कळते. ते नेहमी सांगायचे आपण आपली ओळख – आपली संस्कृती- आपला इतिहास- आपला पुरुषार्थ आपले सामर्थ्य विसरलो आहोत; किंबहुना सामर्थ्य आठवले तरी गुंडाळून ठेवले आहे. दुबळे बनणे पसंत केले आहे. आपला हिंदू समाज रोगी बनला आहे. डॉक्टरांच्या जीवनकाळात पण हिंदू रोगी होता, व आजही आहे. हे दुबळेपण घालवण्याचा प्रयत्न करू या. घटनेच्या ज्या कलमामुळे फुटीरतावादी विचार बळावले होते; ते ३७० कलम ही रद्द झाले आहे व एक देश- एक निशान- एक प्रधान ही घोषणा प्रत्यक्षात आली आहे. आपण एक आहोत. राष्ट्र आणि समाज हे वेगळे नाहीत. तर एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत हा भाव म्हणजे डॉ. हेडगेवार यांचा प्राणमंत्र होता. आक्रमक पवित्रे घेणाऱ्या परधर्मीयांच्या शक्तीपुढे सदैव भीतीग्रस्त राहणाऱ्या असंघटित हिंदूंमध्ये स्वसंरक्षणाचे सामर्थ्य निर्माण करण्याची आवश्यकता डॉक्टरांना वाटू लागली होतीच. त्यासाठीच संघात वैचारिक शक्ती व शारीरिक शक्ती या दोन्ही शक्तींची उपासना होते. क्रमशः

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## अजिंठा घाटात ट्रक चे ब्रेकनिकामी झाले पलटी झाली असून जिवितहानी टळली

फर्दापूर दि २७ फर्दापूर : छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावरील अजिंठा घाटात मालवाहतूक करणाऱ्या ट्रकचे ब्रेक निकामी झाल्याने मोठा अपघात झाला.यात ट्रक चालकासह अन्य दोघे सुदैवाने बचावले.मात्र ट्रकचे अतोनात नुकसान झाले आहे. जालना येथून हादरा (मध्यप्रदेश) येथे लोखंडी सळई घेऊन जाणारा मालवाहतूक ट्रक क्र.(एम पी ०९ एचजी ६२९४) चे (दि.२७) पहाटे ४ वाजेच्या सुमारास अजिंठा घाट उतरत असताना ट्रकचे ब्रेक अचानक निकामी झाल्याने अनियंत्रित झालेला ट्रक हा चालकाने घाटात एका अवघड वळणावर असलेल्या सुरक्षा भिंतीला आदळून ट्रक थांबविण्याचा प्रयत्न केला. यामधे ट्रकचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले.त्यात असणारी लोखंडी सळई ही सुमारे शंभर फूट दरीत कोसळली.मात्र, ट्रकचालक सोयब खान (वय.३३), सेवाज हमीद खान ( वय.२०) दोघेही रा.हादरा व गोलू हे तिघे सुदैवाने बचावले.



## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

किरकोळ दिवाणी अर्ज क्रः ९४/२०२५

अर्जदारः– निंबा वामन खैरणार, वयः ४७ वर्षे, धंदाः शेती, रा. बनोटी ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर).

// विरुध्द //

गैरअर्जदार : निरंक

अर्ज : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. नामे कै. वामन गणा खैरणार हे दिनांकः– २३/१२/२०२१ ला बनोटी ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) येथे मयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांक : २३/०४/२०२५).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक :–२७/०२/२०२५ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

विभागीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोयगांव

## दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई

**मुख्य कार्यालय- मुख्य कार्यालय, बस डेपो शेजारी, परळी-रोड, अंबाजोगाई**
**फोन क्र. ०२४४६-२४६९२७**
**ऑफिस पत्ता:- मुख्य कार्यालय, बस डेपो शेजारी, परळी-रोड, अंबाजोगाई**
**फोन क्र. ०२४४६-२४६९२७**

**जा.क्र. दीन/मु.का./वसुली/१८/पीएलसी-६३/२२०/२०२४-२५** — **दिनांक-२१.०२.२०२५**

**परिशिष्ट ४ अ**
**नियम ८ व ९ नुसार**

**मालमत्ता विक्रीची सुचना**

**विक्री नोटीस (अचल मालमत्ता)**

सिक्युरिटायझेशन आणि सुरक्षितीकरण आणि पुनर्निर्माण आणि सुरक्षा अधिकार अंमलबजावणी कायदा २००२ अंतर्गत नियम ८ व ९ नुसार या नोटीसद्वारे सर्वसाधरण लोकास तसेच कर्जदार व सहकर्जदार/गहाणदार व जामीनदार यांना सुचित करण्यात येते की, खालील वर्णन केलेली अचल मालमत्तेचे गहाणखत बँकेच्या नावे कर्जाची परतफेड करण्याची हमी देवुनही **१.कर्जदार** श्री. अनिल प्रल्हाद इंगोले (कर्जदार) **पत्ता:-** अंबेडकर रोड, जालना, ता.जि.जालना ४३१ २०३ **२.सह-कर्जदार** श्री. राजाराम सत्यभान चव्हाण **पत्ता:-** संजविनी नगर, पाथरी रोड, परभणी ता.जि.परभणी ४३१ ४०१ **३.जामीनदार** श्री. संजय गुणाजी वाघमारे **पत्ता:-** आंबेडकर चौक,मंठा,जि. जालना ४३१ ५०४ **४.जामीनदार** श्री. राजु तुकाराम राठोड **पत्ता:-** खोर्डसावंगी, ता.मंठा,जि.जालना ४३१ ५०४

सदर कर्जदार/गहाणदार यांनी दिनांक **२२.०२.२०२२** रोजी दस्त क्रं.३२३/२०२२ रु.१०,००,०००/-(अक्षरी रु.:- दहा लाख रु. फक्त) चे गहाणखत बँकेच्या नावे करुन दिले आहे. निम्न लिखीत मालमत्तेचा ताबा दिनांक २२.१०.२०२४ रोजी घेतला आहे.

वर नमुद केलेल्या कायद्यांर्तगत नियमानुसार खाली सही करणारे प्राधिकृत अधिकारी, खालील वर्णनाचे गहाण स्थावर मालमत्तेची निविदाद्वारे विक्री करण्याकरीता नोटीस देत आहे. बँकेनी खालील गहाण स्थावर मालमत्ता ज्या ठिकाणी आहे आणि ज्या परिस्थितीत आहे तशीच विक्री करण्याकरिता सिल बंद निविदा मागविण्याचे ठरविले आहे. दिनांक **३१.०१.२०२५** रोजी थकीत रक्कम **रु.८,५६,८५२/-(अक्षरी रु.आठ लक्ष छपन्न हजार आठशे बावन्न रु.)** अधिक पुढील व्याज व इतर खर्च बाकी असलेल्या वसुली करिता निविदा मागविण्यात येत आहे.

ज्या कुणास खालील वर्णन केलेली स्थावर मालमत्ता विकत घ्यावयाची असेल त्यांनी आपली निवीदा प्राधिकृत अधिकारी, दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई शाखा-जालना या पत्यावर सिलबंद पाकीटमध्ये अनामत रक्कम राशी रु.५०००/- प्राधिकृत अधिकारी, दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई शाखा **जालना** यांच्या नावे असलेला डिमांड ड्राफ्ट/पे-ऑर्डर जोडुन दिनांक ०८.०३.२०२५ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावे.

**गहाण मालमत्तेचा तपशील:-**

१. **(मालमत्ता मालकाचे नाव- राजाराम सत्यभान चव्हाण)**
मौजे मंठा ता.मंठा, जि.जालना येथील देवळाई रोड, तारण मालमत्ता गट क्र.३४,प्लॉट क्र.४८,नगर पंचायत मिळकत क्र.२७७५/४८, क्षेत्र १०८.०० स्वे.मी. खुला प्लॉट व त्यावरील बांधकामासह त्यांच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे:-
**पुर्व-** राजाराम चव्हाण **पश्चिम-** रोहिदास चव्हाण
**दक्षिण-** रस्ता **उत्तर-** खुली जागा (प्लॅट)
("वरील मालमत्ता जशी आहे तशी आहे त्या स्थितीत")

२. **(मालमत्ता मालकाचे नाव- राजाराम सत्यभान चव्हाण)**
मौजे मंठा ता.मंठा, जि.जालना येथील देवळाई रोड, तारण मालमत्ता गट क्र.३४,प्लॉट क्र.४९, नगर पंचायत मिळकत क्र.२७७५/४९, क्षेत्र १०८.०० स्वे.मी. खुला प्लॉट व त्यावरील बांधकामासह त्यांच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे:-
**पुर्व-** उध्दव शेंडगे **पश्चिम-** रोहिदास चव्हाण
**दक्षिण-** रस्ता **उत्तर-** खुली जागा (प्लॅट)
("वरील मालमत्ता जशी आहे तशी आहे त्या स्थितीत")

**१.मालमत्ता राखीव किंमत रु.९,७६,०००/-(अक्षरी रु.: नऊ लाख शहात्तर हजार रु फक्त)**

**२.अनामत रक्कम रु.५०००/- (अक्षरी रु.:**-पाच हजार फक्त).

**विक्रीच्या शर्ती व अटी:-**

१. इच्छुक खरेदीदारांना कोरे निविदा पत्र रु.१००/- (अक्षरी रु.- शंभर रु. फक्त) नगदी अथवा डिमांड ड्राफ्ट ने जमा करुन बँकेच्या शाखा-जालना शाखेतुन प्राप्त करता येईल.
२. ईच्छुक खरेदीदारांनी त्यांच्या मोहरबंद निविदा सुरक्षा राशी रु. ५,०००/- (अक्षरी रु.- पाच हजार रु. फक्त) (डिमांड ड्राफ्ट/नगदी स्वरुपात/ACCOUNT TRANSFER/ अधिकृत अधिकारी, दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई या नावाचा) सह बँकेच्या शाखा कार्यालय, दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई शाखा-**जालना** येथे दिनांक **०८.०३.२०२५** सायं.०५.०० पर्यंत जमा कराव्यात.
३. मोहरबंद निविदा विहीत सुरक्षा राखी रु. ५,०००/- (अक्षरी रु.- पाच हजार रु फक्त) नसल्यास जमा केलेल्या निविदा तात्काळ रद्द करण्यात/समजण्यात येतील.
४. विहीत कालावधीत प्राप्त झालेल्या सर्व मोहरबंद निवीदा दिनांक **१३.०३.२०२५** रोजी दुपारी ०१.०० वाजता बँकेच्या शाखा-जालना येथे उघडण्यात येतील.
५. यशस्वी खरेदीदारास बोली रक्कमेच्या २५ टक्के रक्कम तात्काळ बँकेत जमा करावी लागेल व तो/ती/ते तसे न करु शकल्यास इतर सक्षम खरेदीदारास सदर मालमत्ता विकत घेण्याचा अधिकार प्राप्त होईल व अशा खरेदीदारास सुध्दा बोली रक्कमेच्या २५ टक्के रक्कम तात्काळ बँकेत जमा करावी लागेल.
६. यशस्वी खरेदीदारास बोली रक्कमेची उर्वरित ७५ टक्के रक्कम त्यापासुन १५ दिवसाचे आत जमा करावी लागेल. जर १५ वा दिवस हा सुट्टीचा दिवस असेल तर त्याच्या दुस-या दिवशी पर्यन्तचा दिवस विहीत कालावधी समजण्यात येईल.
७. सदर मालमत्तेवर इतर कोणत्याही प्रकारचा बोजा, कर, ई. वा इतर देणे बाकी असल्यास त्याची खालील हस्ताक्षराकर्तास कल्पना नाही व अशी सर्व रक्कम यशस्वी खरेदीदारांसच द्यावी लागेल व त्यास खालील हस्ताक्षरकर्ता अधिकारी जबाबदार राहणार नाही.
८. अधिकृत अधिकारी कुठलेही कारण न देता बोली/निविदा स्विकार/अस्विकार करण्याचा तसेच विक्रीची कारवाई तहकुब/स्थगीत रद्द करण्याचा अधिकार राखुन ठेवीत आहे.
९. मालमत्ते संदर्भातील चौकशी करीता बँकेच्या शाखा कार्यालय,जालना वेळ सकाळी ११.०० ते संध्याकाळी ०५.०० पर्यंत संपर्क करता येईल तसेच अधिकृत अधिकारी यांना दुरध्वनी क्र. ८८०६१५९२४५ पत्ता शाखा-जालना मो.क्र.८४११८८४२३९ वर सुध्दा संपर्क साधता येईल.
१०. नियमाप्रमाणे विक्रीपत्रा करीता लागणारा मुद्रांक शुल्क, नोंदणी फी व इतर सर्व खर्च यशस्वी खरेदीदारास/बोलीकर्त्यासच करावा लागेल.
११. सदर मालमत्तेवर कर्जदाराचे कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्ष किवा अप्रत्यक्ष देणे निघाल्यास त्यास बँक जबाबदार राहणार नाही.

स्थळ:- जालना
दिनांक:-२१.०२.२०२५

अधिकृत अधिकारी,
दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई,
(सिक्युअर्ड क्रेडीटर)
मो. ८८०६१५९२४५

## अग्रलेख

# न्याय वेळेत मिळायला हवा!

गुन्हेगार कितीही चतुर असला तरी कायद्याच्या कचाट्यातून तो निसटू शकत नाही. त्याने कितीही मातब्बर वकिलामार्फत युक्तिवाद केले तरी ते न्यायपीठाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या न्यायाधीशांच्या चाणाक्ष नजरेपुढे खरे उतरत नाहीत, हे पुन्हा एकदा माजी खासदार आणि काँग्रेसचे वरिष्ठ नेते सज्जनकुमार यांना, १९८४ मध्ये दिल्लीत उसळलेल्या शीख विरोधी दंगल प्रकरणी न्यायालयाने ठोठावलेल्या शिक्षेतून सिद्ध झाले आहे. सज्जनकुमार यांना १ नोव्हेंबर १९८४ रोजी सरस्वती विहारमध्ये झालेल्या पिता-पुत्राच्या हत्येप्रकरणी, १२ फेब्रुवारीला दोषी ठरवण्यात आले होते. त्यांना शिक्षा कुठली ठोठावली जाणार याची सर्वांना प्रतीक्षा होती. या प्रकरणात सीबीआय आणि तक्रारदारांनी सज्जनकुमार यांना फाशी देण्याची केलेली मागणी दिल्लीच्या राऊस ॲव्हेन्यू न्यायालयाने मान्य केली नसली तरी, त्यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावून पीडित परिवाराला काही अंशी न्याय मिळवून दिला आहे, त्याचप्रमाणे इंदिरा गांधी यांच्या हत्येनंतर उसळलेल्या शीखविरोधी दंगलीमध्ये न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या शीख समाजालाही थोडाफार न्याय मिळाला आहे. या दंगलीशी संबंधित एका प्रकरणात सज्जनकुमार यांना दिल्ली उच्च न्यायालयाने आधीच जन्मठेपेची शिक्षा सुनावली असून, ते सध्या तिहार तुरुंगाची हवा खात आहेत. पंजाबमध्ये झालेल्या ऑपरेशन 'ब्लू स्टार'नंतर ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांची त्यांच्याच अंगरक्षकांनी गोळ्या झाडून हत्या केली होती. त्यानंतर १ नोव्हेंबरला दिल्लीत आणि देशातील अनेक भागांत शिखविरोधात मोठ्या प्रमाणात हिंसाचार उफाळला. या हिंसाचारात शीख समाजातील लोक आणि त्यांच्या मालमत्तांना लक्ष्य करण्यात आले. तीन हजारांहून अधिक शिखांची या दंगलीत हत्या झाल्याची किंवा त्यांना जिवंत जाळल्याची सरकारदरबारी नोंद आहे. दिल्लीत उसळलेल्या दंगलीत सरस्वती विहारमध्ये जसवंत सिंग आणि तरुणदीप सिंग या दोन शीख पिता-पुत्राची हत्या झाली होती. याप्रकरणी पीडितांच्या पत्नी आणि आईच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल गेला होता. ज्या जमावाने जसवंत आणि तरुणदीप सिंग यांची त्यांच्या घरात जिवंत जाळून हत्या केली, त्या घराची तोडफोडही केली आणि लूटमार करीत घरातील इतर लोकांना मारहाण केली, त्या जमावाचे नेतृत्व सज्जनकुमार करीत होते, असा आरोप होता.

इंदिरा गांधींच्या हत्येनंतर उसळलेल्या दंगलीत किती शिखांच्या हत्या झाल्या, याबाबत खुलासा करण्याची मागणी माहिती अधिकार कायद्यांतर्गत करण्यात आली होती. त्याअंतर्गत मिळालेल्या माहितीनुसार कायदा आणि सुव्यवस्था राखणे ही राज्य सरकारच्या अखत्यारीतील बाब असली तरी, या प्रकरणाची चौकशी करणाऱ्या नानावटी आयोगाने दिलेल्या अहवालानुसार संसदेत करण्यात आलेल्या चर्चेनंतर दिलेल्या आश्वासनानंतर सरकारने डॉ. डी. के. शंकरन आणि के. पी. सिंग या अधिकाऱ्यांची समिती स्थापन केली गेली. या समितीला विविध राज्य सरकारांनी उपलब्ध करून दिलेल्या आकडेवारीनुसार निरनिराळ्या राज्यांमध्ये इंदिरा गांधींच्या हत्येनंतर उसळलेल्या दंगलीत एकंदरीत ३२३९ शिखांचे शिरकाण झाल्याचे स्पष्ट झाले. त्यात एकट्या दिल्लीत २७३३, उत्तरप्रदेशात २५१, हरयाणात १०६, तर मध्य प्रदेश आणि झारखंडमध्ये अनुक्रमे ९४ आणि ४८ शिखांच्या हत्या झाल्याची माहिती मिळाली. छत्तीसगड, महाराष्ट्र, ओडिशा, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, जम्मू काश्मीर आणि पश्चिम बंगालमध्येही हिंसाचाराचे लोण पसरले, ज्यात अनेक शिखांच्या हत्या झाल्या.

आजची पिढी १९८४ सालच्या शिखविरोधी दंगलीबद्दल अनभिज्ञ आहे. त्यांना ही दंगल का झाली, कोणी घडवून आणली आणि इतक्या मोठ्या प्रमाणात शिखांना लक्ष्य का करण्यात आले, याची पुसटशीही कल्पना नाही. शीख समाजाने मात्र इंदिरा गांधींच्या हत्येनंतर दिल्लीत उसळलेल्या दंगली म्हणजे दुसरे तिसरे काहीही नसून, हा प्रकार म्हणजे शिखांचे सामूहिक हत्याकांडच होते, असा निष्कर्ष काढला. शीख फॉर जस्टिस ही संघटना या प्रकरणी न्याय मिळावा यासाठी गेल्या ४० वर्षांपासून संघर्ष करीत आहे. विविध न्यायालयांत या प्रकरणी अनेक याचिका आजही प्रलंबित आहेत. या दंगलीत देशाच्या अठरा राज्यांमध्ये अतिशय नियोजित आणि सामूहिक पद्धतीने शेकडो शिखांच्या हत्या घडवून आणण्यात आल्या. सरकारी आकडेवारी काहीही सांगत असली तरी शीख फॉर जस्टिस या संघटनेच्या दाव्यानुसार संपूर्ण भारतात या हिंसाचारात ३० हजाराहून अधिक शिखांची हत्या झाली. त्यात बहुतांशी शिखांना जिवंत जाळण्यात आले. संपूर्ण भारतात शेकडो शीख महिलांवर गुंड, पोलिस अधिकारी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी सामूहिक बलात्कार केले आणि प्रतिज्ञा घेतली की पुढील पिढी (बलात्कारानंतर) भारत सरकारशी एकनिष्ठ असेल. ३ लाखांहून अधिक शीख या घटनेनंतर विस्थापित आणि बेघर झाले. संपूर्ण भारतात शेकडो गुरुद्वारा आणि गुरु ग्रंथ साहिब जाळण्यात आले तसेच पद्धतशीर आणि नियोजनबद्ध पद्धतीने अपवित्र करण्यात आले. सुमारे ३०० शीख सैनिकांना सहकाऱ्यांनी गणवेशात ठार मारले. झारखंडमधील बोकारो स्टील प्लांटमध्ये काम करणाऱ्या १२० शिखांना जळत्या भट्टीत जिवंत फेकण्यात आले. कानपूर आणि भारतातील इतर शहरांमध्ये १३ दिवसांपर्यंतच्या मुलांना गॅसच्या चुलीवर जिवंत भाजण्यात आले. त्रिपुरातील आगरतळा येथे जीव वाचवण्यासाठी पोलिस ठाण्यात आश्रय घेतलेल्या ४० शीख कुटुंबांना पोलिस ठाण्यात जिवंत जाळण्यात आले. मध्य प्रदेशातील जबलपूरमध्ये १२ शिखांना रेल्वे प्लॅटफॉर्मच्या छतावर फाशी देण्यात आली. शिखांची लाखो-करोडोंची मालमत्ता लुटून नष्ट करण्यात आली.

या दंगलीबाबत बरीच रोचक माहिती आता कुठे जनतेपर्यंत पोहोचू शकत आहे. ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी नवी दिल्लीतील २४ अकबर रोडवर काँग्रेसच्या एका बैठकीमध्ये शिखांच्या हत्याकांडाचे नियोजन करण्यात आले. या बैठकीला संसद सदस्य आणि काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ सदस्य उपस्थित होते. यामध्ये जगदीश टायटलर, सज्जन कुमार, एच. के. एल. भगत, कमलनाथ, धर्मदास शास्त्री, ललित माकन यांचा समावेश होता. दंगली सुरू असताना केंद्र शासनाच्या प्रसिद्धी माध्यमांनी प्रक्षोभक भाषणे आणि दृश्ये दाखवली. दूरदर्शनवर दाखवण्यात आलेल्या दृश्यात लोकप्रिय चित्रपट कलाकार 'खून का बदला खून' आणि 'खून की छिंटे सिखों के घर तक पहुचनी चाहिए' यासारखे नारे देताना दिसून आले. भजनलाल यांच्या आदेशानुसार हरयाणातील मधुबन येथील पोलिस मुख्यालयातील पोलिस कमांडोंना शिखांचा नरसंहार करण्यासाठी पाठवले गेले. तज्ज्ञ शस्त्रधारी आणि व्यावसायिक गुंड बाहेरून आणले गेले आणि सरकारी बसेसमधून त्यांना वेगवेगळ्या क्षेत्रांत पोहोचविले गेले. शीख व्यक्ती, शिखांची घरे, व्यवसाय आणि गुरुद्वारे जाळण्यासाठी ज्वलनशील साहित्याचा पुरवठा केला गेला. शिखांच्या हत्याकांडात पोलिसांनी सक्रिय सहभाग घेतला किंवा शिखांना जिवंत जाळले जात असताना त्यांनी मूकदर्शक होण्याची भूमिका निभावली, असेही खुलासे होऊ लागले आहेत. दंगलीच्या वेळी जाळपोळ करणाऱ्या समाजकंटकांना पोलिसांच्या जीपमधून डिझेल पुरवले गेल्याची संतापजनक बाब उघड झाली आहे. जमावाने हल्ला करण्यापूर्वी पोलिसांनी स्वतः पुढाकार घेऊन शिखांना निःशस्त्र केले. बहुतांश ठिकाणी हत्याकांड घडवून आणताना ना संचारबंदी लावली गेली ना सैन्याला मदतीसाठी पाचारण केले गेले. आज ४० वर्षांनंतरही शिखांच्या नरसंहाराचे आयोजक आणि गुन्हेगार उजळ माथ्याने फिरत असून, सत्तेच्या दालनात मोठमोठ्या पदांचा आनंद उपभोगत आहेत. शिखांच्या हत्याकांडासाठी मोजक्याच व्यक्तींना शिक्षा झालेली बघायला मिळते. या दंगलींचा आरोप असलेले अनेक जण आज स्वर्गवासी झालेले आहेत, त्यामुळे शिखांना पूर्णपणे न्याय मिळाला असे कोणीही म्हणू शकत नाही. शिखांना न्याय मिळवून देण्यात एकंदरीत दहा चौकशी आयोग अपयशी ठरले आहेत. हत्याकांड घडवून आणण्यासाठी पुढाकार घेणारे आणि प्रत्यक्ष हत्याकांडात सहभागी होणाऱ्यांच्या निवासस्थानी आयोगांचे चौकशी अहवाल आणि पीडितांचे अर्ज धूळ खात पडून होते. सज्जनकुमार यांना झालेल्या जन्मठेपेच्या शिक्षेमुळे पीडितांच्या जखमेवर फुंकर घातली गेली असली तरी न्यायाला लागलेल्या विलंबाचे मुळीच समर्थन होऊ शकत नाही. 'जस्टिस डिलेड इज जस्टिस डिनाईड'सारखी परिस्थिती आज झालेली दिसतेय. त्यात सुधारणा व्हावी आणि उर्वरित पीडितांना लवकरात लवकर न्याय मिळावा, ही अपेक्षा!

## इतस्ततः

**डॉ. विवेक राजे**

# अतिक्रमण की जिहाद?

आटपाट नगर होते. औद्योगिकीकरणामुळे समृद्ध. स्थानिक प्रशासनाला असणाऱ्या उत्पन्नामुळे सगळ्या शहरी सोयी-सवलतींची लयलूट असलेले. या नगराला लागून एक ओसाड माळरान होते. तिथे बाहेरच्या प्रांतातील काही लोकांनी आधी पाल वजा झोपड्या टाकल्या. अशिक्षित आणि गरीब असलेल्या या लोकांनी मग आजूबाजूच्या वस्तीतून काही हलकीफुलकी कामं करायला सुरुवात केली. असाच एक व्यवसाय म्हणजे भंगार गोळा करून आणणे, त्याचे वर्गीकरण करून विकणे. असा व्यवसाय एकाने सुरू केला. काही दिवसांनी अजून दोघा-चौघांनी सुरू केला. आता तिथे भंगार व्यवसायातील लोकांची वर्दळ सुरू झाली. काही वर्षांत अनेक भंगार व्यावसायिकांचे त्या माळरानावर टपऱ्या, टिनाचे शेड असे साम्राज्य उभे राहिले. मग त्याच व्यवसायातील मजुरांच्या झोपड्या तिथे उभ्या राहिल्या. अशा ठिकाणांवर सर्वांत आधी गावातल्या टपोरी गुंडांची नजर पडत असते. तसे अनेक गुंड तिथे धावले. त्या वस्तीत काही पैसे घेऊन हे गुंड झोपडी बांधण्यासाठी जागा देऊ लागले. हळूहळू तिथे गुंडांच्या टोळ्या तयार झाल्या. त्या प्रभागाच्या नगरसेवकाने खटपट करून दबाव टाकून त्या वस्तीत पाणी आणि विजेचे खांब उभे करून दिले. आता ती वस्ती स्थिर झाली. त्या जमिनीची मालकी कोणाची हा फालतू प्रश्न प्रशासन, लोकप्रतिनिधी, जवळच्या अधिकृत वस्तीतील नागरिक, तथाकथित पत्रकार कोणीही विचारला नाही, कोणाला पडला नाही. भंगार व्यवसायातील मुस्लिम व्यावसायिकांनी हिंदू व्यावसायिकांचे भंगाराच्या धंद्यातून उच्चाटन करण्यासाठी, जास्त किमतीत भंगार विकत घेणे, हिंदूंना मजूर मिळणार नाहीत अशी व्यवस्था करणे. हिंदू भंगार व्यावसायिकांकडून भंगार घेताना पाडून भाव देणे असे उद्योग सुरू केले. हिंदू भंगार व्यावसायिकांना आपले व्यवसाय चालविणे कठीण होऊ लागले. त्यांच्याकडून कोणीही भंगार योग्य त्या किमतीला उचलायला तयारच नसे. मोठे भंगार व्यावसायिक हिंदू भंगारवाल्याकडून भंगार घेण्यात टाळाटाळ करीत किंवा किंमत तरी पाडून मागत असत. एकूण परिस्थितीचा अंदाज घेऊन हिंदू लोकांनी भंगाराचा व्यवसाय बंद केला. त्या वस्तीतून हळूहळू हिंदू व्यावसायिक आणि हिंदू लोकांनी जागा सोडायला सुरुवात केली. एका ठरावीक काळानंतर आधी मिश्र असलेल्या त्या संपूर्ण वस्तीचे आता फक्त मुस्लिम वस्तीत रूपांतर झाले. सगळेच बेकायदेशीर असलेल्या त्या वस्तीत जायचे तर पोलिस देखील चार वेळा विचार करू लागले. सभ्य माणसे तर तेथे जाऊच शकत नसतं. हळूहळू तिथे चालणाऱ्या बेकायदा उद्योगांची माहिती अफवांच्या रूपाने बाहेर येऊ लागली होती; ती वस्ती मात्र हळूहळू विस्तारत होती. आता त्या वस्तीतून एकाच वेळी अनेक ठिकाणांहून बांग ऐकू येऊ लागली. याचा अर्थ वस्तीत लहान-मोठ्या मशिदी उभ्या राहिल्या, असा घेत इतर नगरवासी स्वतःला त्या वस्तीपासून दूर ठेवण्यात समाधान मानू लागले. ती अनधिकृत बेकायदा वस्ती आणि इतर नगर यामध्ये फक्त एक चौपदरी सडक एवढंच अंतर उरलं. त्या सडकेने निदान नगराकडील बाजूला त्या वस्तीचा विस्तार थांबला असला, तरी कायदेशीर वस्तीतील लोकांच्या त्या बेकायदेशीर वस्तीतील लोकांशी छोट्या-मोठ्या कुरबुरी चालूच असतं. एक दिवस संध्याकाळी त्या नगरातील प्रतिष्ठित घरात गडबड उडाली. सकाळी ८ वाजता आपल्या कॉलेजला गेलेली त्या घरातील लाडकी लेक रात्री ८ वाजले तरी घरी आली नव्हती. घरच्या लोकांनी तिच्या मित्र-मैत्रिणींकडे चौकशी करायला सुरुवात केली. तेव्हा कळले सुयश नावाचा तिचा कोणी मित्र होता. ती कॉलेजमध्ये आणि बाहेरही अनेकदा त्याच्या बरोबर असायची. पोलिसांचे रेकॉर्ड मात्र त्याचे नाव सुलेमान असल्याचे दाखवत होते. या पलीकडे कोणतीच खबर मिळत नव्हती. रात्री १० वाजता कुणीतरी पोलिस तक्रार करण्याचा सल्ला दिला. घरातील कर्ता पुरुष, एक-दोन शेजारी असे जवळच्या पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यासाठी गेले. तेथील पोलिस अधिकाऱ्याने सौम्यपणे सगळं ऐकून घेत थोडी वाट पाहण्याचा सल्ला दिला. हे लोक तक्रार नोंदवावी म्हणून अडून बसले तर स्पष्ट शब्दात एक-दोन दिवस वाट बघा, असा सज्जड दम भरला. मंडळी अस्वस्थपणे बाहेर आली. एकाने कुणा स्थानिक नेत्याला फोन केला. तो धावत पोलिस ठाण्यात पोहोचला. हमरीतुमरी करून तक्रार नोंदवून घेतली, पण पुढे काहीच नाही. मुलगी सहीसलामत घरी येण्याची आशा दुरावू लागली. प्रत्येकच माणूस या बाबतीत त्या वस्तीकडे संशयाने पाहात होता. जवळजवळ ३० लाख चौरस फुटात पसरलेली ती वस्ती. तिच्या आत अनेक रहस्यं, गुन्हेगार, अवैध धंदे दडलेले होते. काळाबरोबर त्या वस्तीत हळूहळू विशिष्ट छाप असलेले, रंगाने कळकट काळे असलेले आणि उजळ पण मंगोलियन झाक असलेल्या लोकांची संख्या लक्षणीय झाली. लोक त्यांना परदेशी घुसखोर म्हणत. या लोकांमुळे वस्ती अधिकच धोकादायक होऊन गेली. हळूहळू गावातील मुली अचानक अदृश्य झाल्याच्या बातम्या नगरात पसरत होत्या. काही ठरावीक दिवशी त्या वस्तीतून उन्माद आल्यासारख्या ठरावीक घोषणा देत तरुण रस्त्यावर येत असतं. पोलिस, प्रशासन आणि कायदेशीर वस्तीतील जनता संयम राखत असे. जणू धार्मिक आणि जातीय सौहार्द ठेवण्याची जबाबदारी फक्त कायदेशीर वस्तीतील बहुसंख्य असलेल्या नागरिकांचीच असावी. आता नगरातील नागरिक, प्रशासन, लोकप्रतिनिधी, पत्रकार आपल्याच निष्काळजी आणि बुळ्या वृत्तीने आपल्याच कर्माचे भोग म्हणून तळतळाट करीत, पण काहीही न करता गप्प बसून राहात.

असेच केव्हातरी त्या नगरात निवडणुकी झाल्या. लोकांनी घराबाहेर पडून भरभरून कायदेशीर नागरिकांची वा बहुसंख्य असलेल्या हिंदूंची बाजू घेणाऱ्या पक्षाला आणि नेत्याला मतदान केले. बहुसंख्य लोकांच्या हिताचा विचार करणारा पक्ष ८० टक्के जागा जिंकून निवडून आला. या पक्षाने परदेशी घुसखोरांना शोधून परत पाठविण्याची मोहीम हाती घेतली. एक दिवस नव्या नेत्याच्या प्रशासनाने सर्व कायदेशीर बाजू आणि कागदपत्रे तपासून वस्तीवर बुलडोझर चालवला. अनेक लोक बुलडोझर चालत असताना तमाशा पाहायला हजर होते. ३० लाख चौरस फूट जागेवरील अतिक्रमण अनेक बुलडोझरच्या साहाय्याने हटविण्यात आले. काही बघ्यांनी आनंदाने टाळ्या पिटल्या. काही लिब्रांडूंना दुःखातिशयाने अश्रू अनावर झाले. प्रशासनाला आपण फार मोठी कामगिरी केल्याचे समाधान वाटू लागले. पोलिस यंत्रणा कोणताही दंगाधोपा न होता कारवाई यशस्वी झाल्याने आपल्या हातातील दंड्याकडे अभिमानाने पाहू लागले.

९८८१२४२२२४

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# विदर्भाच्या काशीची दुरवस्था!

पुरोगामी महाराष्ट्राचा इतिहास सांगताना विदर्भाचा फारसा कुठेच उल्लेख होत नाही. सत्तेच्या पटलावरही विदर्भाच्या वाट्याला गेली कित्येक वर्षे उपेक्षाच आली आहे. पश्चिम महाराष्ट्र, खान्देश, मराठवाडा या भागातच विकासाला आजवर प्राधान्य देण्यात आले. विदर्भ मात्र गरीबच राहिला. दिल्ली, मुंबईतल्या सरकारला विदर्भात काय काय घडतं हे माहिती आहे का? असे खेदाने म्हणावे लागते आणि हीच खरी वस्तुस्थिती देखील आहे. म्हणूनच विदर्भात कधी पर्यटन आणि ऐतिहासिक वारसा लाभलेल्या धार्मिक स्थळांचा विकास होऊ शकला नाही. विदर्भात अनेक धार्मिक स्थळे अशी आहेत की, ज्यांना पुरातन काळापासून तीर्थस्थळाचे पावित्र्य प्राप्त झाले आहे. मात्र राजकीय अनास्था आणि प्रशासकीय ढीम्म व्यवस्था यामुळे विदर्भाच्या अशा स्थळांना फारसे महत्त्व प्राप्त होऊ शकले नाही. सत्तेत आल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या नेतृत्वात विदर्भाच्या विकासकामांचा अनुशेष भरून काढण्याचा प्रयत्न झाला. विदर्भातील रस्ते व इतर विकासाची कामे या दोन्ही नेत्यांनी करण्यासाठी पुढाकार घेतला. मात्र यापूर्वीच्या सत्तेत असणाऱ्या काँग्रेसी नेत्यांनी विदर्भाच्या विकासाकडे फारसे लक्ष दिले नाही. त्यामुळेच विदर्भातील पर्यटनस्थळांचा व तीर्थस्थळांचा विकास होऊ शकला नाही. विदर्भाची काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मार्कंडा या तीर्थस्थळाची झालेली दुरवस्था अत्यंत क्लेशदायक आहे. उत्तरवाहिनी असलेल्या वैनगंगेच्या तीरावर मार्कंडा येथे प्रसिद्ध पौराणिक शिवलिंग आहे. खजुराहोच्या काळातील शिल्पाने नटलेले शिवलिंगाचे मंदिर पुरातत्त्व विभागाच्या नाकर्तेपणामुळे खितपत पडले आहे. महाशिवरात्रीनिमित्त मार्कंडा येथे १५ दिवसांची मोठी जत्रा भरते. या जत्रेला दूरवरून भाविक येतात. चंद्रपूर, गडचिरोली या दोन जिल्ह्यांतील लाखो भाविक मार्कंडा नगरीत महाशिवरात्रीच्या निमित्ताने येतात. मात्र त्यांना राहण्यासाठी अद्याप मार्कंडानगरीत प्रशासनाने कुठलीही व्यवस्था केलेली नाही. या ठिकाणी असलेले विश्वस्त मंडळ सुद्धा मार्कंड्याच्या विकासासाठी फारसे प्रयत्न करताना दिसत नाही. महाराष्ट्रातील इतर मंदिरांमध्ये येणाऱ्या भाविकांना थांबण्यासाठी भक्तनिवासाच्या सोयी आहेत. मात्र मार्कंडानगरीत एक मोडकीतोडकी धर्मशाळा सोडली तर दुसरे राहण्याजोगे ठिकाण नाही. चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यांत दिग्गज लोकप्रतिनिधी असतानासुद्धा मार्कंडानगरीत कुठल्याही सोयी निर्माण होऊ शकल्या नाहीत, यापेक्षा दुसरे मोठे दुर्दैव नाही. महाशिवरात्रीनिमित्ताने मार्कंडानगरीत जत्रेसाठी व शिवलिंगाच्या दर्शनासाठी भाविक येत असल्याने जिल्हा प्रशासनामार्फत तात्पुरत्या सोयी करण्यात येतात. मात्र त्यानंतर या नगरीकडे वर्षभर प्रशासन ढुंकूनही बघत नाही. विदर्भाची काशी म्हणून लौकिकास आलेल्या मार्कंडानगरीच्या विकासाचा आराखडा तयार करण्यात प्रशासनाला, शासनाला आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनासुद्धा अपयश आले आहे. गडचिरोली जिल्ह्यात १० वर्षे भाजपाचे अशोक नेते यांनी खासदारकी उपभोगली. यापूर्वी हंसराज अहिर खासदार होते. त्यांच्याआधी काँग्रेसचे नरेश पुगलिया खासदार होते. याशिवाय गडचिरोलीचे खासदार म्हणून मारोतराव कोवासेंनी सुद्धा काम पाहिले आहे. या जिल्ह्याचे भूमिपुत्र म्हणून माजी मंत्री तथा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्याकडे बघितले जाते. मात्र या साऱ्यांनीसुद्धा मार्कंडाच्या विकासासाठी केवळ थातुरमातुर कामे करून वेळ मारून नेली आहे. भाजपाचे आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी कधी-कधी मार्कंडानगरीच्या विकासाचा मुद्दा ऐरणीवर आणण्याचा प्रयत्न केला. मात्र तेदेखील फारसे काही करू शकले नाही. या साऱ्यांच्या प्रयत्नांना पुरातत्त्व विभागाचा अडसर आला आणि इथेच मार्कंडा नगरीच्या विकासाची गाडी थांबली. विदर्भाची काशी अतिशय दुरवस्थेत आहे. या ठिकाणी हिंदू धर्माच्या अनेक धार्मिक विधी पार पाडल्या जातात. या स्थळाला मोक्ष स्थान म्हणून दर्जा दिला आहे. या ठिकाणी नारायण नागबळीसारख्या धार्मिक विधी पार पाडल्या जातात. त्या अर्थाने मार्कंडा नगरीला तीर्थस्थळाचा दर्जा दिला जातो. मात्र या ठिकाणी या विधी पार पाडण्यासाठी व्यवस्थित आसनव्यवस्था नाही. घाटावर उतरण्याकरिता पायऱ्यासुद्धा नीट नाहीत. अनेक छोट्या-छोट्या गोष्टी ज्या करता येण्यासारख्या आहेत, त्या सुद्धा प्रशासनाने केल्या नाहीत. मागील चार वर्षांपासून शिवलिंगाच्या मंदिर जीर्णोद्धाराचे काम रखडले आहे. पुरातत्त्व विभागाकडून हे मंदिर नव्याने उभारण्याचे काम सुरू करण्यात आले. मात्र ते अद्याप पूर्ण होऊ शकले नाही. दरवर्षी महाशिवरात्रीनिमित्ताने विदर्भाची काशी चर्चेत येते. यात्रा संपली की, पुन्हा या काशीकडे साऱ्यांचेच दुर्लक्ष होते. विदर्भाच्या काशीचा ऐतिहासिक वारसा जपण्याची गरज आहे. निदान गडचिरोलीच्या लोकप्रतिनिधींनी तरी हा वारसा जपण्यासाठी पाऊल उचलायला हवे.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# शशी थरूर कोणती भूमिका घेणार?

केरळमधील काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री शशी थरूर सध्या आपल्या वक्तव्यांनी चर्चेत आले आहेत. थरूर तसेही नेहमीच चर्चेत असतात. आपल्या कृतीने आणि वक्तव्याने अनेकवेळा वादग्रस्तही ठरत असतात. पण त्यांनी नुकतेच पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केरळचे मुख्यमंत्री पिनाराई विजयन् यांची प्रशंसा करून नव्या वादाला तोंड फोडले आहे. थरूर यांनी मोदी यांच्या अमेरिका दौऱ्याचे स्वागत करत यामुळे दोन देशांतील संबंध आणखी दृढ होतील, असे म्हटले होते. दुसरीकडे केरळमध्ये गुंतवणुकीला अनुकूल वातारण तयार केल्यामुळे तसेच तेथील स्टार्टअपची संख्या वाढवल्याबद्दल केरळचे मुख्यमंत्री विजयन् यांचे एका लेखातून कौतुकही केले होते. थरूर यांच्या या वागणुकीबद्दल केरळ प्रदेश काँग्रेसने त्यांना लक्ष्मणरेषा न ओलांडण्याचा सल्लाही दिल्याचे समजते.

नुकतीच त्यांनी केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांच्यासोबतची आपली एक जुनी सेल्फी जारी केली. यातून आपण भाजपाशी जवळीक साधू शकतो, असा इशारा त्यांनी दिल्याचे मानले जाते. थरूर गेल्या काही महिन्यांपासून काँग्रेसच्या नेतृत्वावर नाराज आहेत, आपल्याला पक्षात महत्त्व मिळत नाही, जबाबदाऱ्या दिल्या जात नाही, असा त्यांचा आक्षेप आहे. आपली हीच नाराजी त्यांनी एकाचवेळी डाव्या आणि उजव्या आघाडीच्या नेत्यांची प्रशंसा करत दाखवून दिली आहे. मी काँग्रेसचा आहे, काँग्रेससोबतच राहणार आहे, मात्र पक्ष मला जबाबदारी देत नसेल तर माझ्यासमोर अनेक पर्याय आहेत, असे सांगत त्यांनी काँग्रेसच्या नेतृत्वाला एकप्रकारे इशारा दिला आहे.

पुढील वर्षी केरळ विधानसभेची निवडणूक आहे. या निवडणुकीत काँग्रेस पक्षाने आपल्याला मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर करावे, अशी त्यांची अपेक्षा आहे. मात्र काँग्रेस पक्ष त्यांना मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार जाहीर करण्यास फारसा उत्सुक नाही, त्यामुळे थरूर यांचा हा नाराजी व्यक्त करत काँग्रेसच्या नेतृत्वावर दबाव आणण्याचा प्रयत्न असल्याचे मानले जाते. काही दिवसांपूर्वी थरूर यांनी दिल्लीत काँग्रेसच्या नेतृत्वाची भेट घेतली होती. पण त्यातून त्यांना अपेक्षित असे फारकाही साध्य झाले नाही. प्रदेश काँग्रेसजवळ सक्षम नेतृत्व नाही, राज्यातील मुख्यमंत्रिपदाच्या सर्वेक्षणात अन्य नेत्यांपेक्षा आपल्याला जास्त लोकांची पसंती असल्याचा दावाही थरूर करतात. काँग्रेसच्या नेतृत्वाने राज्यात नेतृत्वबदल केला नाही तर काँग्रेसला सलग तिसऱ्यांदाही विरोधी पक्षात बसावे लागेल, असा इशाराही ते देतात. मात्र काहीही झाले तरी थरूर पक्ष सोडणार नाही, फक्त सक्रिय राजकारणातून बाहेर पडत लेखन आणि भाषणाच्या कार्यक्रमात स्वतःला गुंतवून घेतील, असा दावा त्यांचे निकटवर्तीय करतात.

थरूर काँग्रेस पक्ष सोडतील का, हे आताच सांगता येणार नसले तरी त्यांनी मोदी आणि पिनाराई विजयन् यांची प्रशंसा करत जसा काँग्रेसच्या नेतृत्वावर दबाव आणला, तसाच अप्रत्यक्षपणे भाजपा आणि डाव्या पक्षांवरही आणला आहे. तुम्ही मला माझ्या अटी आणि शर्तीवर प्रवेश देणार नसाल तर माझ्यासमोर दुसरा पर्यायही आहे, असे ते सांगत आहे. आणि म्हणूनच एकाचवेळी डाव्या आणि उजव्या विचारसरणीच्या नेत्यांची प्रशंसा करत आहेत, असे म्हटले तर ते चूक ठरू नये. मुळात कोणताही राजकारणी माणूस जे बोलतो ते करतो, असे नाही, आणि जे करतो, ते बोलतोच असेही नाही.

राजकारणात येण्याच्या आधी थरूर संयुक्त राष्ट्रात मोठ्या पदावर होते, त्यामुळे काँग्रेस पक्षातील विदेश धोरणाचे ते तज्ज्ञ मानले जातात. इंग्रजी भाषेवर असलेले प्रभुत्व ही त्यांची जमेची बाजू मानली जाते. उच्चभ्रू वर्तुळात त्यांचा वावर असतो. पेज थ्रीच्या पार्ट्यात ते नेहमीच दिसून येतात. त्यामुळे थरूर हे तळागाळातील तसेच लोकप्रिय नेते कधीच मानले जात नव्हते. सर्वसामान्य माणसाशी त्यांचा संबंध कधी आला नाही.

संयुक्त राष्ट्राची नोकरी सोडत २००९ मध्ये त्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. काँग्रेसने त्यांना केरळच्या तिरुवनंतपुरम् मतदारसंघातून लोकसभा निवडणुकीच्या मैदानात उतरवले. पहिल्याच निवडणुकीत विजयी झाल्यानंतर डॉ. मनमोहनसिंग सरकारमध्ये ते राज्यमंत्रीही झाले. केरळच्या तिरुवनंतपुरम् लोकसभा मतदारसंघातून ते सलग चारवेळा जिंकले आहेत, त्यामुळे आता त्यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षा वाढल्या आहेत. त्यांना मुख्यमंत्रिपदाचे स्वप्न पडू लागले आहे. मात्र काँग्रेसचे संघटन महासचिव के. सी. वेणुगोपाल, रमेश चेन्नीथला आणि सुधाकरसारख्या केरळमधील नेत्यांचा थरूर यांना विरोध आहे, त्यामुळे काँग्रेसचे नेतृत्व त्यांच्याबाबतचा निर्णय घेऊ शकत नाही. काँग्रेस पक्षातील सद्यःस्थितीला टोला लगावताना कवी थॉमस ग्रे यांचे एक वाक्य सांगून थरूर यांनी संभ्रम वाढवला आहे. 'ज्याठिकाणी अज्ञानातच आनंद असतो, तिथे बुद्धिमान असणे मूर्खपणाचे असते' असे ते म्हणतात.



थरूर यांना काँग्रेस पक्षाने राजकारणात आणले असले तरी नंतर थरूर यांनी आपल्या अनेक विधानांनी काँग्रेस पक्षाला अडचणीतही आणले आहे. 'द ग्रेट इंडियन नॉव्हेल' या थरूर यांच्या कादंबरीवर काँग्रेसचे नेतृत्व नाराज आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाचे नेतृत्व धृतराष्ट्राकडे गेले, असा उल्लेख यात आहे. एकप्रकारे थरूर यांनी देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना धृतराष्ट्र म्हटले होते. याचा उल्लेख करत माजी केंद्रीय मंत्री भाजपाचे अनुराग ठाकूर यांनी गांधी घराण्यावर जोरदार हल्ला चढवला होता.

शशी थरूर काँग्रेस पक्षावर नाराज आहेत की काँग्रेस पक्ष त्यांच्यावर नाराज आहे, हा प्रश्न आधी अंड की आधी कोंबडी यासारखा आहे. थरूर अनेकवेळा पक्षाच्या अधिकृत भूमिकेच्या विरोधात भूमिका घेत काँग्रेस पक्षाला अडचणीत आणत असल्याचा त्यांच्यावर आरोप केला जातो. त्यामुळे काँग्रेसचे नेतृत्व त्यांच्यावर नाराज असल्याचे समजते. त्यामुळे काँग्रेसचे नेतृत्व त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न करणार का, थरूर यांना थांबवण्यासाठी काँग्रेसने पुढाकार घेतला नाही तर थरूर नेमकी कोणती भूमिका घेणार, थरूर यांनी पक्ष सोडल्यामुळे काँग्रेसचे किती नुकसान होणार, ते भाजपामध्ये जाणार का, थरूर भाजपात आल्यामुळे भाजपाचा किती राजकीय फायदा होणार, महत्त्वाचे म्हणजे भाजपाचे नेतृत्व त्यांना आपल्या पक्षात सामावून घेणार का, याकडे नजीकच्या काळात सगळ्यांचे लक्ष राहणार आहे.

९८८१७१७८१७

### पानगळीच्या निमित्ताने!

निसर्ग सुंदर आहे आणि निसर्गातील प्रत्येक ऋतू देखील मनभावन आहे. उन्हाळा रूक्ष असला तरी विविधरंगी फुलांनी सृष्टी बहरून जाते. पावसाळ्यात तर हिरवाईच्या विविध छटा मन मोहून टाकतात आणि हिवाळा तर रंग गंधयुक्त बहर घेऊन येतो.

प्रत्येक ऋतूची एक वेगळी ओळख असतेच तशी आता सर्वत्र सुरू असलेली पानगळ. पानगळ देखील किती महत्त्वाची आहे हे निसर्ग सांगून जातो. पानगळ झाली नाही तर पुन्हा बहर येणार तरी कसा?

सर्वत्र पिवळी सोनेरी पाने धरतीवर अंथरली जातात. कधी पिवळ्या केशरी फुलांच्या पाकळ्यांचा गालिचा धरतीवर अंथरला जातो. पाऊल वाटेवर चालताना हा पाचोळा एक अनोखा नाद उत्पन्न करतो. वास्तविक ही नैसर्गिक क्रिया म्हणजे निसर्गाने भूमीवर केलेले आच्छादन आहे.

हा पालापाचोळा म्हणजे झाडांचा वर्षभराचा अन्न द्रव्यांचा साठा आहे .हाच पाचोळा जीवाणूंच्या माध्यमातून कुजून झाडांना अन्न मिळते.

स्वच्छ भारत हे आपले स्वप्न आहे पण ते प्रत्यक्षात खरे करायचे तर या पालापाचोळ्याचा योग्य उपयोग करून आपले उद्दिष्ट साध्य करता येईल. एक लहानशी कृती पर्यावरण रक्षणाला हातभार लावणारी ठरेल. पानगळ आहे म्हणूनच बहर देखील आहे तो खरोखरीच मनाला मोहून टाकतो

संगीता वाईकर/ ९९२२५०४७९४

## वाचक पत्रे

### कुंभमेळ्यात लोक आकर्षित का होतात?

प्रयागराजमधील कुंभमेळ्याला जगभरातून भाविक मोठ्या संख्येने आकर्षित होतात. यामागची काही प्रमुख कारणे आढळतात धार्मिक महत्त्व : प्रयागराजमध्ये गंगा, यमुना आणि सरस्वती या तीन नद्यांचा संगम होतो, ज्याला त्रिवेणी संगम म्हणतात. हिंदू धर्मात या संगमाला विशेष महत्त्व आहे.&nb sp; कुंभमेळ्यात पवित्र स्नानाला विशेष महत्त्व आहे, ज्यामुळे पापक्षालन होते आणि मोक्ष मिळतो, अशी भाविकांची श्रद्धा आहे. ज्योतिषीय महत्त्व : कुंभमेळ्य ाचे आयोजन ज्योतिषीय गणनेवर आधारित असते. विशिष्ट ग्रहस्थितींमध्येच कुंभमेळा भरतो, ज्यामुळे त्याला विशेष महत्त्व प्राप्त होते. सांस्कृतिक आणि आध्यात्मिक अनुभव : कुंभमेळा हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून, तो एक सांस्कृतिक आणि आध्यात्मिक उत्सव आहे.&nb sp; यात विविध धार्मिक विधी, प्रवचने, कीर्तने आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते, ज्यामुळे भाविकांना एक वेगळा अनुभव मिळतो. १४४ वर्षांनी महाकुंभ येणार असल्याने आपल्या आधीच्या पिढीला आणि येणाऱ्या पिढीला हा योग मिळणार नाही. डिजिटल माध्यमांनी याचा जोरदार प्रचार केला. व्हीव्हीआयपी आणि सेलिब्रिटीसुद्धा महाकुंभात आले. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेक राज्यांचे मुख्यमंत्री आले.

जागतिक स्तरावर महत्त्व : महाकुंभम `ळ्याचे महत्त्व केवळ भारतातच नाही तर जगभरात आहे. युनेस्कोने या उत्सवाला 'मानवतेचा अमूर्त सांस्कृतिक वारसा' म्हणून मान्यता दिली आहे. या सर्व कारणांमुळे प्रयागराजचा कुंभमेळा जगभरातील भाविक, पर्यटक आणि अभ्यासक यांना आकर्षित करतो.

अनंत ताम्हणे / ९४२२६१४७६२

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# उपमुख्यमंत्री अजितदादांच्या उपस्थितीत आज विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २७ फेब्रुवारी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे दिनांक २८ फेब्रुवारी रोजी नांदेड जिल्हा दौऱ्यावर येत आहेत.त्यांच्या प्रमुख उपस्थितीत माजी आमदार मोहन हंबर्डे यांचा पक्ष प्रवेश होणार आहे. याशिवाय इतर अन्य कार्यक्रमही आयोजीत करण्यात आले आहेत.



या दौऱ्याच्या अनुषंगाने जय्यत तयारी करण्यासाठी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या अध्यक्षतेखाली साई सुभाष या त्यांच्या संपर्क कार्यालयात आज बैठक पार पडली. यावेळी आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्यासह माजी आमदार मोहन हंबर्डे, जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी, महानगराध्यक्ष जीवनराव घोगरे, भाऊसाहेब देशमुख गोरठेकर, माधवराव पावडे, बाळासाहेब पाटील रावणगावकर, श्रीमंती सुनंदाताई जोगदंड, अनुसयाताई केंद्रे माजी नगराध्यक्ष कंधार, माणिकराव चव्हाण, श्रीमंती जयश्रीताई पाटील, एडवोकेट बाळासाहेब कांबळे, स्वप्निल इंगळे,राजेश देशमुख, श्रीकांत किन्हाळकर बाबुराव बिलाळीकर, मोहसीन खान पठाण, कन्हैया कदम , रोहिणी कुलकर्णी नेताजी भोसले, विक्रम देशमुख, आनंद डांगे,नागापूरकर, शिवानंद डांगे, सुरेश बिल्लेवार, परशुराम पाटील,डॉक्टर उत्तम सोनकांबळे, रामदास पाटील सोमठाणकर, शिवराज पाटील होटाळकर पपू जाधव यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

दिनांक २८ रोजी माजी आमदार मोहनांना हंबर्डे यांचा अजितदादा पवार यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पक्षप्रवेश होणार आहे. याचवेळी नांदेड जिल्ह्यातील विविध पक्षातील आणि पदाधिकारी आणि कार्यकर्तेही राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पक्षप्रवेश करणार आहेत. या पक्षप्रवेश सोहळ्याची जय्यत तयारी करण्याचे अनुषंगाने पार पडलेल्या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वच पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्ते उपस्थित होते. हा पक्ष प्रवेश सोहळा नांदेड जिल्ह्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

**उमरज , बोरीत कलशारोहण आणि लोकार्पण सोहळा**

आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या पुढाकारातून साकारलेल्या उमरज येथील मंदिराचा कलशारोहण आणि बोरी येथील महादेव मंदिर सभागृह लोकार्पण सोहळा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते आणि राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडणार आहे अशी माहिती आ. चिखलीकर यांच्या संपर्क कार्यालयातून देण्यात आली आहे.

लोहा कंधार विधानसभा मतदारसंघात विकासाची असंख्य कामे खेचून आणून या भागाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सतत प्रयत्न करणारे आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी या भागातील देवस्थानांच्या उद्धारासाठीही त्यांनी शासन दरबारी पाठपुरावा केला आहे. याच पाठपुराव्यातून कंधार तालुक्यातील उमरज येथील देवस्थानाच्या विकासासाठी भरीव असा निधी उपलब्ध करून दिला आहे. याच निधीतून उमरज येथील देवस्थान साकारले आहे. या मंदिराचा कलशारोहण सोहळा आज पार पडणार आहे याच वेळी बोरी बुद्रुक येथील महादेव मंदिर येथील सभागृहाचा लोकार्पण सोहळा ही आयोजित केला आहे. हा सोहळा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते पार पडणार आहे.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील राज्यमंत्री इंद्रनिल नाईक आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, प्रवीण पाटील चिखलीकर राष्ट्रवादीचे जिल्हा अध्यक्ष दिलीप धर्माधिकारी , नांदेड महानगराध्यक्ष जीवन पाटील घोगरे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. लोहा कंधार विधानसभा मतदारसंघातील जनतेनी आणि भाविक भक्तांनी उपस्थित रहावे असे आवाहन राष्ट्रवादी कंधार तालुकाध्यक्ष मनोहर पाटील भोसीकर लोहा तालुका अध्यक्ष शत्रुघन महाराज यांनी केले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी इथपर्यंत आणलेला गाडा मागे येऊ देऊ नका : ॲड. बाळासाहेब आंबेडकर

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,दि. २७ फेब्रुवारी**

वंचित बहुजन आघाडीच्या वतीने घेण्यात आलेल्या माता रमाई आंबेडकर जयंती महोत्सव २०२५ सिडको येथील गुरुवार बाजार जेतवन बुद्ध विहार येथे जयंती कार्यक्रमाचे उद्घाटन प्रसंगी श्रद्धेय ड. बाळासाहेब आंबेडकर यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी चळवळीतील घटकांना उद्देशून म्हणले होते, की चळवळीचा हा गाडा मी इथपर्यंत आणला आहे, तुम्हाला पुढे नेता आले तर घेऊन जा! अन्यथा मागे येऊ देऊ नका! या वक्तव्याची पुनरावर्ती ड.बाळासाहेब आंबेडकर यांनी दिनांक २६ फेब्रुवारी रोजी माता रमाई जयंती निमित्त केली.



माता रमाई आंबेडकर जयंती महोत्सव २०२५ सिडको नवीन नांदेड गुरुवार बाजार जैतवन बुद्ध विहार प्रांगणात साजरा करण्यात आला. या जयंती महोत्सवास ड.बाळासाहेब आंबेडकर यांनी उद्घाटन करून आपले मनोगत व्यक्त केले यावेळी ड.बाळासाहेब आंबेडकर यांनी शरद पवार गट राष्ट्रवादी काँग्रेस व नॅशनल काँग्रेस यांच्यावर सडकून टीका करत असताना मनाले की ज्या ज्या राज्यात काँग्रेसची सत्ता आहे त्या त्या राज्यात काँग्रेसने आरक्षण विरोधी मोहीम चालवली आहे आणि आरक्षण संपुष्टात आणत आहेत अशावेळी संघर्ष करावा लागणार आहे. तसेच सुप्रीम कोर्टाने आरक्षणाबाबत निर्णय घेतला ज्या ज्यांनी काही आरक्षणाबाबतचा लाभ घेतला असेल त्यांना यापुढे आरक्षणात सवलत मिळणार नाही. असा निर्णय पारित केला असल्याचेही ड .बाळासाहेब आंबेडकरांनी सांगितले्. पुढे ते म्हणाले की डॉ. बाबासाहेब म्हणत होते प्रत्येक पायरी वरती जिथे तुम्ही उभे आहात तिथेच उभे राहण्यासाठी तुम्हाला संघर्ष करावा लागणार आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आणि गाड्याचे उदाहरण दिले होते. चळवळीचा हा गाडा आहे इथपर्यंत खेचत आणला आहे. तुम्हाला पुढे नेता आला तर घेऊन जा! जर पुढे घेऊन जाता येत नसेल तर पाठीमागे येऊ देऊ नका ही जबाबदारी डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्यावर टाकली आहे. म्हणून आपण संघटित राहणे महत्त्वाचे आहे. संघटनेत ताकद असल्याचे मत व्यक्त केले्. यावेळी नांदेड दक्षिण जिल्हा अध्यक्ष शिवा भाऊ नरंगले, प्रदेश प्रवक्ते फारूक अहेमद, जयंती मंडळाचे अध्यक्ष शोभाताई प्रदीप जोगदंड यांनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी मंचकावर गोविंद दळवी, अविनाश भोशिकर, अक्षय बनसोडे, डॉ ्.संघरत्न कुऱ्हे, शिवाभाऊ नरंगले, राजेश हत्तीआंबिरे, इंजि.प्रशांत इंगोले, श्याम कांबळे, हौसाजी वारघडे, पी एम वाघमारे, सुभाष डोंगरे, एस एस भंडारे, कैलास वाघमारे, विनायक गजभारे यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाम कांबळे यांनी केले.तर आभार प्रदर्शन प्रा. मधुकर गायकवाड यांनी मानले. या कार्यक्रमाचे स्वागत अध्यक्ष राजू वाघमारे हे होते. माता रमाई जयंती निमित्य आपल्या गायनातून प्रबोधन करणारे महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध गायक साजन बेंद्रे यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. सदरील माता रमाई जयंती महोत्सव यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी संयोजन समितीचे अनिल बेरजे, अमृत नरंगलकर, साहेबराव भंडारे, गौतम डुमणे,राजु जमदाडे यांनी परिश्रम घेतले. भीम गीताचा आस्वाद घेण्यासाठी परिसरातील हजारोच्या संख्येने समाज बांधवांची उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त

### गोविंद गोखले यांचे निधन

हिमायतनगर

गोविंद गोखले यांचे हृदय विकाराने दुःख निधन झाले असून त्यांचे अंत्यसंस्कार दि.२७ फेब्रुवारी २०२५ रोजी चार वाजता होणार आहे. ते एक आंबेडकर चळवळीतील ज्येष्ठ व सामाजिक कार्यामध्ये अग्रेरस असणारे नेतृत्व होते. त्यांच्या जाणने. सर्वत्र शोककळा पसरली ते वंचित बहुजन आघाडीचे तालुका अध्यक्ष होते. त्यांच्या पश्चात मुली, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.



# एक-दोन कार्यकर्ते इकडे-तिकडे गेल्याने काँग्रेस संपणार नाही : रवींद्र चव्हाण

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. २७ फेब्रुवारी**

मुदखेड शहरात प्रसिद्ध असलेले श्री अपरंपार स्वामी मठात दि. २६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर दीपोत्सव कार्यक्रमात उपस्थित राहण्यासाठी नांदेड जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार प्रा. रवींद्र पाटील चव्हाण आले असता उपस्थित कार्यकर्त्यांना उद्देशून आपल्या भाषणातून खासदार प्रा. रवींद्र पाटील चव्हाण यांनी कार्यकर्त्यांनी खचून न जाता तितक्याच जोमाने पक्ष संघटन वाढीसाठी काम करावे एक-दोन कार्यकर्ते पक्ष सोडून इतर पक्षात प्रवेश केल्याने काँग्रेस पक्ष संपणार नसून काँग्रेस पक्ष हा महासागर असल्याचे सांगत प्रत्येक कार्यकर्ता हा खासदाराचा प्रतिनिधी असल्याची ग्वाही देत येणाऱ्या स्थानिक स्वराज्य निवडणुकीत सर्व कार्यकर्त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणार असल्याचे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.



यावेळी नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटी कार्याध्यक्ष पप्पू पाटील कोंडेकर, काँग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख, माजी उपाध्यक्ष करीम खान साब, माजी उपाध्यक्ष लक्ष्मण देवदे, माजी उपाध्यक्ष खलील कुरेशी, संशोधन विभागाचे माधव हामंद,शिवसेना उबाठा तालुकाप्रमुख पिंटू पाटील वासरीकर, तालुका उपाध्यक्ष काँग्रेस कमिटी दादाराव पाटील पूयड, काँग्रेस जिल्हा प्रवक्ता श्रीनिवास महादवाड, माजी सभापती प्रतिनिधी राजेश पाटील पवार,गिरीश कोत्तावार शहर युवक काँग्रेस अध्यक्ष मुजीब पठाण, ऊबाठा गटाचे शहर प्रमुख अंकुश मामिडवार,सचिन चंद्रे,भीम महादवाड,ज्येष्ठ पत्रकार हाजी अजगर हुसेन साब, अतीख अहेमद,साहेबराव देशमुख, पत्रकार शेख इरफान,रमेश बोडके, सुभाष चौदंते या यासह आदींची प्रमुख उपस्थिती होती.

सत्कार कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आकाश सोनटक्के, बंडू पाटील ढगे, सुरेश पाटील ढगे, गिरीश कोत्तावार,मोहम्मद असलम किराणा,चेतन निलावार, प्रद्युमन देवदे, नितीन अडाने, आकाश आरेवाड, आदींनी परिश्रम घेतले कार्यक्रमाचे आभार माजी उपाध्यक्ष करीम खान साब यांनी मांडले.

# एमजे खून प्रकरणातील आरोपींना पोलीस कोठडी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २७ फेब्रुवारी**

शहरातील गणेशनगर भागात आज दि. २६ फेब्रुवारी सकाळी ८ च्या सुमारास एका तरुणाचा तीक्ष्ण हत्याराने वार करुन निघृणपणे खून केल्याची घटना घडली. या घटनेतील दोन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अवघ्या १२ तासात अटक केली असून न्यायालयाने त्यांना सात दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.

नांदेड तालुक्यातील ढोकी येथील अमोल भुजबळ उर्फ एमजे याच्यावर तीक्ष्ण हत्याराने वार करून ठार करण्यात आले. या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. स्थानिक गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रवी वाहुळे व त्यांच्या पथकाने लावला. मारेकरी गोपाल निवृत्ती वाकोडे, निखिल भगवान वाकोडे यांना परभणी जिल्ह्यातील एका खेडेगावातून ताब्यात घेतले. त्यांना आज न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने सात दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.

# लिफ्ट आणि स्काय वॉकचे काम जलद गतीने पूर्ण करा : जिल्हाधिकारी राहुल कर्डीले



**तभा वृत्तसेवा**
**माहूर दि. २६ फेब्रुवारी**

नांदेड येथे रूजू झाल्यानंतर प्रथमच देवभूमी श्री ्क्षेत्र माहूरगडच्या दौऱ्यावर येत जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिनांक २६ फेब्रुवारी रोजी गडावरील श्री रेणुका देवीचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी संस्थान येथे सुरू असलेल्या लिफ्ट आणि स्काय वाकच्या कामाच्या ठिकाणी भेट देऊन कंत्राटदारांना काम जलद गतीने पूर्ण करण्याच्या सक्त सूचना दिल्या. यावेळी सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली, तहसीलदार किशोर यादव यांचेसह अधिकारी उपस्थित होते. तर नगराध्यक्ष फिरोज भाई दोसानी यांचे सह मान्यवरांनी त्यांचा सत्कार केला.जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी माहूर दौऱ्यात गडावरील तीर्थक्षेत्र विकास आराखडा अंतर्गत बांधण्यात आलेल्या टुरिस्ट फॅसिलिटी सेंटर येथे भेट देऊन सर्वप्रथम पाहणी केली. तसेच येथे भाविकांना सोई सुविधा, सुरक्षा बाबत माहिती घेत येथे पार्किंगसाठी उभारण्यात आलेल्या जागेची सुद्धा पाहणी केली.यानंतर त्यांनी गडावरील सुरू असलेल्या लिफ्ट आणि स्काय वाकच्या कामाची पाहणी करत येथील कंत्राटदार व अधिकाऱ्यांना संथ गतीने सुरू असलेले काम जलद गतीने पूर्ण करण्याची सक्त सूचना केल्या.

तदनंतर त्यांनी श्री रेणुकादेवी मंदिरात जाऊन मातेचे दर्शन घेत आरती केली. त्यानंतर संस्थानच्यावतीने विश्वस्त तथा पुजारी चंद्रकांत भोपी व संजय कान्नव यांचे कडून त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सर्व विश्वस्त, पुजारी,कर्मचारी,सुरक्षा रक्षक उपस्थित होते. दर्शनानंतर विश्रामगृह येथे लिफ्ट आणि स्कायवॉकचे काम करण्यासाठी उठवले जाणारे विविध दुकानांचे व्यापारी आणि जिल्हाधिकारी यांच्यामध्ये एक समन्वय बैठक घेण्यात आली.यावेळी बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत कोरे,तहसीलदार किशोर यादव, वनपरिक्षेत्र अधिकारी रोहित जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक शिवप्रकाश मुळे, नायब तहसीलदार डॉ.राजकुमार राठोड, सांबाचे सहाय्यक अभियंता रवींद्र उमाळे, सांबा चे सहाय्यक अभियंता आकाश राठोड, प्रोजेक्ट मॅनेजर विडेकर आणि माने यांचेसह मान्यवरांची उपस्थिती होती.

# नांदेड ग्रंथोत्सवाचे आजपासून आरंभ मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २७ फेब्रुवारी**

ग्रंथालय संचालनालय व जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय नांदेड यांच्या वतीने बहुउद्देशिय सांस्कृतिक संकुल, श्री.गुरुगोविंद सिंघजी स्टेडीयम परिसर, नांदेड येथे दोन दिवसीय नांदेड ग्रंथोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. नांदेड मधील साहित्यप्रेमी जनतेने या ग्रंथोत्सवाचा लाभ घ्यावा,असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

ग्रंथोत्सवाचे उदघाटन शुक्रवार दिनांक २८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.०० वा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक श्री.श्रीकांत देशमुख,यांच्या हस्ते होणार आहे.पहिल्या दिवशी दि.२८ फेब्रुवारी रोजी सकाळी ८.३० वा ग्रंथदिंडी महात्मा फुले पुतळा ते कार्यक्रम स्थळ निघेल. यावेळी अजय दत्तात्रय शिंदे,उपजिल्हाधिकारी नांदेड यांच्या हस्ते होणार आहे .

उदघाटन सकाळी ११.००वा. श्रीकांत देशमुख यांच्या हस्ते होईल. यावेळी विशेष अतिथी म्हणून मा. अतुल सावे,मंत्री,इतर मागास,बहूजन कल्याण,दुग्धविकास,अपारंपारिक ऊर्जा तथा पालकमंत्री नांदेड जिल्हा उपस्थित राहणार आहेत. तसेच या कार्यक्रमाचे अध्यक्ष भगवंत क्षीरसागर असणार असून प्रमुख अतिथी खा.अशोकराव शंकरराव चव्हाण, आ.हेमंत श्रीराम पाटील,खा.अजित गोपछडे,खा. रविंद्र वसंतराव चव्हाण, खा.नागेश बापुराव पाटील आष्टीकर, खा. डॉ.शिवाजीराव बंडप्पा काळगे, आ.विक्रम वसंत काळे, आ.सतीश भानुदास चव्हाण, आ.प्रताप पाटील चिखलीकर, आ.भिमराव रामजी केराम, आ. डॉ.तुषार गोविंदराव राठोड, आ.बालाजी देविदासराव कल्याणकर, आ. राजेश संभाजी पवार, आ.जितेश रावसाहेब अंतापूरकर, आ.बाबुराव कदम कोहळीकर, आ.आनंद शंकर तिडके, आ.श्रीजया अशोकराव चव्हाण,राहुल कर्डिले,जिल्हाधिकारी,नांदेड श्रीमती मिनल करनवाल, मुख्य कार्यकारी अधिकारी,नांदेड अबिनाश कुमार, पोलिस अधिक्षक,नांदेड डॉ. महेशकुमार डोईफोडे,आयुक्त,म.न.पा.नांदेड, माजी.आ.ड.गंगाधर पटने,अध्यक्ष जिल्हा ग्रंथालय संघ,नांदेड अशोक गाडेकर,ग्रंथालय संचालक,म. रा.,मुंबई.सुनील हुसे,सहाय्यक ग्रंथालय संचालक,छत्रपती संभाजीनगर यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. पाहिल्या दिवशी परिसंवाद एआयच्या काळात वाचनसंस्कृतीपुढील आव्हान घेण्यात येईल. यानंतर परिसंवाद भारतीय संविधानाच्या अमृतमहोत्सवी पर्वावर सामान्य नागरिकांचे कर्तव्यघेण्यात येईल.

# यादव अहिर गवळी समाजाच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. २७ फेब्रुवारी**

यादव अहीर गवली समाज क्रिकेट स्पर्धा, १ मार्च ते ९ मार्च २०२५ दरम्यान मोदी मैदान,मामा चौक असर्जन,नांदेड़ आयोजित केली आहे.

महाराष्ट्रसह मध्यप्रदेश आणि तेलंगणा येथील २७ यादव समाजाचे संघ या स्पर्धेत सहभागी होतील. ेस्पर्धेतील विजेत्याला ५१ हजार रुपयांचे पहिले बक्षीस आणि उपविजेत्याला ३१ हजार रुपयांचे दुसरे बक्षीस दिले जाईल. त्या सोबत मॅन ऑफ द सिरीज , मॅन ऑफ द मॅच, बेस्ट बॉलर, बेस्ट बॅट्समन, सुपर फिफ्टी आणि सुपर सिक्स करिता अशी अनेक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.

दर वर्षी ही स्पर्धा श्री यादव अहिर गवली समाज, नांदेड द्वारे आयोजित केली जात आहे, जो समाजाचा एक महत्त्वाचा उपक्रम आहे. अशी माहिती धीरज यादव,कमल बटाउवाले, तुलजेश गुरुखुदे, विनय रौत्रे, सुंदरलाल परिवाले डॉ. कैलाश यादव, दीपक जाफराबादी, विक्रम रौत्रे, शुभम पहाडीये यांनी दिली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कपिल रौत्रे, पवन कोतवाल, ललित बटाउवाले,पवनभैय्या मंडले, यश मंडले, निलेश भातावाले, अजय मंडले, भातेवाले, कैलाश परिवाले, शुभम चौधरी, रोहन कुटल्यावाले, मुकेश कोतवाल आदी सदस्य परिश्रम घेत आहेत.

# महाशिवरात्रीनिमित्त परमेश्वर मंदिरात अलोट गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**हिमायतनगर ,दि. २७ फेब्रुवारी**



महाशिवरात्री निमित्त श्री परमेश्वर मंदिरात दर्शनासाठी भाविकांची अलोट गर्दी झाली होती. २५ फेब्रुवारीला रात्री बारा वाजेपासून मंदिरात भाविकांच्या दर्शनासाठी रांगा लागल्या होत्या. दी. २६ रात्री उशिरापर्यंत भाविक दर्शन घेत होते.

हिमायतनगर (वाढोणा) येथे सातशे वर्षांपूर्वीचे पुरातन श्री परमेश्वराचे हेमाडपंथी पंथी मंदिर आहे. भारतातील शंकर रुपी अवतारातील श्री परमेश्वराची उभी मूर्ती गाभाऱ्यात आहे. मूर्तीच्या गाभाऱ्याला ४३ किलो चांदीचा लेप लावण्यात आल्याने मंदिराच्या वैभवात मोठी भर पडली आहे. हिमायतनगर वाढोण्याचे श्री पूमेश्वर मंदिर येथे महाशिवरात्र महोत्सवाची पर्वणी असते. महाशिवरात्र पर्वानिमित्त हजारो भाविकांनी श्री परमेश्वराच्या मूर्तीचे दर्शन घेतले. मंदिर ट्रस्ट कमिटी व दानशूर भाविकांच्या वतीने उपवासासाठी शाबूदाना दूध, केळी वाटप करण्यात आले. रात्री उशिरापर्यंत दर्शनासाठी भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी दिसून आली होती. विशेषत्वाने महिला भाविकांची विशेष उपस्थिती होती.यावेळी पोलिस प्रशासन व मंदिर कमेंट यांच्या कडून भाविक भक्तांची व्यवस्था व कडेकोट बंदोबस्त ठेवला होता.

# उप मुख्यमंत्री अजित पवार यांचा नांदेड दौरा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड ,दि. २७ फेब्रुवारी**

महाराष्ट्र राज्याचे उप मुख्यमंत्री अजित पवार हे नांदेड दौऱ्यावर येत असून त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.



शुक्रवार २८ फेब्रुवारी २०२५ रोजी मुंबई येथून विमानाने सकाळी ९.३० वाजता श्री गुरू गोविंद सिंघजी विमानतळ, नांदेड येथे आगमन. सकाळी ९.३५ वाजता मोटारीने प्रयाण, नंतर स्वागत रॅली. नंतर श्री. हुजूर साहिब गुरूद्वारा अबचलनगर, नांदेड येथे दर्शन. सकाळी १०.४५ वाजता मोटारीने ओम गार्डन, कौठा, नांदेड जि.नांदेड येथे आगमन. सकाळी १०.४५ वाजता पक्षप्रवेश कार्यक्रम. नंतर दुपारी १२.२० वाजता कौठा, नांदेड जि. नांदेड येथे आगमन. दुपारी १२.२० वा. श्री.मोहनराव हंबर्डे, माजी आमदार यांच्या संपर्क कार्यालयाचे उद्घाटन. दुपारी १२.४५ वाजता मोटारीने आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांचे दिपक-ज्योती निवासस्थान, बोरबन, नांदेड येथे आगमन. दुपारी १२.४५ वा. राखीव. दुपारी १.५५ मोटारीने कौठा हेलिपॅड आसर्जन मैदान ता. जि. नांदेड येथे आगमन. दुपारी २ वाजता हेलिकॉप्टरने मौजे उमरज हेलिपॅड, ता. कंधार जि. नांदेड कडे प्रयाण. दुपारी २.२० वाजता मौजे उमरज हेलिपॅड, ता. कंधार, जि. नांदेड येथे आगमन. दुपारी २.३० वाजता मोटारीने उमरज, ता. कंधार, जि. नांदेड येथे आगमन. दुपारी २.३० वाजता महंत श्री. गुरु एकनाथ नामदेव महाराज यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी ३.३५ वाजता मोटारीने बोरी बु. ता. कंधार, जि. नांदेड येथे आगमन. दुपारी ३.३५ वा. आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी आयोजित केलेल्या देवस्थानच्या कार्यक्रमास उपस्थिती. सायं. ४.३५ वाजता मोटारीने मौजे उमरज हेलिपॅड, ता. कंधार, जि. नांदेड येथे आगमन. सायं. ४.४० वा. हेलिकॉप्टर परभणीकडे प्रयाण करतील. रात्री १०.३५ वाजता परभणी येथून मोटारीने श्री गुरु गोविंद सिंगजी विमानतळ, नांदेड येथे आगमन. रात्री १०.४० वाजता विमानाने पुणे कडे प्रयाण करतील.

# संविधान गौरव दिनानिमीत्त उत्कृष्ट कार्य केलेत्यांना राज्यस्तरीय पुस्कार प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि. २७ फेब्रुवारी**

भारतीय संविधान गौरव सोहळ्या निमित उमरी येथे घेतलेल्या कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या कर्तबगार सामाजिक कार्यत्यांना राज्यस्तरीय पुरस्कार देवून गौरविण्यात आले आहे.



दरवर्षी संविधान गौरव सोहळा साजरा करण्यात येते यंदा ही पर्व ९ व्ये म्हणून दि . २४ फेबुवारी २०२५ रोजी घेण्यात आले या कार्यक्रमाचे आयोजक नगरसेवक प्र सोनू वाघमारे यांनी संविधान गौरव सोहळा निमित माता रमाई आंबेडकर जयंती , छत्रपती शिवाजी महाराज जयंती , गुरू रविदास महाराज यांची जयंती , संत सेवालाल महाराज अशा महापुरुषाची संयुक्त कार्यक्रम घेवून पुरस्कार सोहळा मान्यवराना देण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्ष उदोजक मारोतराव कवळे गुरुजी होते तर प्रमुख पाहुणे कैलास देशमुख गोरठेकर ( मध्यवर्ती बॅक संचालक नांदेड ) जी पी मिसाळे धर्माबादकर , एम सायलूदादा म्हैसेकर , सुदर्शन वाघमारे , गंगाधर धडेकर , पारसमल दर्डा , रतन खंदारे ,डी जी तुपसाखरे , एन व्ही डोंगरे , सुर्यकांत पा कौडगावकर , आदी मान्वराचे स्वागताध्यक्ष ईश्वर विठठलराव सवई होते .

सौ नीलम कांबळे कर्तव्यदक्ष मुख्याधिकारी तर अंकुश माने कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक गौरविण्यात आले आणि कैलास गोरठेकर यांना ही राजकीय नवयुक सामाजीक भुषण राजकीय पुरस्कार प्रदान करण्यात आला .

ईश्वर विठ्ठलराव सवई (समाज भूषण), एम सायलु दादा म्हैसेकर (जीवन गौरव) , अंजली बिबिसार गडपाळे ( बाल गायिका), पत्रकार उध्दव मामडे (पत्रकार), प्रा चंद्रकांत कुऱ्हाडे(सामाजिक), जी पी मीसाळे (जीवन गौरव), गंगाधर धडेकर (सामाजिक), सुदर्शन वाघमारे(पत्रकार), सौ लक्ष्मी पुंडलिक वाघमारे(उत्कृष्ट शिक्षक), संतोष भायेगावकर(सामाजिक), नारायण घुगे(सामाजिक), गंगाधर लव्हाळे (समाजसेवक), मधुकर पवार(उत्कृष्ठ मुख्याध्यापक), भगवान कांबळे(समाज सेवक), दत्ता त्रिमुखे(जीवन गौरव), डॉ राहुल जाधव, माधव पवार (कर्तव्यदक्ष पोलिस कर्मचारी), राहुल सोनकांबळे(पत्रकार), शंकर वाघमारे बनाळीकर (जीवन गौरव), बालाजी पंतोजी(उत्कृष्ट शिक्षक), साना भालेराव(जीवन गौरव), प्रकाश तुमकुंटे (सामाजिक), गंगाधर वाघमारे येळवतकर(सामाजिक) आदी २५ पुरस्कार प्रदान करण्यात आले . आयोजक नगसेवक प्र सोनू वाघमारे यांनी प्रस्ताविक केले.

या सयोजन समितीचे प्रमुख सोनू वाघमारे, स्वप्नील भोसीकर ''बालाजी देवके, गंगाधर गच्वे, सचिन खंडेलोटे, संदिप लांडगे , रॉकी देवकसवाड, राजेश सवई, विकी रणनवरे, प्रदिप जोंधळे, आदी संयोजन समितीने केले तर सुंदर असे सुत्रसंचालन कैलास धुतुरे आणि अभार सोनूभाऊ वाघमारे यांनी मानले त्या नंतर बुद्ध गिताचा जंगी सामना झाला यापेळी विशेष असे स्टार प्रवाह चे छोटे उस्ताद बाल गायीका कु अंजली बी गडपाळे ह्या उपस्थित होते.

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## किर्ती किरण पुजार यांनी जिल्हाधिकारी पदाची सूत्रे स्वीकारली

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ फेब्रुवारी -**

धाराशिव जिल्हाधिकारी पदाची सूत्रे किर्ती किरण एच पुजार यांनी २७ फेब्रुवारी २०२५ रोजी स्वीकारली.

जिल्हाधिकारी डॉ.सचिन ओंबासे यांची बदली सोलापूर महानगरपालिका आयुक्त या पदावर झाल्यानंतर जिल्हाधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार अपर जिल्हाधिकारी प्रकाश अहिरराव यांच्याकडे होता.




पुजार हे भारतीय प्रशासकीय सेवेच्या सन २०१८ च्या तुकडीचे सनदी अधिकारी आहेत. यापूर्वी श्री.पुजार यांनी परिविक्षाधिन अधिकारी म्हणून चंद्रपूर जिल्ह्यातील गोंडपिंपरी येथे उपविभागीय अधिकारी व नांदेड जिल्ह्यातील किनवट येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय येथे प्रकल्प अधिकारी म्हणून काम केले आहे. धाराशिव जिल्हाधिकारी या पदावर येण्यापूर्वी पुजार हे रत्नागिरी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत होते.

## संक्षिप्त वृत्त...

### रामशेट्टींची शिवराज मोटेगावकराबरोबर भेट

**जळकोट, दि.२७ फेब्रुवारी -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील समर्थ कोचिंग क्लासेसचे संचालक व द इंग्लिश लँग्वेज पुस्तकाचे लेखक रामशेट्टी पाटील यांनी लातूर येथे आरसीसी क्लासेसचे संचालक प्रा.शिवराज मोटेगावकर यांची भेट घेऊन शैक्षणिक विषयावर चर्चा केली. यावेळी प्रा.मोटेगावकर यांनी लातूर येथील त्यांच्या क्लासेसमध्ये रामशेट्टी पाटील यांचा विठ्ठलाची मूर्ती देऊन यथोचित सत्कार करून शैक्षणिक चळवळीमध्ये आपल्या सोबत असल्याचे सांगितले. समर्थ क्लासेसच्या माध्यमातून मार्गदर्शन शिबिरे, पालक मेळावे व विविध सामाजिक उपक्रम यांचे सतत आयोजन केले जाते. त्यांच्या कार्याला पालक वर्गातून कौतुक केले जात आहे.



### रहदारीस धोकादायकरीत्या वाहन उभे; गुन्हे नोंद

**परंडा, दि.२७ फेब्रुवारी -**

शहरातील रहदारीला अडथळा ठरणाऱ्या वाहनचालकांविरोधात परंडा पोलिसांनी कारवाई करत दोन जणांवर गुन्हे नोंदवले आहेत. दि. २६ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ९.३० ते दुपारी ३.१० वाजेच्या सुमारास आरोपी महंम्मद तात्या शिंदे (रा.वैद गल्ली,परंडा) आणि पिंटु लाला जाट (रा.आगरकर गल्ली, परंडा) यांनी आपापली वाहने (एमएच ४८ जी १८२६ व एमएच १४ एचजी ०२५२) छत्रपती शिवाजी महाराज चौक आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात रहदारीस अडथळा निर्माण होईल अशा धोकादायक पद्धतीने उभी केली होती. परंडा पोलिसांनी याची दखल घेत आरोपींवर भारतीय दंड संहितेच्या कलम २८५ अंतर्गत स्वतंत्र गुन्हे नोंदवले. पुढील तपास परंडा पोलीस करीत आहेत.

# प्राण्यांसाठी ९९ पाणवाट्यांवर पाण्याची सुविधा, वनविभागाची तयारी वेगात

**वाघाला पकडण्यासाठी मुदतवाढीची मागणी... वाघ पकडण्यासाठी आणखी सुविधा मिळण्याची गरज...**

**तभा वृत्तसेवा/ प्रमोद राऊत**
**धाराशिव, दि.२७ फेब्रुवारी -**

गेल्या काही दिवसांपासून परिसरात दहशत माजवणाऱ्या वाघाच्या शोध मोहिमेसाठी वनविभागाने अधिक मुदतवाढीची मागणी केली आहे. वाढत्या उन्हामुळे जंगलातील जलस्रोत आटत असून, त्यामुळे वन्यप्राण्यांना पाणी मिळण्यात अडचणी येत आहेत. याची दखल घेत वनविभागाने जंगलात ९९ ठिकाणी पाणवाट्यांवर पाण्याची सुविधा करण्याची योजना आखली आहे.



गेल्या काही महिन्यांपासून परिसरात वाघाच्या हल्ल्यांमध्ये वाढ झाली आहे. काही ठिकाणी पाळीव प्राण्यांवर हल्ले झाले असून, शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण आहे. त्यामुळे वाघाला जेरबंद करण्यासाठी वनविभागाने मोहिम राबवली होती. मात्र, वाघाचा ठावठिकाणा सापडत नसल्याने ही मोहिम अधिक काळ चालवावी लागणार आहे. त्यामुळे वनविभागाने मुदतवाढीची मागणी केली आहे.

या मोहिमेसाठी प्रशिक्षित कर्मचारी, हत्ती, ड्रोन आणि कॅमेऱ्यांचा वापर केला जात आहे. वाघाच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवले जात असून, त्याच्या हालचालींचा वेग आणि मार्ग यानुसार सापळे रचले जात आहेत.

उन्हाळ्यात पाण्याची टंचाई जाणवत असल्याने वन्यप्राण्यांना अन्न-पाण्यासाठी जंगलाबाहेर पडावे लागते. त्यामुळे मानव-वन्यजीव संघर्ष वाढू शकतो. याची दखल घेत वनविभागाने ९९ ठिकाणी कृत्रिम जलस्रोत तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. काही ठिकाणी टाक्या बसवण्यात आल्या असून, बोअरवेल आणि जलवाहिन्यांच्या माध्यमातून त्यात पाणी टाकले जात आहे. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, वन्यप्राण्यांना नैसर्गिकरित्या पाणी उपलब्ध होईल यासाठी प्रयत्न सुरू आहेत. काही ठिकाणी पूरक पाणी व्यवस्थापन करण्याचा विचार असून, स्थानिक नागरिक आणि स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने हे काम हाती घेण्यात येत आहे.

वाघाच्या हल्लयांमुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. काही शेतकऱ्यांनी रात्रीच्या वेळी घराबाहेर न पडण्याचा सल्ला दिला आहे. तसेच, जंगलाच्या सिमेवरील गावे सतर्क राहावीत, असे आवाहन वनविभागाने केले आहे. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी नागरिकांना शांत राहण्याचे आणि वाघ दिसल्यास तातडीने अधिकाऱ्यांना कळवण्याचे आवाहन केले आहे. तसेच, लोकांनी स्वयंस्फूर्तीने जंगलात न जाण्याची आणि वन्यप्राण्यांना त्रास न देण्याची विनंती केली आहे. वाघाचा ठावठिकाणा निश्चित करून त्याला शांततेत जेरबंद करणे, नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे, जंगलात पाण्याच्या सुविधा वाढवणे, मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी उपाययोजना राबवणे, वनविभागाने युद्धपातळीवर ही मोहिम राबवली असून, लवकरच वाघाला पकडण्यात यश मिळेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

### वाघ पकडण्यासाठी सुविधा मिळण्याची गरज...

धाराशिव जिल्ह्यात वाघांच्या वाढत्या हालचालीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. मागील काही दिवसांत मानव-वाघ संघर्षाच्या घटना घडल्या आहेत. परंतु, वाघांना सुरक्षितरित्या पकडण्यासाठी आवश्यक साधनसामग्री आणि मनुष्यबळ अपुरे असल्याचे समोर आले आहे. आधुनिक पिंजरे, ट्रॅकिंग उपकरणे आणि प्रशिक्षित कर्मचारी उपलब्ध नसल्याने वाघांना नियंत्रणात आणण्यास अडचणी येत आहेत. या समस्येवर तातडीने उपाययोजना केल्या नाहीत, तर संघर्ष आणखी वाढण्याची शक्यता आहे.

### रात्री वाघ पकडण्याची मोहीम, वन विभागाचा शर्थीचा प्रयत्न

जिल्ह्यात वाघाच्या हालचाली वाढल्याने वन विभागाने रात्री १० ते २ या वेळेत विशेष मोहीम राबवली. या मोहिमेदरम्यान, वाघ दहा मिनिटांच्या अंतरावर दिसताच वन विभागाच्या पथकाने त्याचा पिच्छा केला. अत्याधुनिक ट्रॅकिंग उपकरणे आणि प्रशिक्षित कर्मचाऱ्यांच्या मदतीने वाघाला शोधण्याचे प्रयत्न सुरू होते. वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, लवकरच वाघाला सुरक्षितपणे पकडले जाईल. स्थानिक नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## नूतन जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी घेतले श्री तुळजाभवानीचे दर्शन



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२७ फेब्रुवारी -**

धाराशिव जिल्ह्याचे नवनियुक्त जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी दि २६ फेब्रुवारी रोजी रात्री उशिरा श्री. तुळजाभवानी देवींचे दर्शन घेतले. डॉ. सचिन ओंबासे यांची सोलापूर महानगरपालिकेच्या आयुक्त पदी नियुक्ती झाल्यानंतर त्यांच्या जागी राज्य सरकारने नुकतीच किर्ती किरण पुजार यांची धाराशिवचे जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. किर्ती किरण पुजार हे या पूर्वी रत्नागिरी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत होते. धाराशिवचे जिल्हाधिकारी म्हणून नियुक्त झाल्यानंतर प्रथमच ते श्री तुळजाभवानी देवींच्या दर्शनाला आले असता मंदिरचे मंहत वाकोजी बुवा यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दर्शन घालून विधिवत पूजा आरती केली. यावेळी मंदिरात पुजारी सुहास कदम - भैय्ये, सचिन परमेश्वर, दत्ता क्षीरसागर, विशाल गंगणे हे पुजारी उपस्थित होते.

दर्शनानंतर मंदिर प्रशासकीय कार्यालयात मंदिर संस्थानच्या वतीने तहसीलदार अरविंद बोळंगे यांनी जिल्हाधिकारी पुजार यांचा सत्कार केला. यावेळी सहायक व्यवस्थापक (धार्मिक) अमोल भोसले, सहायक व्यवस्थापक (विद्युत) अनिल चव्हाण, भंडारपाल नागेश शितोळे, जनसंपर्क अधिकारी गणेश निर्वळ, प्रशांत जाधव, गणेश मोटे, सुरक्षा निरीक्षक विक्रम कदम, नवनाथ खिंडकर, स्वच्छता निरीक्षक अक्षय साळुंखे व मंदिर संस्थानचे कर्मचारी उपस्थित होते.

## राष्ट्रीय अविष्कार अभियानांतर्गत चार विद्यार्थ्यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२७ फेब्रुवारी -**



समग्र शिक्षा अभियानांतर्गत राष्ट्रीय अविष्कार अभियानांतर्गत जिल्हा परिषद हायस्कूलच्या अश्विनी जाधव, मोहीनी घोडके, आर्शियान शेख, आणि अभिषेक बरकंबे या विद्यार्थ्यांचा कर्नाटकमधील बेंगळुरू येथील शाळांच्या अभ्यास दौऱ्यासाठी निवड करण्यात आले आहे.

या विद्यार्थ्यांची निवड जिल्हा स्तरावर उत्कृष्ट शिक्षण कार्य आणि लर्निंग आऊट कम्ससाठी करण्यात आली आहे. त्यांच्या शाळेने तालुकास्तरीय तीन लाख आणि जिल्हा स्तरावर पाच लाख बक्षीस मिळवले आहेत.

या विद्यार्थ्यांना बेंगळुरूतील शैक्षणिक ठिकाणांचा आणि प्रगत शाळांचा अभ्यास करण्याची संधी मिळणार आहे.

७ फेब्रुवारी ते ३ मार्च दरम्यान विद्यार्थ्यांना कूबन पार्क, विश्वेश्वरय्या इंडस्ट्रियल अँड टेक्निकल म्युझियम, गव्हर्मेंट म्युझियम, जवाहरलाल नेहरू प्लॅनेट हेरिटेज सेंटर अँड एरोस्पेस म्युझियम, लालबाग बॉटॅनिकल गार्डन, इस्कॉन टेम्पल, लालू मॉल यासारख्या अनेक शैक्षणिक ठिकाणांची भेट होईल.

या अभ्यास दौऱ्यामुळे विद्यार्थ्यांना इतर राज्यातील शाळांसोबत विचारांची देवाणघेवाण, संस्कृती वृद्धीकरण आणि आनंददायी शिक्षण प्राप्त करण्यास मदत होईल.

मुख्याध्यापक पद्माकर मोरे यांनी सांगितले की, या दौऱ्यामुळे शाळेतील आधुनिक सुविधा आणि नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यासाठी मार्गदर्शन मिळेल.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांना शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे, सदानंद शिवदे-पाटील, अशोक पतगे, सुजाता मोरे गटशिक्षणाधिकारी जिवनराज पडवळ, विस्तार अधिकारी काकासाहेब साळुंके, केंद्र प्रमुख शिला मुदगडे व शाळेतील धनराज तेलंग, बशीर शेख, विद्यानंद सुत्रावे यासह शिक्षकांनी अभिनंदन केले.

## भूम तालुक्यातील परंडा रस्त्यावर दूध वाहतूक करणाऱ्या पिकपचा अपघात

**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.२७ फेब्रुवारी -**

भूम तालुक्यातील परंडा-भूम रस्त्यावर २७ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता दूध वाहतूक करणाऱ्या पिकपचा अपघात झाला. पिकप दूध खाली करून परंड्याच्या दिशेने जात असताना गोलेगाव पाटीजवळ हा अपघात घडला.



अपघाताच्या वेळी पिकपला एक मोटरसायकल गाडीने कट मारला, ज्यामुळे पिकप चालकाचे वाहनावरून नियंत्रण सुटले. यामुळे पिकपने दोन पलटी घेतल्याने गाडीची चारही चाके उलटी झाली. या अपघातात पिकपचा चालक किरकोळ जखमी झाला आहे. घटनास्थळी उपस्थित स्थानिक नागरिकांनी तत्काळ धाव घेतली आणि अपघातात अडकलेल्या चालकाला बाहेर काढले. त्याला तातडीने प्राथमिक उपचार देण्यात आले.

या अपघातामुळे रस्त्यावर वाहतूक जाम झाली होती. अपघाताच्या तातडीने नोंद घेऊन पोलीस प्रशासनाने घटनास्थळी पोहचून पुढील कारवाई सुरू केली.

स्थानीय नागरिक आणि चालकांच्या सुरक्षिततेसाठी रस्त्यावर नियमांचे पालन करण्याची आवश्यकता असल्याचे यावेळी प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

## दिवटी सलगरा सुरेखा मुळे यांचा जागतिक महिला दिनी होणार सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.२७ फेब्रुवारी -**



तुळजापुर तालुक्यातील दिवटी सलगरा येथील शिवसेनेच्या तुळजापुर तालुका महिला आघाडी प्रमुख व सामाजिक कार्यकर्त्या सुरेखा मुळे यांचा कर्तुत्वान महिला म्हणून जागतिक महिला दिनी होणार सन्मान होणार आहे. दिवटी सलगरा येथील वाय.के.सोशल फाऊंडेशन मार्फत यावर्षी प्रथमच सलगरा दिवटी गावच्या कर्तुत्वान महिलांचा सन्मान सोहळा जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून करण्यात येत असल्याचे फाऊंडेशनचे अध्यक्ष ॲड. योगेश केदार, डॉ.तृप्ती केदार यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.

सुरेखाताई मुळे यांचा गाव परिसरात नेहमीच सामाजिक व धार्मिक कार्यात सक्रिय सहभाग असतो म्हणूनच त्यांच्या या सामाजिक कार्याची दखल घेत त्यांचा जागतिक महिला दिनी गौरव करण्यात येत आहे.

## सभापती राम शिंदे यांचा माजी आ.ठाकूर यांच्या हस्ते सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२७ फेब्रुवारी -**

महाराष्ट्र राज्य विधान परिषदेचे सभापति राम शिंदे यांनी परंडा येथे माजी विधान परिषद सदस्य (माजी आमदार) सुजितसिंह ठाकुर यांच्या निवास्थानी त्यांची सदिच्छा भेट घेतली.

यावेळी ठाकुर व भारतीय जनता पार्टी परंडा तालुका यांच्या वतीने सभापती शिंदे यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन भव्य सत्कार करणात आला.

यावेळी बोलताना शिंदे म्हणाले, भारतीय जनता पार्टीमध्ये एकनिष्ठ राहून प्रमोद महाजन व गोपीनाथ मुंडे यांच्याबरोबर राहुन पक्षाचे मी आणि ठाकूर यांनी काम केले आहे.

ठाकुर हे आमचे जुने मित्र आहेत, असे सांगुन त्यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. या भेटीदरम्यान शिंदे व ठाकुर यांच्यात राजकीय चर्चाही झाली.

सुजितसिंह ठाकूर यांचा नुकताच जन्म दिन झाला असल्याने त्यांना जन्म दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी भाजपाचे ॲड.संतोष सुर्यवंशी, विकास कुलकणी, गणेश खरसडे, ॲड.जहीर चौधरी, रमेश पवार, उमाकांत गोरे, बाबासाहेब जाधव, सुबोधसिंह ठाकूर, श्रीराम देवकर,

निशिकांत क्षिरसागर, धनाजी गायकवाड, भालचंद्र अवसरे, बिटू मदने, जगदिश डाके, आनंद मोरे, समरजितसिंह ठाकूर, अनिल मेहेर, पांडूरंग मुसळे, मिलिंद शिंदे आदीसह तालुक्यातील भाजपाचे कार्येकर्ते, पदाधिकारी, शहरासह ग्रामीण भागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ.आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२७ फेब्रुवारी -**

येथील डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल इंग्लिश मेडीयम स्कूलचे १७वे वार्षिक स्नेहसंमेलन २६ फेब्रुवारी रोजी मोठ्या उत्साहात पार पडले. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ.स्नेहा सुरवसे यांच्या हस्ते झाले, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका कविता पाटील होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.यशवंत नरवडे, चिकुंद्राचे माजी सरपंच राजेंद्र गरड, अशोकराव केसकर, शुभांगी गायकवाड, सेवानिवृत्त शिक्षक शिवाजीराव वऱ्हाडे, पत्रकार विलास येडगे आणि शिवसेना शिंदे गटाचे बंडप्पा कसेकर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभात शाळेचे अध्यक्ष मारुती खारवे यांनी सर्व मान्यवरांचा सत्कार केला. त्यावेळी त्यांनी शाळेच्या उद्दिष्टांविषयी बोलताना सांगितले की, शाळेतील विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे इंग्रजी माध्यमात शिक्षण मिळावे आणि त्यांना त्यांच्या कला सादर करण्यासाठी व्यासपीठ मिळावे, हेच या स्नेहसंमेलनाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी विविध गीतांवर लयबद्ध नृत्य सादर करून एकच धमाल उडवली. मराठी, हिंदी चित्रपट गीते, लोकगीत, लावणी, भक्तीगीत, देशभक्तीपर गीत, कोळीगीत यावर नृत्य करून विद्यार्थ्यांनी पालकांच्या आणि उपस्थितांच्या मनाला गारवा दिला. विद्यार्थ्यांची आकर्षक वेशभूषा आणि उत्तम नृत्य सादरीकरणाने स्नेहसंमेलनाची रंगत वाढवली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षक जनक गायकवाड यांच्यासह इयत्ता नववीतील विद्यार्थिनी समीक्षा चव्हाण आणि नगमा काजी यांनी केले. शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षेकेत्तर कर्मचाऱ्यांच्या मेहनतीने कार्यक्रम शांततेत आणि यशस्वीपणे पार पडला.

**धाराशिव :** शहरातील अग्नीशामक कार्यालयाच्या बाजूला उभ्या असलेल्या वाहनांमधून अज्ञात चोरट्यांनी मरॉन कंपनीच्या १२ व्होल्टच्या १२ बॅटऱ्या आणि टिप्परमधील अंदाजे १०० लिटर डिझेल असा एकूण ३६,२०० रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. विशाल लक्ष्मण शिंदे (वय ३७) यांनी याबाबत शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. यावरुन गुन्हा नोंद केला आहे.

## पोलीस प्रशासन दृष्टराष्ट्राच्या भूमिकेत; ड्रग्ज तस्करी प्रकरणात तपास संथगतीने!

**तभा वृत्तसेवा/सचिन ताकमोघे**
**तुळजापूर, दि.२७ फेब्रुवारी -**

तुळजापूर शहरात ड्रग्ज तस्करीच्या प्रकरणात पोलीस प्रशासनाची कारवाई संथगतीने सुरू असल्याची जोरदार चर्चा होत आहे. नागरिकांचा यावर विश्वास आहे की पोलीस प्रशासन धटराष्ट्राच्या भूमिकेत दिसत आहे आणि ड्रग्स प्रकरणातील मुख्य सूत्रधार-मास्टर माईंड अजूनही गळाला लागलेला नाही. शहरातील अनेक नागरिकांची शंका आहे की पोलीस प्रशासनामुळे बडे मासे वाचवले जात आहेत.

पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी यामध्ये पोलीस प्रशासनाला ७२ तासाचा अल्टिमेटम् दिला होता, परंतु त्या काळाच्या समाप्तीनंतरही पाच-सहा दिवस उलटून गेले तरी तपासात कुठल्याही मोठ्या व्यक्तीला अटक करण्यात आली नाही.

फक्त किरकोळ प्याद्यांची अटक झाली आहे, आणि म्हणूनच नागरिकांमध्ये उलटसुलट चर्चांना वाव मिळालाय. ड्रग्ज तस्करीचे संबंध राजकीय नेत्यांच्या गटाशी जोडले जात असून, एका राजकीय पदाधिकाऱ्याने पोलिसांवर आरोप केला आहे की, १९ लोकांची लिस्ट त्यांच्याकडे आहे, पण ती अद्याप जाहीर केली जात नाही.

तुळजापूरमधील ड्रग्ज तस्करी प्रकरणाने शहरातील नागरिकांमध्ये असंतोष निर्माण केला आहे. पोलिसांवर टीका केली जात आहे की त्यांच्यामुळे शहरात खुलेआम मटका जुगार, चोरी आणि दरोडे यांचे प्रमाण वाढले आहे. काही नागरिकांच्या मते, ड्रग्ज तस्करी प्रकरणात बडे नेते आणि त्यांचे राजकीय संबंध असू शकतात.




१५ फेब्रुवारी रोजी तामलवाडी पोलिसांनी तीन आरोपी पकडले होते, त्यात तुळजापूरचे दोन आणि नळदुर्गचे एक आरोपी होते. त्यानंतर मुंबईतील एक महिला आणि तुळजापूर येथील एक आरोपीही पोलिसांच्या ताब्यात आला. अनेकदा चर्चा झाली आहे की मुंबई पोलिसांनी शहरातील एका प्रतिष्ठित नागरिकाला ताब्यात घेतले आहे, पण याबद्दल अधिकृत माहिती मिळालेली नाही.

तुळजापूर शहरात ड्रग्ज रॅकेट काही वर्षांपासून पसरले असल्याच्या चर्चाही होत्या. तरीही पोलिसांनी याबाबत कारवाई केलेली नाही. शहरातील काही भागांत तरुणांची ड्रग्ज व्यसनाची अड्डे बनलेली आहेत.

समाजसेवक आणि नागरिक याबाबत पुन्हा एकदा प्रशासनाला जागरूक करत आहेत. अनेक युवक सोशल मीडियावर देखील याबाबत जनजागृती करत आहेत.

चर्चा आहे की, शहरातील २,५०० पेक्षा जास्त युवक ड्रग्जच्या व्यसनात अडकले आहेत. तरीही, पोलिसांच्या कारवाईवर शंका व्यक्त केली जात आहे. शहरात ड्रग्जच्या वाढत्या प्रमाणामुळे तीर्थक्षेत्राच्या नावावर मोठ्या प्रमाणात धक्का बसला आहे. पोलीस प्रशासनाने प्रकरणाचा योग्य व तात्काळ तपास करून मुख्य सूत्रधाराला पकडावे अशी मागणी नागरिक आणि भाविकांनी केली आहे.

### तीर्थक्षेत्राची बदनामी...

तुळजापूर शहर हा एक प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे, जिथे दररोज हजारोंच्या संख्येने भाविक दर्शनासाठी येतात. पूर्वी या शहराचे दारूच्या व्यसनामुळे काही प्रमाणात बदनाम होण्याचे प्रमाण होते, परंतु आता ड्रग्सच्या प्रकरणामुळे शहराच्या आणि तीर्थक्षेत्राच्या प्रतिष्ठेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. भाविकांमध्ये देखील यावर चर्चा सुरु आहे, आणि शहरवासीयांसोबतच भाविकांमध्येही या प्रकरणाचा लवकरात लवकर छडा लागावा अशी मागणी सुरू आहे.

## सॉफ्टटेनिस आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी धाराशिवच्या खेळाडूंची निवड

**तुळजापूर, दि.२७ फेब्रुवारी -** उत्तर प्रदेश मधील नोएडा या ठिकाणी दि.१६ ते २९ मार्च सॉफ्टटेनिसच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धा होणार आहेत.

यासाठी भारतीय मुलींच्या संघामध्ये प्रियांका हंगरगेकर हिची तर मुलांच्या संघांमध्ये स्वराज देशमुख याची निवड करण्यात आली आहे.



धाराशिव जिल्हा सॉफ्ट टेनिस असोसिएशनच्या वतीने अध्यक्ष संदीप गंगणे व सचिव सिराज शेख, प्रशिक्षक संजय नागरे यांनी दोन्ही खेळाडूंचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

यावेळी देविदास सुरवसे, धैर्यशील दरेकर, राजू गायकवाड, सतीश हुंडेकरी, किरण हंगरगेकर, प्रदीप अमृतराव, काका नन्नवरे, जगदीश पलंगे व खेळाडू उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### शैक्षणिक साहित्यांचे वाटप

**तुळजापूर, दि.२७ फेब्रुवारी -** माजी आमदार तथा भाजपचे माजी प्रदेश सरचिटणीस सुजितसिंह ठाकूर आणि भाजपाचे धाराशिव जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त तुळजापूर परीसरातील वस्तीतील पालावरची शाळा येथे आपल्या गरीबीतुन देखील शिक्षण घेत असलेल्या लहान बाळ विद्यार्थी ज्यांच्या नशीबात अंगणवाडी, बालवाडी नाही यांच्या वस्तीमध्ये जाऊन संघपरीवार अशा विद्यार्थ्यांना शिक्षण देत आहे. त्यांना एक छोटीशी मदत म्हणून शालेय सहीत्य उजळणी पुस्तक, वह्या, पेन, खाऊ वाटप करण्यात आले. यावेळी भाजपा प्रदेश कार्यकारिणी सदस्य गुलचंद व्यवहारे, बाबा घोंगते, सोनवणे, लक्ष्मण उळेकर, सरचिटणीस सागर पारडे, उमेश शेंडगे, विलास पारडे, अभिषेक पवार, संकल्प सिद्धी बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे सदस्य उपस्थित होते.



### जळकोट येथे १२५ शिवभक्तांचे रक्तदान

**जळकोट, दि.२७ फेब्रुवारी -** तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त राजे शिवछत्रपती सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्यावतीने घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात १२५ शिवभक्तांनी रक्तदान केले. राजे शिवछत्रपती सार्वजनिक जन्मोत्सव समितीच्यावतीने जळकोट येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात सोलापूर येथील श्री शिवयोगी सिद्धरामेश्वर बहुउद्देशीय समाजसेवी व सेवाभावी संस्था संचलित, महात्मा बसवेश्वर ब्लड बँक सेंटरच्या सहकार्याने रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात जळकोट व परिसरातील १२५ शिवभक्तांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान केले. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी राजे शिवछत्रपती सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.



### ब्राईट किड्समध्ये स्नेहसंमेलन संपन्न

**उमरगा, दि.२७ फेब्रुवारी -** उमरगा येथील ब्राईट किड्स प्री प्रायमरी स्कूलमध्ये बालकांच्या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन उमरगा लोहारा तालुक्याचे लोकप्रतिनिधी यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ब्राईट किड्सच्या संचालिका प्रभावती जाधव तर प्रमुख उपस्थिती मुख्याध्यापक पद्माकर मोरे, सुभाष चव्हाण, राज साळुंके, शिवाजी चव्हाण, उज्वला अहंकारी, शोभा टोणपे उपस्थित होत्या. ब्राईट किड्स मधील मुलांनी विविध सामाजिक शैक्षणिक देशभक्तीपर व समाज प्रबोधनपर गीतावर सुंदर नृत्याचे सादरीकरण केले. शिवगर्जना, वेलकम साँग, माऊली माऊली, चला जेजुरीला जाऊ, मराठमोळी लावणी अशा अनेक गीतावर विद्यार्थ्यांनी नृत्य सादर केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पल्लवी बनसोडे, सुषमा कवठे, श्रुती शेळके यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला पालकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

### दिंडेगाव भाविकांना फराळाचे वाटप

**इटकळ, दि.२७ फेब्रुवारी -** महाशिवरात्रीनिमित्त दिंडेगाव येथे जीवन मुक्ती सेवा मंडळ ट्रस्ट धनगरवाडी ग्रामस्थ यांच्यावतीने भाविकांना फराळाचे वाटप करण्यात आहे. हजारो भाविकांनी फराळाच्या प्रसादाचा लाभ घेतला. फराळ वाटपाच्या कार्यक्रमाला जीवन मुक्ती सेवा मंडळ ट्रस्टचे अध्यक्ष बळीराम महाराज सुरवसे, दीपक महाराज निकम, जगन्नाथ लोकरे, सरपंच नागनाथ घोडके, सुभाष घोडके, प्रताप घोडके, तुकाराम लोकरे, विशाल जेडगे, संकेत सुरवसे, समर्थ हळदे, संस्कार घोडके, रोहित घोडके, गणेश सुरवसे, कुणाल लोकरे, विठ्ठल लोकरे, चेतन दूधभाते आदी गावातील सर्व तरुण मंडळ यावेळी उपस्थित होते.

### विलास व्यवहारे यांचे निधन

**तुळजापूर, दि.२७ फेब्रुवारी -** येथील व्यापारी विलास व्यवहारे (वय ५७) यांचे



दि.२६ फेब्रुवारी रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी तीन मुली जावई दोन भाऊ नातवंडे असा परिवार आहे. भाजपचे प्रदेश कार्यकारणी सदस्य गुलचंद व्यवहारे यांचे ते मोठे बंधू होते.

# महाशिवरात्रीनिमित्त मुद्‌गलेश्वर मंदिरात भाविकांची गर्दी

**दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना १००८ किलोची साबुदाणा खिचडी, ११००० खरबूज, ११००० राजगिरा लाडू आणि दूध खिरीचे वाटप...**

**यात्रा कमिटीच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन...**

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२७ फेब्रुवारी -** तालुक्यातील सिंदफळ येथील ग्रामदैवत असलेल्या मुद्गलेश्वर मंदिरात २६ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीनिमित्त भाविकांची दर्शनासाठी अफाट गर्दी होती. पहाटेपासूनच मोठ्या संख्येने भाविक मुद्‌गलेश्वर महादेवाचे दर्शन करण्यासाठी मोठ्या संख्येने येत होते. महाशिवरात्रीनिमित्त यात्रा कमिटीच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये भारुड, कीर्तन, रक्तदान, काठी, पालखी मिरवणूक, २७ फेब्रुवारी रोजी महाप्रसाद, २८ फेब्रुवारी रोजी भव्य कुस्त्यांच्या स्पर्धा आणि २ मार्च रोजी सांस्कृतिक कार्यक्रमात लावण्यखणी असा कार्यक्रमाचा सप्ताह होणार आहेत.

महाशिवरात्रीनिमित्त मंदिराची सुंदर आणि आकर्षक फुलांनी सजावट करण्यात आली होती.



मंदिरात भव्य सुंदर रांगोळी काढण्यात आली होती दर्शनासाठी भल्या मोठ्या रांगा लागल्या होत्या. अनेक भाविकांच्या वतीने मोफत अन्नदान महाप्रसाद म्हणून दुध, केळी, आणि शाबु खिचडीचे वाटप करण्यात आले होते.

तसेच श्री मुद्गुलेश्वर महादेव सेवा समिती तथा मुद्गुलेश्वर युवा प्रतिष्ठान तुळजापूर यांच्या वतीने मंदिर परिसरात महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

त्याचा मध्ये १००८ किलोची साबुदाणा खिचडी, ११००० खरबूज, ११००० राजगिरा लाडू आणि दूध खिर भक्तांसाठी पिण्याच्या पाण्यासाठी झार व्यवस्था करण्यात आली होती. यामध्ये हजारो शिव भक्तांनी याचा लाभ घेतला. सिंदफळ आणि तुळजापूर येथील स्थानिक भाविकांची अभिषेकासाठी मोठी वर्दळ होती.

दुपारी अभिषेकानंतर महादेवाची महाआरती करण्यात आली. यात्रा सुरळीत पार पाडण्यासाठी मुद्‌गलेश्वर यात्रा कमिटीचे सर्व सदस्य आणि सिंदफळ येथील सर्व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

## विनायक सावरकर प्रखर हिंदुत्ववादी विचाराचे धगधगते अग्नीकुंड : अविनाश जोशी

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२७ फेब्रुवारी -** स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर प्रखर हिंदुत्ववादी विचाराचे धगधगते अग्नीकुंड होते. अत्यंत जहाल विचारसरणीमुळे स्वातंत्र्यसंग्रामात अत्यंत धाडसी कार्य त्यांनी केले. जेवढ्या प्रखरपणे त्यांनी इंग्रजांना विरोध केला, तेवढ्याच प्रखरपणे त्यांनी अंधश्रद्धेलाही विरोध करून एक सुशील समाज निर्माण करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले, असे करत असताना त्यांच्यातील एक कवी मनाचा तसेच साहित्यिकाचे दर्शन आपल्याला घडते. त्यांच्या विचाराची शिदोरी समाजातील प्रत्येक घटकांनी आत्मसात करावी, असे प्रतिपादन सहशिक्षक अविनाश जोशी यांनी केले.

श्री राष्ट्रीय शिक्षण प्रसारक संस्था संचलित, स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर उमरगा येथे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे पुण्यदिन साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून जोशी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहशिक्षक संजय कोथळीकर हे होते. याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका सविता लोहार, व्यंकट वचने सह सर्व शिक्षक विद्यार्थी मोठ्या संख्येने हजर होते. पुढे बोलताना जोशी म्हणाले की, अत्यंत जहाल विचार व इंग्रजांना जशास तसे उत्तर देण्याची हिंमत दाखवणारे विनायक दामोदर सावरकर हे अत्यंत भावनिक ही होते. त्यांनी काळ्यापाण्याची शिक्षा भोगताना आपल्या पत्नीला लिहिलेल्या पत्रातून आपल्याला त्याची अनुभूती येते. निश्चितच अशा विचाराची देशाला अत्यंत गरज असून ते विचार देणारे व्यक्तिमत्त्वाला विनम्र अभिवादन केले पाहिजे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश कुलकर्णी तर आभार मुख्याध्यापिका सविता लोहार यांनी मानले.

## नागझरी महादेव मंदिरात भाविकांची गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२७ फेब्रुवारी -** येथील नागझरी महादेव मंदिरात शिवरात्री निमित्त भाविकांनी गर्दी केली होती. सध्या प्रयागराज महाकुंभमेळ्याचे सोशल मीडियावरील व्हायरल रिल्समुळे या वर्षी दरवर्षीच्या तुलनेत नागझरी महादेव मंदिरात शिवरात्री निमित्त भाविकांनी गर्दी केल्याने दर्शनासाठी, भाविक, महिला भाविकांच्या रांगा लागल्या होत्या.



येरमाळा ते बार्शी रोडवर बालाघाटाच्या रांगेत नागझरी नावाने पंचक्रोशीत प्रसिद्ध असलेले महादेवाचे मंदिर आहे. नवसाला पावनारा महादेव म्हणुन हे मंदिर प्रसिद्ध आहे.

शिवरात्री निमित्त दिवसभर महादेवाच्या दर्शनासाठी विक्रमी गर्दी केल्याने दिवसभर भाविकांना दर्शन घेण्यासाठी रांगेतुन दर्शन घेण्यासाठी दोन तास वेळ लागला. यंदा प्रयागराज येथील सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या रिल्समुळे यंदाच्या शिवरात्रीला नागझरी महादेव मंदिरात गर्दी झाल्याचे भाविक बोलत होते.

पंचक्रोशीतील मलकापूर, उपळाई, सापनाई, पानगाव, उमरा, रत्नापूर, तेरखेडा, दुधाळवाडी, बांगरवाडी येथुन महिला भाविकांनी पायी चालत येऊन दर्शन घेतले.

## क्रीडा स्पर्धा व वृक्षारोपणात जि.प. शाळेची नेत्रदीपक कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२७ फेब्रुवारी -** उमरगा येथील आयएसओ मानांकित मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानांतर्गत जिल्हास्तरीय द्वितीय क्रमांक पटकावलेल्या जिल्हा परिषद हायस्कूल उमरगा येथे घेण्यात आलेल्या क्रीडा स्पर्धा व सहशालेय स्पर्धेच्या बक्षीस वितरण संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा शकुंतला मोरे तर प्रमुख पाहुणे म्हणून अँड. शितल चव्हाण, गट शिक्षणाधिकारी जीवनराज पडवळ, सुभाष चव्हाणख के.डी. खंडागळ, बाबूलाल मुजावर, नूर अहमद, शोभा टोणपे, शहासाब मुल्ला, कस्तुरी कडगंचे, सुजाता मोरे, महमद रफी शेख, मुख्याध्यापक पद्माकर मोरे उपस्थित होते. यावेळी क्रीडा स्पर्धेत व सहशालेय स्पर्धेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना निबंध लेखन, प्रश्नमंजुषा, सुंदर हस्ताक्षर, वाद विवाद, चित्रकला, कविता वाचन, गीत गायन, पोस्टर प्रेसेंटेशन, रांगोळी स्पर्धा आणि सांघिक व वैयक्तिक क्रीडा स्पर्धेतील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना ३६५ बक्षिसे देण्यात आली. या कार्यक्रमाप्रसंगी शाळेतील पालकांची उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने कार्यक्रमाला उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी धनराज तेलंग, सदानंद कुंभार, विद्यानंद सूत्रावे, बशीर शेख, ममता गायकवाड, सोनाली मुसळे, वर्षाराणी पाटील पूजा गुंडीले संजय रुपाजी, यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यापक पद्माकर मोरे आभार सोनाली मुसळे यांनी मांडले.

## महाडीबीटी शिष्यवृत्ती अर्ज तात्काळ सादर करा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२७ फेब्रुवारी -** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत विविध शिष्यवृत्ती योजनांसाठी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू असून महाविद्यालयांनी प्रलंबित अर्ज तात्काळ सादर करावेत,असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त बाबासाहेब अरवत यांनी केले आहे.सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षासाठी महाडीबीटी संकेतस्थळ (http://mahadbtmahit.gov.in) २५ जुलैपासून सुरू करण्यात आले आहे. ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप अर्ज भरलेले नाहीत, त्यांना अर्ज भरण्याची सूचना महाविद्यालयांनी द्यावी, असेही आवाहन करण्यात आले आहे.

## दिल्ली मराठी साहित्य सम्मेलनात सय्यद यांचा बहुमान

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२७ फेब्रुवारी -** दिल्ली येथे पार पडलेले अखिल भारतीय मराठी साहित्य सम्मेलनात तुळजापूर तालुक्यातील आरळी बुद्रुकचे सुपुत्र मुंबई येथील प्रसिद्ध आर्ट डिझायनर खाँजाभाई मौलासाहेब सय्यद यांचा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या हस्ते सन्मान सत्कार केला.

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर पाहिलेच सम्मेलन राजधानी दिल्ली येथे पार पडले. साहित्य सम्मेलनाचे मुख्य संयोजक महाराष्ट्र राज्य सरकारसह अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळ व सरहद संस्था पुणे यांच्या विद्यमाने तीन दिवशीय सम्मेलनाचा डंका राज्यासह दिल्लीत गाजला. अशा दैदिप्यमान सम्मेलनाच्या सजावटीची मुख्य जबाबदारी तुळजापूर तालुक्याचा गौरव असणारे प्रसिद्ध आर्ट डिझायनर खाँजाभाई सय्यद यांच्यावर होती. त्यांनी केलेल्या सर्व प्रसिद्धीच्या कामामुळे या सम्मेलनाला एका वेगळ्या उंचीवर पोचवले.

राजधानीत साहित्य सम्मेलनाची घोषणा होताच नेटक्या नियोजनाची सर्वच स्तरांवर जोरदार तयारी सुरू झाली,यावेळी सम्मेलनाची निमंत्रण पत्रिका, स्वागत कमानी, विचारपीठावरील मुख्य बॅनर आदी बाबींसाठी एकमेव नाव संयोजक समितीच्या समोर आले.

सय्यद यांनी मराठीचा होणारा बहुमान यासाठी आपलाही हातभार लागावा यासाठी ही जबाबदारी आनंदाने स्वीकारली.

## गुरुकुल प्री प्रायमरीच्या विद्यार्थ्यांची गरुड भरारी

**६ पदकाची कमाई...**

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२७ फेब्रुवारी -** पहिली राज्यस्तरीय दांडपट्टा अजिंक्यपद क्रीडा स्पर्धा २३ फेब्रुवारी २०२५ कोल्हापूर एकूण सहभागी १४ जिल्ह्यांतील ४१० विद्यार्थी सहभाग नोंदविला होता. यामध्ये धाराशिव जिल्ह्यांनी तृतीय चॅम्पियनशिप ट्रॉफी पटकावून जिल्ह्याचे नाव लौकी केले.



यावेळी दांडपट्टा स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष संदीप लाड, बाला साठे, गौतम विधाते, अजय शहा, महमदरफी शेख, आनंदराव ठोंबरे, विनायक चोपदार, मनोज बालिंगेकर, दिपाली साठे, सुभाष मोहिते, संभाजी अहिरराव यांची उपस्थिती होती. या स्पर्धेत उमरगा तालुक्यातील गुरुकुल प्री प्रायमरी इंग्लिश मीडियम स्कूल मुरूम, डॉ. रामानुजन इंग्लिश मीडियम स्कूल उमरगा, स्वामी विद्या मंदिर उमरगा, शरणप्पा मलंग विद्यालय उमरगा, श्री महात्मा बसवेश्वर विद्यालय उमरगा, छत्रपती शिवाजी ज्युनिअर कॉलेज उमरगा या शाळांनी सहभाग घेतला होता. पहिली राज्यस्तरीय दांडपट्टा अंजिक्यपद क्रीडा स्पर्धेत टिम धाराशिव च्या वतीने मुलीमध्ये स्वरांजली मामले प्रथम, स्वरा पाटील प्रथम, पृतुषा प्रविण सोमवंशी प्रथम, अनन्या मारूती पांगे तृतीय, आरती दिगंबर पांगे तृतीय, अक्षरा गुंडय्या स्वामी तृतीय, समृद्धी संतोष टोपगे द्वतीय, श्रेया जितेंद्र अंकुशे तृतीय, मुलामंध्ये आयुष्य पवार प्रथम, रोमन सैनी द्वितीय, साहील शेख प्रथम, करण जाणे तृतीय, गोविंद रूपणूर प्रथम, राजवीर चौधरी द्वतीय, अभय मोरे प्रथम यांनी सहभागी होऊन चांगली कामगिरी पार पाडली.

## दिंडेगाव येथील सद्गुरू शिवराम बुवा महाराज यात्रेस प्रारंभ

**आज (दि.२८) हभप. आप्पासाहेब महाराज दिंडेगावकर यांचे काल्याचे कीर्तन व महाप्रसादाचे वाटप**

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.२७ फेब्रुवारी -** तुळजापूर तालुक्यातील दिंडेगाव येथील ग्रामदैवत श्री सद्गुरू शिवराम बुवा महाराज यात्रेस बुधवार दि.२६ फेब्रुवारी महाशिवरात्री रोजी मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला. सकाळ पासूनच भाविकांनी दर्शनासाठी मंदिर परिसरात उपस्थिती दर्शवली अगदी रांगेत व शिस्तीत सर्व भाविकांनी दर्शन घेतले. मंदिर समितीचे सेवक व पोलीस यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

शुक्रवार दि.२८ फेब्रुवारी रोजी दुपारी हभप. आप्पासाहेब महाराज



दिंडेगावकर यांचे काल्याचे किर्तन व महाप्रसादाचे वाटप होणार आहे. रामकृष्ण हरीच्या जय घोषा ने अवघा परिसर दणाणून गेला. प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी श्री संत सद्गुरू शिवराम बुवा महाराज यांची यात्रा मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात येणार असून तीन दिवस ही यात्रा संपन्न होत असून या सद्गुरू शिवराम बुवा महाराज यात्रेस तुळजापुर, उमरगा, कळंब, भुम, अक्कलकोट, सोलापूर, धाराशिव, मोहोळ, लोहार, औसा, निलंगा, लातूर आदि भागातून बहुसंख्य वारकरी भाविक भक्त या यात्रेस उपस्थित राहतात. यात्रेकरू भाविकांना पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी यासाठी मंदिर कमिटी व ग्रामपंचायतच्या वतीने पिण्याच्या पाण्याची सोय करण्यात आलेली आहे. परिसरातील जवळपास ४० ते ५० दिंड्या उपस्थित राहतात. टाळ मृदंग व रामकृष्ण हरी च्या जय घोषात वारकरी तल्लीन होतात.

ग्रामीण भागातील ही यात्रा म्हणजे प्रति पंढरपूर समजले जाते तरी भाविकांनी या यात्रेतील धार्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन यात्रा कमिटीच्या वतीने करण्यात आलेले आहे.

## लहुजी शक्ती सेना उमरगा-लोहारा तालुका कार्यकारणीची बैठक संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२७ फेब्रुवारी -** उमरगा शहरातील शासकीय विश्रामगृह येथे मातंग समाज महा अधिवेशना संदर्भात व लहुजी शक्ती सेना कार्यकारणी जाहीर करण्यात आले.

यावेळी महिला आघाडी प्रदेशाध्यक्षा मायाताई लोंढे, मराठवाडा उपाध्यक्ष राजाभाऊ शिंदे, महिला आघाडी जिल्हाध्यक्षा सारिका कांबळे, जिल्हा संघटक भाग्यश्री सूर्यवंशी, विजय तोरडकर, अलका कांबळे, गिण्यानबाई कांबळे यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले. युवक तालुका अध्यक्षपदी विशाल गायकवाड, उपाध्यक्षपदी गजानन एडके, लोहारा तालुका संपर्कप्रमुखपदी अर्जुन थोरात, उमरगा शहराध्यक्षपदी विआदींचीके, सचिवपदी मंगेश सुरवसे, विद्यार्थी महिला आघाडी तालुका अध्यक्षपदी सुप्रिया शिंदे, उपाध्यक्ष निकिता चिमुकले, सचिव जोगेश्वरी शिंदे आदींची नियुक्ती करण्यात आली.

# गिरगाव आरोग्य संस्थेला राष्ट्रीय गुणवत्ता मानांकन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ फेब्रुवारी**

वसमत तालुक्यातील गिरगाव प्राथमिक आरोग्य केंद्राने राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकन पुरस्कार मिळवला आहे. मराठवाडा विभागातील एकमेव प्राथमिक आरोग्य केंद्र असल्याचे सांगण्यात आले आहे. वसमत तालुक्यातील गिरगाव प्राथमिक आरोग्य केंद्राची राष्ट्रीय आरोग्य व्यवस्था संसाधन केंद्राच्यावतीने दि २४ व २५ जानेवारी रोजी तपासणी करण्यात आली होती. यामध्ये राजस्थानचे केंद्रीय परीक्षक डॉ किरण नागपाल आणि मध्य प्रदेशचे केंद्रीय परीक्षक अकील अन्सारी यांनी मुद्देनिहाय परीक्षण करून केंद्रीय समितीस अहवाल सादर केला होता.

या तपासणीमध्ये आरोग्य केंद्रामध्ये दिले जाणारे तातडीचे उपचार, रूग्ण रेफरचे प्रमाण, रूग्णांसाठी असलेली आरोग्य सेवा, उद्यान, परिसर स्वच्छता, अत्याधुनिक यंत्रांचा वापर, वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची उपस्थिती यासह इतर बाबींचा समावेश होता. या अहवालानुसार गिरगाव केंद्राने विभागातून ९५ टक्के गुण प्राप्त करून राष्ट्रीय गुणवत्ता आश्वान मानांकन केंद्रीय महत्वाकांक्षी पुरस्कार प्राप्त केला. छत्रपती संभाजीनगर विभागातून प्रथम व महाराष्ट्रातून सर्वाधिक गुणांकन व मानांकनाचा बहुमान प्राप्त करणारी गिरगाव ही एकमेव आरोग्य संस्था ठरली आहे. वैद्यकीय अधिकारी डॉ शशांक कदम, डॉ वैजनाथ सुर्यवंशी, कार्यक्रम समन्वयक डॉ प्रशांत पुठ्ठावार व संपूर्ण कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला. सदर उच्चस्तरीय मानांकन प्राप्त करण्यासाठी जिल्हाधिकारी अभिनव गोयल, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ कैलाश शेळके यांनी वेळोवेळी आरोग्य केंद्राला भेटी देऊन मार्गदर्शन केले आहे. आरोग्य केंद्राच्या यशाबद्दल जिल्हा माता बालसंगोपन अधिकारी डॉ सुनील देशमुख, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ गोपाल कदम, क्षयरोग अधिकारी डॉ देवेंद्र जायभाये, सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ पांडुरंग फोपसे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ सदींप काळे, डॉ सतीश रूणवाल, डॉ गणेश जोगदंड, डॉ गजानन चव्हाण, डॉ डी व्ही सावंत, डॉ प्रकाश जाधव यांनी अभिनंदन केले आहे.

# सांदिपनी पब्लीक स्कूलमध्ये मराठी भाषा दिन साजरा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ फेब्रुवारी**

सांदिपनी पब्लिक स्कूल, सुनील नगर, तरोडा (बु), नांदेड येथे व राज्यभरात सगळीकडे २७ फेब्रुवारीला मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. मराठीतील थोर कवी विष्णू वामन शिरवाडकर ऊर्फ 'कुसुमाग्रज' यांच्या वाढदिवसानिमित्त हा दिवस साजरा केला जातो. संपूर्ण देशासह जगभरात मराठी भाषेचा गौरव करण्यासाठी हा दिवस समर्पित आहे. कार्यक्रमाची सुरुवात कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून मराठी भाषेचे महत्व आणि तिचा गौरव स्पष्ट केला. स्वराली चिंचोलकर, सौख्या पालमकर, शाश्वत बोडके, आदित्य नरवाडे आदि विद्यार्थ्यांनी आपले विचार व्यक्त केले. त्यांची मनोगते ऐकून उपस्थितांमध्ये मराठी भाषेच्या प्रेमाची लाट उसळली. शाळेतील मराठी विषयाचे शिक्षक व शिक्षिकांनीही आपल्या भावनांचा आविष्कार केला. शाळेच्या मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी यांनी मराठी भाषेचे साहित्यिक योगदान व संस्कृतीच्या संवर्धनाबाबतचे विचार मांडले. शाळेचे प्रशासक मेखाले यांनीही मराठी भाषेच्या गौरवासाठी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमात सौ. माधुरी आचार्य, सौ. सीमा सावंत, सौ. मनोरमा राठोड, अरविंद काळेवार यांनी आपल्या कवितांमधून मराठी भाषेच्या सामर्थ्याचे वर्णन केले. त्यांच्या काव्यप्रेमामुळे कार्यक्रमाला एक विशेष रंगत आली. काही चिमुकल्यांनी मी मराठी या गाण्यावर नृत्य सादर केले. त्यांच्या सुंदर नृत्याविष्कारामुळे उपस्थितांना आनंद झाला.

या कार्यक्रमाला शाळेचे संचालक सुनील राठोड, सहसंचालक मुकुल राठोड, विपुल राठोड, सौ. रेश्मा विपुल राठोड, सौ. माहेश्वरी मुकुल राठोड, शाळेच्या मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी, उपमुख्याध्यापिका सौ. हरप्रीत कौर, प्रशासक मारुती मेखाले आणि सर्व शिक्षक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अरविंद काळेवार यांनी केले व खंडेराव जोगदंड यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# येहळेगाव सोळंके येथे जलकुंभावर चढून युवकांचे आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**हिगोली, २७ फेब्रुवारी**



एक नव्हे दोन नव्हे तर तीन योजना राबवून देखील गावात उन्हाळ्यात होणारी पाणीटंचाई कमी करण्यात प्रशासनाला यश येत नसल्याने औंढा नागनाथ तालुक्यातील येहळेगाव सोळंके येथे युवकांनी चक्क जलजीवनच्या जल कुंभावर चढून पाण्यासाठी दि.२७ रोजी आंदोलन करून सरकारचे लक्ष वेधले आहे.

औंढा नागनाथ तालुक्यात असलेल्या येहळेगाव सोळंके येथे गावातील काही युवकांनी गुरुवार दिनांक २७ फेब्रुवारी रोजी सकाळी गावातील पाण्याच्या टाकीवर जाऊन आंदोलन सुरू केले आहे. गावात पाणी मिळत नसल्याने लोकांनी अगोदरच जिल्हा प्रशासनाला ही बाब कळवली होती. परंतु कुठलीही दखल घेतली गेली नसल्याने युवकांनी हे आंदोलन सुरू केले आहे. विशेष म्हणजे जलजीवन मिशन अगोदर गावात दोन योजनेअंतर्गत पाण्याच्या टाक्या उभारण्यात आलेले आहेत. परंतु एकही टाकी लोकांच्या तहान भागवण्यास कामी पडत नाही. शिवाय गावातील ही पाणीटंचाई दूर करण्यासाठी ग्रामपंचायत देखील फारसे लक्ष देत नसल्याचे चित्र आहे. परिणामी लोकांना पिण्याच्या पाण्याची टंचाई नित्याचीच झाली आहे. ग्रामपंचायतीवर वर्चस्व कुणाचेही असो पण टंचाईचा हा प्रश्न मिटत नसल्याने ग्रामस्थांची पाण्यासाठी भटकंती होत आहे. आता पुन्हा ग्रामस्थांवर पाण्यासाठी आंदोलन करण्याची वेळ आलेली आहे. विशेष म्हणजे आंदोलन करण्यात यावेळी काही विद्यमान ग्रामपंचायत सदस्य पुढे आहेत. गावात दिनांक २७ फेब्रुवारी रोजी सकाळी सुरू केलेल्या आंदोलनानंतर तालुका प्रशासनाला माहिती मिळताच तहसीलदार हरीष गाडे यांनी आंदोलनकर्त्यांची भेट घेतली. यावेळी ग्रामस्थांची मोठी गर्दी जमली होती. अखेर अभियंता नरवाडे, बोरकर यांनी लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेतले.



**हिंगोली– वंचीत बहुजन आघाडीची गुरूवारी कार्यकर्ता संवाद बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस वंचीत बहुजन आघाडीचे अध्यक्ष डॉ प्रकाश उर्फ बाळासाहेब आंबेडकर यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी जिल्हाभरातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### स्वरा गलबले चित्रकला स्पर्धेत प्रथम



हिंगोली– भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालय,हिंगोली येथील कु. स्वरा प्रसाद गलबले ही विद्यार्थिनी राजा रविवर्मा चित्रकला स्पर्धेत प्रथम आली आहे. स्पर्धेचे आयोजन तुळसाबाई सोमानी एज्युकेशनल ट्रस्ट द्वारा संचलित सत्यनारायण विद्या मंदिर हिंगोली यांनी केले होते. कु.स्वरा गलबले ही वर्ग नववी अ ची विद्यार्थिनी आहे. या विद्यार्थिनीला विद्यालयाचे कला अध्यापक श्री. रवींद्र जांभळे यांनी मार्गदर्शन केले. शाळेच्या व संस्थेच्या वतीने मुख्याध्यापक डॉ. प्रकाश अंभोरे, उपमुख्याध्यापक जितेंद्र भट्ट व पर्यवेक्षक तुलसीदास चिलमुल यांनी सत्कार केला. तसेच संस्थेचे अध्यक्ष, सचिव व सर्व संचालक यांनी कु. स्वरा गलबले या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

### अवैध गौणखनिज प्रकरणी पथकाची कारवाई



हिंगोली– सेनगाव तालुक्यातील बाभूळगाव शिवारात अवैध रेती वाहतूक करणारे ट्रॅक्टर मालक दत्तात्रेय इंगोले यांचे एक अवैध रीतीने भरलेले अंदाज एक ब्रास रेतीचे ट्रॅक्टर ट्रॉली सह पकडून तहसील कार्यालय सेनगाव येथे तहसीलच्या पथकाने जमा केले. रेती, ट्रॅक्टर, ट्रॉली असा पाच लाखांचा मुद्देमाल जप्त केला. तसेच सकाळी ४.००वाजता ब्रह्मवाडी शिवारातील पूर्ण नदीपात्र आवेध रेती उपसा करणारे साहित्य लाईलोन रस्सी, थर्माकोल बोट जप्त करून सदरील साहित्य जाळून नष्ट करण्यात आले. त्याचे अंदाजे किंमत रु ५०,०००/ होती. सदरील कारवाई उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे आणि तहसीलदार मांडवगडे यांच्या मार्गदर्शनाखाली पथक प्रमुख मंडळ अधिकारी के एन .पोटे ,मंडळ अधिकारी देविदास इंगळे, ग्राम महसूल अधिकारी वामन राठोड, प्रदीप इंगोले, प्रशांत देशमुख, वसंत जाधव, हेंबाडे, यादव जाधव यांनी केली.

# शनिवारी ओमभवन बँकेचे उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ फेब्रुवारी**

ओमप्रकाश देवडा पिपल्स को. ऑप. बँकेचे नवीन मुख्य कार्यालयाचे इमारत ओमभवनचे उद्घाटन दि १ मार्च रोजी शनिवारी होणार असून यानिमित्त दि १ मार्च ते ४ मार्च पर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहीती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

यावेळी बॅंकेचे संस्थापक स्व ओमप्रकाश देवडा यांच्या पूर्णाकार पूतळ्याचे अनावरणही मान्यवरांच्याहस्ते होणार आहे. यावेळी मोफत मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया शिबीर, कॅन्सर तपासणी व मार्गदर्शन शिबीर, अर्बन बँकासाठी प्रशिक्षण शिबीर, संगीत रजनी, किर्तन, भजन आणि कथाकथन आदी कार्यक्रम होणार आहेत.

याप्रसंगी बँकेचे अध्यक्ष प्रकाशचंद सोनी, बँकेचे उपाध्यक्ष सुनील देवडा, बँकेचे संचालक विठ्ठलदास मुंदडा, शशीकांत दोडल, ज्ञानेश्वर मामडे, राजेश अग्रवाल, संजय देवडा, आशिष काबरा, गजानन देशमुख, एम एम बुद्रुक, आशिष काबरा, अजित बज, राजु मुदीराज, जनकराज खुराणा, डॉ सचिन बगडीया, यांनी होणाऱ्या मेडीकल कॅम्प विषणी कर्क रोग, अवयवदान यावर थोडक्यात माहीती दिली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर जालनापुरे, सरव्यवस्थापक शशीकांत कंदी, उप सरव्यवस्थापक सुधीर मुळे, सहा. सरव्यवस्थापक ज्ञानदेव घुगे, सहा सरव्यवस्थापक श्रीराम माळोदे, आरोग्य शिबीर समितीचे नंदकिशोर भालेराव, आशिष पिंगळकर, संजय बोहरा, दयाल यादव यांच्यासह सर्व कर्मचारी वृंद उपस्थित होते. या उद्घाटन सोहळ्याला बँकेचे ग्राहक, सभासद, ठेवीदार व हिंतचिंतकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन बँकेचे अध्यक्ष प्रकाशचंद सोनी, उपाध्यक्ष सुनील देवडा यांनी केले आहे.

# एबीएम इंग्लीश हायस्कूलमध्ये मराठी राजभाषा गौरव दिन साजरा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ फेब्रुवारी**

शहरातील ए बी एम इंग्लिश हायस्कूल येथे २७ फेब्रुवारी मराठी राजभाषा दिवस साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रमुख स्थानी संस्थेचे दिलीप बांगर मुख्याध्यापक जोसेफ के जे तसेच शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे अध्यक्ष दिलीप बांगर व मुख्याध्यापक जोसेफ केले. यांच्या हस्ते कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आली त्यानंतर शाळेचे शिक्षक नितीन शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मराठी राजभाषा दिनाचे सविस्तर माहिती देऊन मराठी भाषेची सुरुवातीपासून ते आस्था गायीची वाटचाल अत्यंत मुद्देसूद स्पष्ट केली. त्यानंतर अनेक विद्यार्थ्यांनी मराठी भाषे निमित्त लोकगीत, भारुड लोककला, पोवाडे अशा प्रकारच्या वेगवेगळ्या मराठी कलाकृती सादर केल्या. त्याचप्रमाणे अनेक विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचे महत्त्व अधोरेखित केले संस्थेचे अध्यक्ष दिलीप बांगर यांनीही मराठी राजभाषा दिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांना मराठी भाषा ही महत्त्वाची आहे त्याचबरोबर आपण इतरही भाषा शिकल्या पाहिजे असे सांगितले त्याचप्रमाणे शाळेचे मुख्याध्यापक जोसेफ के जे यांनीही मराठीतूनच आपले भाषण केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन शाळेचे शिक्षक विनोद पुरी यांनी केले सर्वांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

# भारतीय बालरोग तज्ज्ञ संघटनेतर्फे संकल्प संपूर्ण स्वास्थ्य कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ फेब्रुवारी**



येथील भारतीय बालरोग तज्ञ संघटनेतर्फे संकल्प संपूर्ण स्वास्थ या मिशन अंतर्गत माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी सदर कार्यशाळा येथील प्रसिद्ध बियाणी इंटरनॅशनल स्कूल येथे आयोजित करण्यात आली होती.

यावेळी जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी या कार्यशाळाला मुलाचे मार्गदर्शन करतांना मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी हा विषय अतिशय महत्त्वाच्या आहे. तसेच आयएपीच्या सर्व बालरोग तज्ञांनी सदर कार्यशाळा जिल्ह्याभरातील शाळांमध्ये असा कार्यक्रम घेण्याचे आवाहन केले. तसेच सदर कार्यशाळेसाठी माजी बालरोग संघटनेचे अध्यक्ष डॉ. उपेंद्र किचवडेकर मुंबई यांची उपस्थिती होती. यावेळी त्यांनी आपल्या भाषणातून मुलांना तसेच शिक्षक वर्गांना मोलाचे मार्गदर्शन केले. मुलांचा संतुलित आहार, जंक फूड मुळे लठ्ठापणा, उच्च रक्तदाब, कर्करोग यासारखे गंभीर आजार होतात. त्यामुळे जंक फुडबाबत शिक्षकांनी आपल्या शाळेतील मुलांना मार्गदर्शन करावे. असे आवाहन केले. तसेच या कार्यक्रमासाठी संभाजीनगर येथील मार्गदर्शक म्हणून डॉ गणेश कुलकर्णी उपस्थित होते. यावेळी कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना मानसिक आरोग्य कसे राखावे याबाबत मार्गदर्शन केले तसेच व्यसनापासून व आमली पदार्थापासून दूर राहण्याचे आवाहन केले. बियाणी इंटरनॅशनल स्कूलचे संचालक गजेंद्र बियाणी यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले. सदरचा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी प्राचार्य सौ. नम्रता बेले व सर्व शिक्षक वृंद, कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. त्यानंतर प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी जिल्हा परिषद शाळा कणका येथे आयोजित केला होता. यावेळी डॉ उपेंद्र किचवडेकर व डॉ गणेश कुलकर्णी यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी हा कार्यक्रम जिल्हाभरातील प्रत्येक शाळेमध्ये आयोजित केल्याबद्दल आयोजक आयएपी सदर शाळेचे अडोके, सोपान नागरे यांचे आभार मानले. सदर कार्यशाळेत तीनशे जणांना प्रशिक्षण देण्यातआले.सदरकार्यशाळापुढील वर्षभर जिल्हाभरातीलशाळांमध्येआयोजितकेली जातील असे भारतीय बालरोग तज्ञ संघटनेच्यावतीने सांगण्यात आले.